। वर्ष १ । दिवाळी अंक २०१२ ।

गमरुंगार

अतिथी संपादक – ज्ञानेश्वर मुळे

शाई, कागद, शब्द
आणि तुही
निमित्तमात्र आहेस
तुझ्यातील चेतना ही
भवतालच्या अखंड
चैतन्याची ऋणी आहे
याची सजगता ठेवून
लिही
आकाश तुझ्यासाठी
वेडं होईल
खाली वाकेल, आणि
तू नीळा होशील,
असं लिही....

- गुरुनाथ सामंत

- अतिथी संपादक
  ज्ञानेश्वर मुळे
- संपादक
  विनायक पाचलग
- सहा. संपादक
  सोनाली नवांगुळ, प्रसाद
- डिझाईन
  भक्ती पेठकर
- अंक सजावट व मांडणी :
  अनिल
- वेब निर्मिती
  दीपक शिंदे
- मार्गदर्शन व व्यवस्थापन
  कुलभुषण बिरनाळे
- मुखपृष्ठ
  प्रदीप घोडके

- अंकात व्यक्त झालेली मते त्या त्या लेखकांची आहेत. त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

(अंक फक्त खासगी वितरणासाठी)

अनुक्रमणिका

संपादकीय : ज्ञानेश्वर मुळे

या गंधीत गोष्टीमधला क्षण कुठला विद्रुप नाही : सलील कुलकर्णी

अभिव्यक्त होण्याची माध्यमे गवसली,

पण विचार करायला कोण शिकवणार : संजय आवटे

देश चालवणाऱ्या माणसांची गोष्ट : लीना मेहेंदळे

युथफुल्ल सिनेमाच्या गोष्टींची गोष्ट : श्रीनिवास नार्वेकर

माणूस : खुर्चीअल्याडचा आणि पल्याडचा : अवधूत परळकर

बदलत्या तरुणाईची पाच कारणे व तीन समस्या!

: लक्ष्मीकांत देशमुख

मॅन + वुमन + नेबर्स... : विद्यासागर अध्यापक

तरुणाई विशेष

चौथा स्तंभ तिसऱ्या अवस्थेत : विनोद शिरसाठ

'जीवनावर प्रेम करा...' : संभाजी गंडमाळे

आजच्या जमान्याचा ''से'' : ऋचा करकरे

जावे ''टेकफेस्ट'' च्या गावा : क्षितिज देसाई

दॅट्स द वे वी मेट : सुदीप नगरकर

''मातीशी पाय घट्ट बांधलेला'' : डॉ. प्रिया आमोद

संपादकीय

'ज्योत से ज्योत जगाते चलो'

माझी महाराष्ट्र यात्रा संपवून परत आलो.

सातत्याने आजूबाजूची माणसं एकच प्रश्न विचारत होती.

'हे सगळं कसं बदलणार'

'हे सगळं म्हणजे काय मी ही प्रतिप्रश्न करतो

'हे सगळं दररोज वृत्तपत्रात येणार, टीव्हीवरती दिसणारं.'

'नेमकं काय म्हणायचंय तुम्हाला काय वाचता, काय दिसतं'

'अहो हेच की अत्यंत रद्दी राजकारण ,दररोजचे अब्जावधीमध्ये जाणारे घोटाळे, अनिर्बंध असे जागतिकीकरण, उदारीकरण आणि खासगीकरण, अस्ताव्यस्त झालेली समाजव्यवस्था, सांस्कृतिक दिवाळखोरी ..'

'आणखी काही ..'

'वाढती महागाई, सामान्य माणसाची दयनीयता, सगळीकडे पसरलेली उदासीनता ...रस्ते बघा, चालायला जागा नाही. गटारी नाहीत. आहेत त्या काम करत नाहीत. भ्रष्टाचार गल्लीपासून दिल्लीपर्यंत पसरलाय. शिक्षणापासून आरोग्य सेवेपर्यंत सगळं पार खाली पडत चाललयं. एकही गोष्ट पैशाशिवाय होत नाही.'

'तुम्हाला काय वाटतं कसं बदललं पाहिजे सगळं '

'सगळी सिस्टिम बदलली पाहिजे. सगळ्याला राजकारण जबाबदार आहे. राजकारणात गुन्हेगार आहेत त्यांनी बंदी घालावी. काळा पैसा देशात आणला पाहिजे. अध्यक्षीय प्रणाली आणली पाहिजे. जनलोकपाल का आणत नाहीत'

'ठीक समजलं ..सगळं समजलं.... तुम्हाला आणखी काही प्रश्न विचारतो.'

'हे बदलावं असं वाटणं हे जिवंतपणाचं लक्षण आहे. पण तो बदल यावा यासाठी तुम्ही काय करता'

'म्हणजे अहो एवढा मोठा आपला देश, मी काय करणार'

'तोच प्रश्न आहे. तुम्ही काय करणार एक सांगा तुम्ही कधी वाहतुकीच्या नियमांचं उल्लंघन केलंय म्हणजे परवाना नसताना वाहन चालवणं, सिग्नल तोडणं, वेगमर्यादा ओलांडणं..'

'हो अधूनमधून, पण सगळेच करतात हो..'

'अच्छा .. कधी पकडले गेलात पोलिसांकडून..'

'अजून तरी नाही..'

'नशीबवान आहात. तुमच्या ओळखीपैकी कुणी ..'

'अनेकजण पकडले गेलेत..'

'अशावेळी ते काय करतात. लगेच दंड करत असतील नाही का'

'अजिबात नाही. अहो दंड भरायच्या ऐवजी पाचपन्नास देतात पोलिसांनाही तेच हवं असतं.. क़ाही लोक ओळखी सांगतात आणि सुटतात.'

'हे तुमचे मित्र सगळे गरीब आहेत की त्यांचा लाच देण्यावर विश्वास आहे'

'नाही नाही रे. सगळे मध्यमवर्गीय. सतत तडजोड करावी लागते... तिथंही करतात.'

'अच्छा. जाऊ दे. दुसरा प्रश्न रस्त्यावरची घाण. तुम्ही रस्त्यावर कचरा टाकता की नाही हे विचारणार नाही पण इतर कुणी रस्त्यावर थुंकताना, लघवी करताना किंवा कागद, प्लास्टीक, बाटली, सिगरेटचे थोटूक फेकताना पाहिलेय कधी '

'हो अनेकदा ...अगदी सर्रास चालतो हा प्रकार !! मॅनर्सच नाहीत आपल्याकडे..'

'अशा लोकांना एकदा तरी 'थांबा तुमचं काहीतरी चुकतयं' असं कधी सांगितलत'

'पण कुणी ऐकतं का आपल्याकडे'

'सांगितलचं नाही तर कुणी ऐकणार तरी कसे जाऊ दे एक सांगा तुम्हाला वाटतं ना या सगळया गोष्टींना राजकारणी लोक जबाबदार आहेत. पण हे राजकारण सुधारण्यासाठी तुम्ही काय करता'

'ते तर त्यांनी सुधारायचं. त्यात माझ्यासारख्यांनी काय करायचं असतं..'

'सांगतो कधी तुम्ही राजकारण्यांना सांगितलंत की 'हे बाबांनो तुमचं चुकतंय. तुम्हाला सत्ता दिलीय सांभाळून वापरा. भ्रष्टाचार करू नका. आम्हाला पाणी, रस्ता, वीज हवा हे आहे ते द्या आणि असं केलं नाही तर आम्ही तुम्हाला जाब विचारू.'

'असं धाडस नाहीय आमच्यात. अहो यांच्याकडे गुंडगिरी असते. आम्हाला निकालात काढतील.'

'पण त्यांना निकालात काढायची किल्ली तुमच्या हातात आहे.'

'ते कसं काय'

'म्हणजे असं की तुम्हाला सध्या चाललेलं राजकारण आवडत नाही पण ते राजकारणी तुमचेच प्रतिनिधी असतात. तुम्हीच निवडता त्यांना मग रडत बसता. जाउ द्या. तुम्ही मतदान तर करत असालच. शेवटचं मतदान केंव्हा केलंत तुम्ही'

'खरं सांगू का मी मतदान केल्याचं मला आठवत नाही.'

'मग मीही खरं सांगू का तुम्ही गुन्हेगार आहात. या तुमच्या सगळया तक्रारींना कोणताच अर्थ नाही. तुम्हीच या खराब रस्त्यांना, अपुऱ्या व प्रदूषित पाण्याला, विजेच्या टंचाईला तुम्ही स्वत: जबाबदार आहात. दर पाच वर्षांनी तुम्हाला घटनेने दिलेला मताधिकार तुम्ही बजावत नाही. त्यामुळेच देशाची अशी अवस्था झाली आहे. स्वातंत्र्याची साठ वर्षे उलटूनही आज आपण एका घातक वळणावर उभे आहोत याचें कारण तुम्ही स्वत: आहात.'

'अहो पण मी एकटा काय करणार'

'तुमच्या एकटेपणाचे भांडवल नका करू. तुम्ही एकटे आहात हा तुमचा भ्रम आहे.'

'म्हणजे'

'म्हणजे असं की आपापल्या परीनं चांगलं काम करणारी असंख्य माणसं आपल्या अवतीभवती आहेत. नाव सांगू का शेतकऱ्यांचा प्रश्न उठवणारे साईनाथ, समाजकार्य करणारे आमटे आणि बंग..जैवविविधतेसाठी काम करणाऱ्या वंदना शिवा, भ्रष्टाचाराविरूद्ध आवाज उठवणारे अण्णा हजारे, पर्यावरणावर काम करणाऱ्या सुनीता नारायण असे एक ना अनेक लोक आपापल्या क्षेत्रात जबरदस्त काम करताहेत. त्यांच्यासारखं काम जमत नसेल तर त्यातल्या किंवा तत्सम कामाला सुरुवात करा.'

'हे मात्र खरं. विचार करण्यासारखी गोष्ट आहे.'

'विचार नका करू. 'कर के देखो'.... खूप झाला विचार आता, कृती करण्याची वेळ आली आहे. वाईटाला वाईट म्हणण्याची भीती वाटत असेल तुम्हाला पण चांगल्याला चांगलं तरी म्हणायला शिका..'

'अगदी खरं. स्वत: परिस्थिती बदलण्यासाठी पहिलं पाऊल उचललं तर समाज बदलेल. राजकारणी लोक काही आकाशातून पडत नाहीत. समाजातूनच पुढे येतात. त्यांच्यावर जनताच अंकुश ठेवू शकते. प्रत्येकानं योगदान केलं पाहिजे.'

'कसं बोलला. ज्योत से ज्योत जगाते चलो हेच खरं मग 'प्यार की गंगा' आपोआपच वाहू लागेल. शुभ दीपावली'

'शुभ दीपावली.. तमसो मा ज्योतिर्गमय'

– ज्ञानेश्वर मुळे

या गंधीत गोष्टीमधला क्षण कुठला विद्रुप नाही

नव्या जमान्याचा आघाडीचा गायक , संगीतकार सलील कुलकर्णी आणि ' नमस्कार'चं नातं जुनं आहे . नमस्कार च्या पहिल्या अंकाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले होते . सलीलनी 'नमस्कार'साठी दिलेली ही खास हलकी फुलकी मुलाखत . विशेषतः त्याच्या तरुणपणच्या आठवणी जागवणारी ..

*** तू एक यूथ आयकॉन आहेस. तुझी गाणी तरुणांमध्ये खूप फेमस असतात. आणि प्रत्येकाला आपला आयकॉन तरुणपणी कसा होता हे जाणून घ्यायचं असतं तर आम्हाला सांग की विशीतला सलील कसा होता**

- मी लहानपासूनच कशा ना कशातरी बाबतीत खूप पॅशनेट आहे. मग ते शाळेमध्ये असताना अभ्यास असो किंवा क्रिकेट असो. पुढे हार्मोनियम, नाटयसंगीत, काव्य, मेडिकलचा अभ्यास. मी सगळे पॅशनेटली केले. मला वाटतं रामदासांनी अगदी छान सांगितले आहे. देह कारणी लावावा आणि मला वाटतं मी तसं करतो म्हणजे जे काम करायचं ते पूर्ण मन लावून करायचं. कसंतरी काम करायला मला आवडत नाही. म्हणजे तुम्हाला मित्राशी गप्पा मारायच्या असतील तर मग तुमच्या लाडक्या मित्रांना बोलवा आणि फुलप्लेज्ड गप्पा मारा.

*** तू वयाच्या तिसऱ्या वर्षापासून हार्मोनियम वाजवतो आहेस आणि आता एक प्रथितयश संगीतकार, हा प्रवास कसा घडला**

- खरंतर आपण काहीच घडवत नाही. म्हणजे नदीच्या पुरात एखादं झाड जसं वाहून जातं तसं संगीतात वाहून जायचं असतं. म्हणजे एखाद गाणं बनवताना मी दहावेळा विचार करतो की अजून पंचवीस वर्षांनंतर माझ्या मुलांना त्यांच्या पुढच्या पिढीला माझ्या कामाचा अभिमान वाटला पाहिजे. असा विचार करत काम होत गेलं. लोकांनी अस म्हणता कामा नये की अरे याचे हे गाणे ऐकू नका. खरतर ओव्हरऑल हा प्रवास खूप सुंदर झाला आणि माझ्यापेक्षा तुम्हा रसिकांमुळे तो जास्त खुलत जातोय..

*** आणि तुझं प्रत्येक गाणं कोणा ना कोणाला तरी आवडतेच. ही जादू कशी काय**

हीट आणि फ्लॉची प्रत्येकाची व्याख्या वेगळी असते. एखाद्या गाण्यावर एखाद्या घरात वेगवेगळया पिढयांमध्ये चर्चा होणे याला मी हीट म्हणू शकतो. गाणं हे तुमच्या मनापर्यंत पोहोचले पाहिजे. कोणतरी त्या गाण्यात रमले पाहिजे. कोणीतरी विचार केला पाहिजे , कोणाच्यातरी डोळ्यांत पाणी आलं पाहिजे. कुणीतरी गाणं ऐकून जुन्या मित्राला फोन केला पाहिजे. कोणीतरी त्याच्या बायकोला सरप्राईज दिल पाहिजे . खरंतर हे ना फिजिक्ससारखे आहे. तुम्ही जितक्या जास्त फोर्सने ते गाणं करता तितके ते समोरच्याच्या मनाला खोलवर भिडते.

*** तुझी आणि संदीप खरेची जोडी कशी जमली**

जोडी जमली असं म्हणता नाही येणार. आम्ही भेटलो. म्हणजे आम्ही एकमेकांना खूप वर्षे ओळखतो. ओळख झाली म्हणून चला गाणी बनवू असा आमचा दोघांचाही स्वभाव नाही. म्हणजे मी एकदा त्याला विचारलं की या चालीवर गाणं लिहिशील का आणि त्याने लिहिलं. आणि मग आमच्या लक्षात आलं की आमचं १ + १ = ११ असं होतंय. आणि आमचं जमतं. किंबहुना आमच्यापेक्षा माझ्यातला संगीतकार आणि त्याच्यातल्या कवीचं जास्त जमतं. त्यामुळे खूप चांगली कामे होत आहेत .

*** तू कॉलेजध्ये असल्यापासून हार्मोनियम वाजवतोस म्हणजे अशी कलाकार असणारी मुलं नेहमी लाईमलाईटमध्ये असतात तसा तू होतास का**

-अर्थात होतो. म्हणजे नेहमीच गॅदरिंगमध्ये असायचो. पण कसं आहे मेडिकलच्या अभ्यासातून जितकं जमलं तितकंच मी करू शकलो. कारण मेडिकल ला एक पुस्तक कसबसं वर्षातून एकदाच ऐकायला वेळ मिळतो. पण आतमध्ये एका ट्रॅकवर म्युझिक सुरूच

असतं. शंकराच्या पिंडीवर जसा सतत अभिषेक होत असतो तसंच.

*** लाईमलाईटचा एखादा फायदा सांग ना**

- फायदा म्हणजे माझ्या ज्या तोंडी परीक्षा व्हायच्या तेव्हा ते शिक्षक मी आत गेल्यावर म्हणायचे वा. त्यादिवशी खरंच मजा आली हां आणि मग थोडेफार प्रश्न विचारायचे म्हणजे माझी विवा खूप मायेने घ्यायचे.

*** एखादी मुलगी होती का तुझ्या मागे लागलेली**

-एकच का खूप होत्या पण मी त्यात करिअर केलं नाही. नाहीतर आता इतका चांगला संगीतकार बनू शकलो नसतो. म्हणजे त्याचीसुध्दा एक मजा असते. तुम्ही कसे दिसता त्यापेक्षा तुम्ही कसे गाता हे गायकासाठी महत्त्वाची असते. म्हणजे मी स्टेजवर गेल्यावर लोकांनी उभं राहून शिट्ट्या मारण्यापेक्षा बऱ्याच वर्षांनंतर मला बघून लोकांना जर नमस्कार करावासा वाटला तर ते माझ्यासाठी जास्त अभिमानास्पद असेल.

*** कॉलेजमध्ये एखादी केमिस्ट्री जुळली का**

- हो कॉलेजमध्ये माझं खूप मोठं अफेअर होतं आणि त्याचा तसा फायदाही झाला. म्हणजे त्या त्या वयात तुमच्या इमोशन्स करेक्ट ट्रॅकवर ओपन झाल्या की तुमचा विषय फुलत जाता. म्हणजे शाळेत असताना मैदानी खेळ खेळलेच पाहिजेत. आणि हे करत असताना प्रेमात पडलंचं पाहिजे. मग ते यशस्वी होवो की न होवो, तेव्हा प्रेमात नाही पडलात तर तुम्ही काय केलंत

*** मग काय की तिला प्रपोज केलंस की इम्प्रेस करायला काय केलेस**

- नाही कधीच नाही. ती इम्प्रेसड होतीच आणि मी कधीच कोणाला प्रपोज केलं नाही की अशी वेळ आणायची की ती मुलगीच मला येऊन प्रपोज करेल.

*** तुझ्या आताच्या कविता मनाला खूप स्पर्श करतात. तू त्या वयात असताना त्या वेळच्या भावना काय होत्या**

-तेव्हाही प्रत्येक गोष्टीकडे मी सेन्सिटेबलीच बघायचो .म्हणजे मी अर्धा तास गाडी थांबवून फक्त गल्ली क्रिकेट बघितला आहे. एकदा टीव्हीवर 'न जाओ सैया' लागले होते ते बघताना पण मी टीव्ही समोर उठू शकलो नाही. म्हणजे हे असं मनस्वी जगणं चांगलं की नाही मला माहीत नाही पण मला तसं जगायला आवडतं. आणि तेच बहुतेक माझ्या गाण्यात उतरतं.

*** मग कितवे प्रेम यशस्वी झाले?**

-त्याचा मी काउन्ट नाही ठेवला. किती गाणी हिट झाली यापेक्षा गाणी बनवण्याला वाहून घ्यावे. तसंच ते क्षेत्र असतं म्हणजे संदीपने म्हटले आहे तर-

मी फसलो म्हणून हसू रे वा चिडू रे
कोणी ती वेळच होती वेडी आणि नितांत लोभसवाणी
ती हार असो वा जित पण कसले अप्रूप नाही
त्या गंधीत गोष्टीमधला क्षण कुठला विद्रूप नाही.
त्याप्रमाणे कोणताही क्षण विद्रूप नव्हता एवढे खरे.

*** तुमच्यावर पुण्याचा प्रभाव किती आहे**

१०० टक्के... कारण प्रत्येकावर आपल्या गावाचा प्रत्येकावर प्रभाव असतो म्हणजे कार्यक्रमानंतर मला कोणी भेटायला आलं तर दोन मिनिटात मी ओळखतो की तुम्ही मुंबईचे की नागपूरचे का कोल्हापूरचे म्हणजे तो माणूस म्हणाला की मी तिथे पाठीच उभा होतो की समजायचे हा मुंबईचा किंवा एखादा माणूस म्हणाला की मला तुमच्या गाण्यातल्या दोन गोष्टी आवडल्या म्हणजे तो नक्की पुणेकर आहे आणि तुम्ही कोल्हापूरकर म्हणजे मी फोन केला की म्हणणार हा हा बोला की तशी प्रत्येक गावाची आपली मजा असते.

आजकाल असं झालयं की मुलना कलेमध्ये, खेळामध्ये रस असतो, पण पालकांची इच्छा असते की अभ्यासात यश मिळवावे

*** तुझ्याबाबतीत तसं झालं होतं का**

- झालं होतं. म्हणजे एमबीबीएसनंतर एम.डी. न करता मी म्युझिक करायचं ठरवलं. पण आजकाल असं ओ की २/१० मुलांनाच जिनीयस इंटरेस्ट असतो. कलेत, बाकी अभ्यास नको म्हणून हे करतात. हे चुकीचं आहे आणि काही झालं तरी माझ्यामते कम्युनिकेशन स्कील, टाईम मॅनेजमेंट एक प्रगल्भता येण्यासाठी पदवीपर्यंत शिक्षण घेणं महत्वाचं आहे.

> **तुम्ही कसे दिसता त्यापेक्षा तुम्ही कसे गाता हे गायकासाठी महत्त्वाची असते. म्हणजे मी स्टेजवर गेल्यावर लोकांनी उभं राहून शिट्ट्या मारण्यापेक्षा बऱ्याच वर्षांनंतर मला बघून लोकांना जर नमस्कार करावासा वाटला तर ते माझ्यासाठी जास्त अभिमानास्पद असेल.**

*** तुझ्या स्ट्रगलबद्दल सांग. सुरुवातीचा काळ कसा होता**

-मी मघाशी म्हटल्याप्रमाणं मी कधी कोणाकडे काम मागायला गेलो नाही. मी १०-१५ गाणी बनवली की एखाद्या कार्यक्रमात ४-५ सादर करायचो. महत्त्वाचं म्हणजे सुरुवातीला, पहिली दाद जी मिळाली ती म्हणजे शांता शेळके, पु.ल. , सुधीर मोघे यांच्याकडून आणि योग्यवेळी हा असा पाठीवर हात पडणं महत्त्वाचं असतं.

*** आतापर्यंत बेस्ट आठवणीत राहणारी कॉमेंट**

- मी १९९९ साली एक अल्बम केला होता 'स्वप्नात पाहिली राणीच बाग' त्यानंतर घरी एक फोन आला. नमस्कार मी पी. एल. देशपांडे बोलतोय. तुमची बालगीतं खूप आवडली आणि घरी या कधीतरी, गप्पा मारायला आवडेल मला.....आणि सारेगमप मध्ये हृदयनाथ मंगेशकर म्हणाले होते, 'मी यांचा खूप मोठा फॅन आहे म्हणजे लहानपणापासून मी ज्यांचा फॅन आहे त्यांनी हे म्हणणं यापेक्षा मोठा आनंद नाही.'

*** कोणाला आयोडॉईज करता**

- खूप जण आहेत, हृदयनाथ मंगेशकर, सुधी फडके, अभिषेकी बुवा, खळेसाहेब, शंकर महादेवन, रेहमान हे सगळेच खूप मोठे कलाकार आहेत आणि त्यांच्यासारखं काम करायला आवडेल.

*** फॅमिली सोबतचा बेस्ट क्षण कोणता**

- शुभंकर पहिल्यांदा गात होता. मी, अंजली, संदीप सगळे बसलो होतो आणि गाणं संपलयावर सगळे स्तब्ध झाले होते. तो ज्या पंचने, एक्स्प्रेशन देऊन गायला.. बेस्ट क्षण.

*** तुमची गाणी ऐकून किंवा बनवताना तुम्हाला कॉलेजचे कोणते दिवस आठवतात कोणते मित्र आठवतात**

-मित्र. मी सगळ्या जुन्या मित्रांच्या कॉन्टॅक्टमध्ये आहे. आणि बाकी प्रत्येक गाण्यात कॉलेजचा रेफरन्स असतोच, एखादी सुरावट, शब्द, कल्पना काहीतरी..

*** कॉलेजमध्ये स्टडीअस होता का**

- हे म्हणजे गायकाला विचारण्यासारखं आहे की तुम्ही सुरात गाता का असायलाच हवं... त्याने तसं एमबीबीएस म्हणजे अभ्यास आलाच.

*** कॉलेजमध्ये कशी धमाल करायचा**

- क्लिनिकच्या बाहेर गप्पा मारायचो आम्ही मित्र, पण ती खूप इंटेलेक्चअल मजा असायची. आम्ही कधीच दारू पिवून दंगा केला नाही. प्रत्येकाची धमाल करायची पद्धत वेगळी असते.

*** कॉलेजमधली कोणती गोष्ट पुन्हा करायची आहे**

कट्ट्यावर बसून गप्पा ! इतकंच !!!

अभिव्यक्त होण्याची माध्यमे गवसली, पण विचार करायला कोण शिकवणार

सामान्य माणूस वाटतो तेवढा भाबडा नसतो. व्यवस्था त्याला जशी वापरून घेते, तसेच सामान्य माणूसही व्यवस्थेला वापरून घेत असतो! कारण त्याला विचार न करता शॉर्टकटचे स्वार्थ हवे असतात. त्यातून होते ते मात्र दीर्घकालीन नुकसान. दुसरीकडे, सामान्य माणसाच्या वतीने विचार करण्याचे कंत्राट काही जणांना दिले जाते. त्यातून हितसंबंधांची नवी साखळी तयार होते. तिसरीकडे, प्रस्थापित व्यवस्थेला हा सामूहिक अविवेक हवाच असतो. या अविवेकाला दूर करण्याऐवजी अविवेकाचेच राजकारण करण्याचा प्रयत्न मग व्यवस्था करते. जागतिकीकरण आणि लोकशाही या मिश्रणातून आकारास आलेल्या आपल्या नव्या जगासमोर हे पेच आहेत... अशा अनेक पैलूंवर भाष्य करणारा हा दीर्घ निबंध.
संजय आवटे यांनी 'नवे जग आणि विचारांचा जागर' या विषयावर नुकतेच नवी मुंबईत जे व्याख्यान दिले, त्याचे अनुजा लिमये यांनी केलेले हे शब्दांकन.

एकविसाव्या शतकात ज्या अंतर्विरोधाचा सामना आपण करत आहोत, त्याकडे मला तुमचे लक्ष वेधायचे आहे. एकीकडे आपण अतिशय प्रगत आणि आधुनिक अशा टप्प्यावर प्रवेश केला आहे आणि त्याचवेळी आपले जगणे कमालीचे अविवेकी व्हावे अशी स्थिती उद्‌भवलेली आहे. अभिव्यक्तीची आणि माहितीची साधने एवढ्या झपाट्याने वाढत चालली आहेत, पण विचार करण्याची साधने मात्र आकसत आहेत. आपल्यासमोर हा पेच आज उभा आहे.

एक गोष्ट आपण लक्षात घ्यायला हवी आणि ती म्हणजे, विचार करणे ही माणसाची मूलभूत सवय असली तरी विचार करण्याचे टाळणे हीही त्याची स्वाभाविक, सहज अशी प्रवृत्ती आहे. तुम्ही विचार करायला का घाबरता, असे गोपाळ गणेश आगरकर म्हणाले त्याला अनेक वर्षे उलटून गेली. पण आजतागायत तो प्रश्न कायम आहे. उलटपक्षी अधोरेखित होत गेला आहे. शक्यतो विचार करायचे टाळणे लोकांना आवडते. कारण विचार करायचा म्हणजे सूर्याच्या तेजात, आगीत होरपळून जायचे. त्यापेक्षा अविचाराने वागणे सोपे असते. म्हणून माणसांनी चाकोऱ्या निर्माण केल्या. चाकोरीमध्ये तोचतोचपणा असेल पण सुरक्षितता असते. त्यामुळे विचार करण्याच्या फंदात न पडणे लोकांना आवडते. याचा अर्थ ते अविचार करतात असे नाही, पण न विचार करताना मात्र दिसतात. थुंकू नका असे फलक सर्वत्र रस्त्यांवर दिसतात. पण ते आपण कधी गांभीर्याने घेत नाहीत. याउलट 'थिंकू नका', असे फलक कुठेही नसतात, पण ते आपण डोक्यात घट्ट मारून घेतले आहेत. अप्रगत समाजात माणसे अशी वागत असतात तेव्हा चालते फारतर, पण समाजाची लौकिक प्रगती होत असताना विचारापासून असे दूर जाणे हे खरे नाही. कारण त्यातून दुभंग समाज जन्माला येत असतो. असा स्किझोफ्रेनिक समाज अनेक समस्या निर्माण करतो.

खरे तर, मानवी प्रगतीचा इतिहास काय सांगतो प्रगती सर्व क्षेत्रात होत असते. म्हणजे असे कधीच होत नाही की एखादा समाज वैज्ञानिक क्षेत्रात कमालीचा प्रगत आहे पण तेथे अन्य ज्ञानशाखा विकसित झालेल्या नाहीत. कारण ही प्रगती समांतर असते. ती परस्परपूरक आणि परस्परसुसंगत असते. साधी गोष्ट पाहा, एकोणीसावे-विसावे शतक ज्यांनी प्रभावित केले अशी तीन माणसे आपल्याला ठाऊक आहेत. कार्ल मार्क्स, चार्ल्स डार्विन आणि सिग्मंड फ्राइड हे ते तीन महामानव. या तिघांनी मानवी जगणे अधिक समृद्ध केले. त्यांनी जे काही मांडले ते विसाव्या आणि एकविसाव्या शतकाने खोडून काढले हे खरे, पण म्हणून त्यांचे मोल तुम्ही नाकारू शकत नाही. कारण या तिघांनी सर्वप्रथम असा काही विचार मांडला ज्यामुळे जग पुढे गेले. प्रत्यक्षात मार्क्स, डार्विन आणि फ्राइड हे तिघे परस्परांना भेटले नाहीत. त्यांचे क्षेत्र एक नाही. मार्क्स हा समाजकारण, अर्थकारण यांचा अभ्यासक. डार्विन हा जीवशास्त्रज्ञ. फ्राइड हा मानसशास्त्रज्ञ. त्यांची क्षेत्रे वेगळी. पण हे सर्व शोध एकाच काळात लागावेत याला योगायोग नाही मानता येत. ओरिजिन ऑफ स्पेसिजचा कर्ता चार्ल्स डार्विन, त्यांचा तो प्रबंध आला मध्ये. माणूस उत्क्रांत कसा होतो याविषयीची मूलभूत मांडणी त्याने त्यात केली. मानवी अस्तित्वाचे गूढ उकलण्याचा तो प्रयत्न होता, असे मानले पाहिजे तर त्याचा हा प्रबंध आला मध्ये. आपल्या सैद्धांतिक मांडणीच्या बळावर नवे जग जन्माला घालणारा, जगाची फेरमांडणी करणारा कार्ल मार्क्सचा कम्युनिस्ट मॅनिफेस्टोचा. मार्क्सने मानवी अस्तित्वाचे विश्लेषण लौकिक स्तरावर करत अवघ्या मानवी समुदायाला नवे स्वप्न दिले. हे स्वप्न त्याने दिले मध्ये. त्यानंतर सिग्मंड फ्राइड या मानसशास्त्रज्ञाने या मानवी स्वप्नांचा अर्थ लावला. त्याचे इन्टरप्रिटिशन ऑफ ड्रिम्सचे. याचा एकूण अर्थ इतकाच की, आमचे कुमार केतकर, बदलते विश्व या ग्रंथात म्हणतात त्याप्रमाणे, जगात जे काही घडते त्यामध्ये समान सूत्र असते. सर्व पातळ्यांवर जग वाढत असते.

जगाचा कोणताही काळ बघा. जी संस्कृती अजिंक्य ठरते ती सर्व पातळ्यांवर त्या दर्जाची असते. फार इतिहासात नको जायला. अगदी आताची अमेरिकी आणि त्यापूर्वीची रशियन संस्कृती पाहा. आज अमेरिकन ड्रिम लोकांना खुणावते. पूर्वी रशियन स्वप्न आकर्षित करत असे. या दोहोंचे वैशिष्ट्य काय आहे त्यातील विरोधाभास सोडा. पण अर्थकारण, लष्कर याप्रमाणेच साहित्य,

संस्कृती, विज्ञान अशा सर्व स्तरांवर या देशांनी आघाडी घेतलेली दिसते. आजची अमेरिका पाहा. ती फक्त बुश वा बराक ओबामांची अमेरिका नाही, ती हॉलिवूडची अमेरिका आहे, ती मायकेल जॅक्सनची अमेरिका आहे, ती नोम चोम्स्कीची अमेरिका आहे. जगणे हे असे सर्वंकष असते.

या पातळीवर विचार करता आपले आजचे जगणे स्किझोफ्रेनिक होत चालले आहे का, असा प्रश्न पडतो. नवे जग ज्याला आपण म्हणतो, त्याचे व्यवच्छेदक लक्षण काय आहे माहितीचा स्फोट अशी संकल्पना वारंवार वापरली जाते. माहिती मिळवण्याची उदंड साधने आहेत. पूर्वी एखादा साधा संदर्भ मिळवायचा तर कोण कष्ट पडत! जे जुने पत्रकार आहेत ते सांगत असतात की एखाद्याचे निधन झाले तर त्याचा जीवनपट वा माहिती तयार करण्यासाठी ग्रंथालये धुंडाळावी लागत. पुस्तके वाचावी लागत. शिवाय डेडलाईनचे प्रेशर असे ते वेगळेच. आता ती अडचण अजिबात नाही. इंटरनेट आणि गुगलच्या जगात माहितीचे एवढे स्रोत आहेत की तासापूर्वी त्या क्षेत्रात अडाणी असणारा माणूस तासाभरात त्यात असा वाक्बगार होतो की अभ्यासू असा लेख लिहू शकतो वा भाषण ठोकू शकतो. माहितीचा साठा हे नव्या युगाचे वैशिष्ट्य आहेच. अर्थात ते तेवढेच नाही. माहिती मुक्त असणे हे नव्या जगाचे खरे वैशिष्ट्य आहे. आपण आजवर पाहिले आहे की

माहितीवरील मक्तेदारी हे जुन्या काळाचे वैशिष्ट्य होते. किंबहुना त्यावर अनेकांची सत्ता अवलंबून होती. आपल्याकडे ब्राह्मणी व्यवस्थेविषयी असे सांगता येईल. दूर कशाला, अमेरिकेने जे सामर्थ्य निर्माण केले, त्यामध्येही माहितीवरील मक्तेदारीचा फार मोठा वाटा होता. आता मात्र माहिती मुक्त आहे. पण, एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी. डाटा -माहिती आणि ज्ञान यात फरक आहे. ज्ञान आणि शहाणपण यात फरक आहे. माहितीचे रूपांतर ज्ञानात करणे, ज्ञानाचे रूपांतर शहाणपणात करणे हे खरे आव्हान विवेकवादासमोर आहे. हे शहाणपण आज दुर्मिळ होत चालले आहे. केवळ माहितीची साधने वाढल्यामुळे ज्ञान वाढते असे नाही. किंवा शहाणपण वाढते असे नाही. त्यासाठी तो दृष्टिकोन विकसित व्हावा लागतो. अशी शहाणी माणसे कमी आहेत. असे शहाणपण अभावात्मक आहे.

महात्मा गांधी यांच्याविषयी या संदर्भात बोलायला हवे. मी स्वत: कम्युनिकेशन सायन्सचा विद्यार्थी. आम्हाला संवादाचे अनेक सिद्धांत अभ्यासाला होते. त्यापैकी एक होता- मास लाईन कम्युनिकेशन थिअरी. महात्मा गांधी आणि माओ हे दोघे संवादाची जी पद्धती वापरत त्यावरून ही थिअरी विकसित झाली. माओ आणि गांधी या दोघांचे वैशिष्ट्य हे की त्यांनी अवघा देश पिंजून काढला. आपल्या मूल्यांसोबत देश उभा केला. भारत आणि चीन हे ते दोन देश. लोकसंख्या महाकाय. अभिव्यक्तीची माध्यमे नाहीत. साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प. अशावेळी लोकांपर्यंत पोहोचणे हे सोपे काम नव्हते. पण, या दोघांनी ते केले. कसे केले ही थिअरी म्हणते, त्यांच्या संवादाचा पाया होता, सर्वसामान्य माणसाच्या शहाणपणावरचा विश्वास! सामान्य माणूस शहाणा असतो. कारण शहाणपण ही वेगळी गोष्ट आहे. हे शहाणपण विकसित करण्याचे आव्हान आज आपल्यासमोर आहे.

विवेकवाद हा शब्द प्रामुख्याने वापरला जातो तो शिरीपळपस च्या संदर्भात. कान्ट म्हणतो ते महत्त्वाचे आहे. All our knowledge begins with the senses, proceeds then to the understanding, and ends with reason. There is nothing higher than reason. हे प्रयोजन शोधणे अतिशय अपरिहार्य असे काम असते. जगण्याचे प्रयोजन शोधणे हे आध्यात्मिक काम नाही. ते लौकिक कामही आहे. इथे संबंध येतो तो विवेकाचा. त्यासाठी शहाणपणाची गरज असते. कान्ट म्हणतो त्याप्रमाणे, Science is organized knowledge. Wisdom is organized life. रोजच्या जगण्यात विवेकाचा संबंधही येऊ नये, अशी जीवनशैली आपण विकसित केली आहे. म्हणून तर मुलींचे लवकर लग्न केले म्हणजे बलात्कार कमी होतील, असे खप पंचायत सांगू शकते. मुली कमी कपडे घालतात म्हणून त्या शोषणाला बळी पडतात असे कोणाला वाटू शकते आणि परप्रांतीय आहेत म्हणून या राज्याची प्रगती खुंटली आहे, असे एखादा नेता म्हणू शकतो. हे असे विचार त्या युगात पसरावेत जे युग माहितीचे आहे, ज्या जगातील अर्थकारण ज्ञानाधारित आहे! हे फक्त भारतात सुरू आहे असे नाही. जगभर असा अविवेक दिसतो. विकसनशील देशात त्याचे प्रमाण मोठे आहे. भारतही अर्थातच अपवाद नाही. स्त्री-पुरुष संबंधांच्या संदर्भात हे आणखी

> **बाई म्हणजे शरीर असा एक रानटी समज आपण करून घेतला आहे, त्याचा पाया अविवेक हाच आहे. बाई दिसली रे दिसली की तिच्याकडे ज्या प्रकारे पहिले जाते, त्या नजरांचा अभ्यास झाला तर कदाचित हे जाणवेल. राष्ट्रीय महिला आयोग आणि भारतीय स्त्री शक्ती यांनी मध्ये क्रीडा क्षेत्रातील महिलांबद्दल केलेला जेन्डर स्टडी त्यादृष्टीने बोलका ठरावा. बाईकडे आपण किती शारीर पद्धतीने पाहतो, हे अगदी साध्या साध्या संभाषणातून जाणवते.**

प्रकर्षाने जाणवते. खाप पंचायत काय म्हणते ते अपवादात्मक नाही. असा विचार करणारे अनेकजण आहेत.

लिंग समभाव जाणीव जागृतीच्या अनुषंगाने एक राज्यस्तरीय कार्यशाळा मागे पुण्यात झाली. तिचे उद्घाटन माझ्या हस्ते झाले. तेव्हाही विवेकाचा हा मुद्दा उपस्थित झाला. बाई म्हणजे शरीर असा एक रानटी समज आपण करून घेतला आहे, त्याचा पाया अविवेक हाच आहे. बाई दिसली रे दिसली की तिच्याकडे ज्या प्रकारे पहिले जाते, त्या नजरांचा अभ्यास झाला तर कदाचित हे जाणवेल. राष्ट्रीय महिला आयोग आणि भारतीय स्त्री शक्ती यांनी मध्ये क्रीडा क्षेत्रातील महिलांबद्दल केलेला जेन्डर स्टडी त्यादृष्टीने बोलका ठरावा. बाईकडे आपण किती शारीर पद्धतीने पाहतो, हे अगदी साध्या साध्या संभाषणातून जाणवते. पानटपरी सोडा, अगदी अनेक शाळा-महाविद्यालयांच्या स्टाफरूममधील चर्चेतही ते जाणवते. कारण ते खोल रुतून बसले आहे. पण, म्हणून ते बदलणार नाही असे नाही. नव्या पिढीवर आपण तो संस्कार करू शकतो. करायला हवा. नवी पिढी त्यादृष्टीने अधिक मुक्त आणि निकोप आहे हे खरे, पण तरीही काही प्रयत्न जाणीवपूर्वक करावे लागतील. सध्याचे चित्र मात्र वेगळे आहे. लिंगभेदापल्याड आपण गेलो आहे, असे दिसत नाही. स्त्री-पुरुष नातेसंबंधात तो मोठा अडसर आहे. शिवाय हे पुरुषांचे आहे असे नव्हे. खुद्द बायकाही बायकांकडे आणि म्हणून स्वत:कडे पुरुषी नजरेतून पाहतात, असा निष्कर्ष आहे. कारण त्याही याच व्यवस्थेत जन्मल्या आहेत. त्यामुळे एक बाईच दुसऱ्या कर्तृत्ववान बाईचे मूल्यमापन करताना, कथित चारित्र्याचे निकष लावून तिचे अवमूल्यन करताना दिसते. 'Womans anatomy is her destiny.' हाच विचार आजही मांडला जात असेल तर त्याकडे गांभीर्याने पाहायला हवे. कारण, एकीकडे मुक्तपणे वावरणारी बाई आणि दुसरीकडे बाईकडे अशा प्रकारे पाहणारी नजर हे मिश्रण भयावह ठरू शकते. बाईचा मुक्तपणा नाकारणे हे त्यावरील उत्तर नाही, तर हे डोळे बदलणे हा मार्ग आहे. कोणे एके काळी बाईला आपले शरीर हे ओझे वाटत असे. कारण या सगळ्या विखारी नजरा झेलत तिला चालावे लागत असे. आजच्या मुलींनी हे ओझे भिरकावून दिलेले दिसते. स्लीवलेस शर्ट, शॉर्ट अशा पेहरावात या मुली ज्या आत्मविश्वासाने वावरतात, त्यावरून शरीरापलीकडे जाण्याचा त्यांचा निर्धार दिसतो. पण तरीही एक पारंपरिक घडण आहे. असे म्हणतात की बाई जन्माला येत नाही. ती घडवली जाते. ही घडण कशी होते, ते समजून घ्यायला हवे.

या संदर्भात एक किस्सा पुन्हा सांगायला हवा. किस्सा पु.लंचा! पु. ल. देशपांडे आणि सुनीताबाई मोटारीतून कुठेतरी चालले होते. पु. ल. देशपांड्यांना कार चालवता येत नसे. तर, सुनीताबाई एकदम धडाडीच्या आणि आक्रमक. त्यांना वेगात कार चालवणे आवडायचे. एकदा असेच दोघे निघाले होते. अर्थातच सुनीताबाई कार चालवत होत्या आणि शेजारच्या सीटवर पु. ल. बसलेले. एका छोट्या गावात ते गेले, तेव्हा तिथल्या घोळक्यातला एक पोरगा ओरडला, ए, बघ, बघ. तो बाबा त्या बाईला गाडी शिकवतोय बघ! । सुनीताबाईंना धक्काच बसला. पण, त्या पोराचे गणित वेगळे होते. बाबाला गाडी चालवता येणारच आणि तोच बाईला शिकवणार, असा त्या चिमुरड्याचा समज. असे समज घेऊनच माणसे जन्माला येत. त्या समजासह जगत. पण, आज असे कोणाला वाटू नये, एवढे आपले जगणे बदलले आहे. गाडी चालवणारी बाई वा मुलगी दिसली तर वळून बघण्याचीही गरज भासू नये, एवढे ते नित्याचे झाले आहे. सगळे असे बदलले की मानवी संबंधांचे स्वरूपही त्यासोबत आमूलाग्र बदलले. पण ते आपोआप बदलत नाही. त्यासाठी खास प्रयत्न करावे लागतात. पण ते केल्याशिवाय आपल्यासमोर पर्याय नाही. विवेकाच्या अनुषंगाने हे फक्त एक उदाहरण.

हा अविवेक दूर करण्याऐवजी या अविवेकाचे राजकारण करण्याचा प्रयत्न व्यवस्थेकडून होत असतो. प्रस्थापितांना असा अविवेक हवाच असतो. किंबहुना त्यातच त्यांचे हितसंबंध असतात. हा अविवेक सर्व क्षेत्रांत असतो. त्यात केवळ श्रद्धा-अंधश्रद्धा एवढाच मुद्दा असतो, असे नाही. मग तो विकासाचा आराखडा असो वा निवडणुकीचा आखाडा असो, लग्नाचा मंडप असो की घराचा उंबरठा असो, सगळीकडे पायाच अविवेकाचा असेल तर यापेक्षा वेगळे काय होणार! भारतात सध्या ज्या समस्यांना आपण तोंड देत आहोत त्याचे मुख्य कारण हे आहे. विवेकाचे बोट सुटले की सगळीच कोंडी होते. आपण खापर कधी राजकारणावर फोडतो तर कधी जागतिकीकरणावर. कधी ते भांडवलवादावर फुटते तर कधी माध्यमांवर. पण एकमेव कारण खरे आहे. ते म्हणजे विवेकाचे बोट आपण सोडले आहे. त्याला आणखी एक पदर आहे. व्यक्तिगत जीवनात आपण दांभिक आहोत आणि सामूहिक जीवनात अविवेकी. हा पेच आज आपल्यासमोर आहे.

एरिक फ्रॉमचे 'द फिअर फ्रॉम फ्रीडम' नावाचे अप्रतिम पुस्तक आहे. अनेकांना ते ठाऊक असेल. आपल्या आ. ह. साळुंखे यांनी ते मराठीत आणले आहे. स्वातंत्र्याचे भय या नावाने. स्वातंत्र्य ही मानवी प्रेरणा असते हे खरे, पण स्वातंत्र्याचे भयही माणसाला असते. कारण स्वातंत्र्य असे म्हणत आपण बाह्य घटकांचा आणि लौकिक बाबींचा विचार करतो. ते ठीक आहे. पण, पुढे काय स्वातंत्र्य ही संकल्पना अनेक आयामी आहे. या पुस्तकात आधुनिक माणसाच्या दोन गोष्टींकडे त्यांनी लक्ष वेधले आहे. एकाचवेळी

या दोन्ही गोष्टी सुरू असतात. त्यापैकी एक म्हणजे आधुनिकीकरणामुळे तो स्वतंत्र, स्वावलंबी आणि समीक्षक असा होतो, पण त्याचवेळी तो एकटा, सुटा आणि भित्रा असाही होतो. हा अंतर्विरोध आहे. मजा अशी आहे की, मानवी इतिहासात स्वातंत्र्यासाठीचे अनेक लढे आहेत. स्वातंत्र्याच्या बाह्य शत्रूंना माणसाने पराभूत केले. मग हे शत्रू कोणतेही असोत. सरंजामी व्यवस्था असो, राजेशाही असो, धर्मांधता असो, हुकुमशाही वा वर्णविद्वेष असो यांचा पाडाव करत या मुक्कामापर्यंत माणूस पोहोचला. पण, स्वातंत्र्याचे जे शत्रू त्याच्या आत वसत आहेत, त्यांचा पाडाव कसा करायचा, हा प्रश्न आधुनिक माणसासमोर आहे. म्हणजे असे की अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे हे खरे. त्यामुळे त्याला जे हवे ते तो बोलू शकतो. पण, मुळात आपल्याला काय हवे आहे, हे कसे समजणार कारण अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य मिळेल, पण विचार करण्याचे काय तुम्ही विचार कसा करावा यावर प्रभाव पडणारे अनेक घटक असतात, ते तुम्हाला विचारच करू देत नाहीत. तुम्ही तो विचार कराल, की जो तुमचा नाहीच, तर स्वातंत्र्य फक्त अभिव्यक्तीचे मिळून काय उपयोग तुमची जगण्याची शैली कोणीही डिक्टेट करू शकणार नाही, असे स्वातंत्र्य आहे हे खरे. पण मग तसे असेल तर समाज काय म्हणेल आणि जग काय म्हणेल याचा परिणाम तुम्ही स्वत:वर करून घ्याल तर मुक्त वा स्वतंत्रपणे जगण्याची शैली विकसित कशी करू शकाल! अशा स्थितीत स्वातंत्र्याचा संदर्भ तो काय! हा मुद्दा मी फार वरवर पद्धतीने मांडला आहे. पण हा गुंता आधुनिक माणसाचा आहे. एकाचवेळी तो खूप बलवान झाला आहे आणि त्याचवेळी कमालीचा असहाय. विवेकाचे बोट सुटण्याला हा संदर्भही आहे.

“ भारताच्या संदर्भात या विवेकाला आणखी मुद्दा आहे. आपली वैशिष्ट्ये अनेक आहेत. पण, सगळ्यात महत्त्वाचे वैशिष्ट्य काय असेल तर आपण दांभिक आहोत. म्हणजे चार लोकात कसे वागायचे आणि खासगीत कसे वागायचे हे आपण परस्पर ठरवून टाकलेले असते. जाहीरपणे काय म्हणायचे आणि प्रत्यक्षात काय म्हणायचे यातील द्वैत ठरवलेले असते. हे जास्त भयानक आहे. त्यामुळे जाहीरपणे हुंडा वाईट असे म्हणायचे, पण प्रत्यक्षात तो घ्यायचा, जाहीरपणे लग्नाच्या सध्याच्या विधींना विरोध करायचा पण प्रत्यक्षात वेळ येईल तेव्हा पारंपरिक पद्धतीनेच विवाह सोहळे साजरे करायचे, जात-धर्म मी मानत नाही असे म्हणायचे, पण वेळ येईल तेव्हा त्या सगळ्या भिंती अधोरेखित करायच्या.

भारताच्या संदर्भात या विवेकाला आणखी मुद्दा आहे. आपली वैशिष्ट्ये अनेक आहेत. पण, सगळ्यात महत्त्वाचे वैशिष्ट्य काय असेल तर आपण दांभिक आहोत. म्हणजे चार लोकात कसे वागायचे आणि खासगीत कसे वागायचे हे आपण परस्पर ठरवून टाकलेले असते. जाहीरपणे काय म्हणायचे आणि प्रत्यक्षात काय म्हणायचे यातील द्वैत ठरवलेले असते. हे जास्त भयानक आहे. अशी माणसे फार चर्चा करण्याच्या फंदात पडत नाहीत. कारण शेवटी काय वागायचे आहे हे त्यांनी अगोदरच ठरवून टाकलेले असते. त्यामुळे जाहीरपणे हुंडा वाईट असे म्हणायचे, पण प्रत्यक्षात तो घ्यायचा, जाहीरपणे लग्नाच्या सध्याच्या विधींना विरोध करायचा पण प्रत्यक्षात वेळ येईल तेव्हा पारंपरिक पद्धतीनेच विवाह सोहळे साजरे करायचे, जात-धर्म मी मानत नाही असे म्हणायचे, पण वेळ येईल तेव्हा त्या सगळ्या भिंती अधोरेखित करायच्या ही आपली वैशिष्ट्ये आहेत. असा एक दांभिक समाज आपण जन्माला घातला आहे. तोच वारसा पुढच्या पिढ्यांनाही आपण देत आहोत. या सगळ्याचा स्वाभाविक परिणाम जो व्हायचा तोच होतो. प्रश्न विचारणे बंद होते आणि बदलाची शक्यताही मावळते. जाहीरपणे प्रश्न न विचारून प्रत्यक्षात कर्मठपणे वर्तन करणाऱ्या लोकांपेक्षा जाहीरपणे मूलतत्त्ववादी भूमिका मांडणारे परवडले. कारण त्यांच्या मुद्द्यांसंदर्भात किमान चर्चा होऊ शकते. वाद-विवाद होऊ शकतो.

आणखी एक, आपण धर्मनिरपेक्षता आणि सर्वधर्म समभाव असे कितीही उच्च रवात गर्जत असलो तरी प्रत्यक्षात चित्र वेगळे आहे. म्हणजे किती हिंदूंना रमजान ईद आणि त्याविषयी माहिती असते, हे सांगणे कठीण आहे. सईद मिर्झा यांचे ‘अम्मी - अ लेटर टू ए डेमोक्रॅटिक मॉम’ हे पुस्तक वाचले म्हणजे या सांस्कृतिक संचिताचा अंदाज येतो. (आमच्या मिलिंद चंपानेरकर यांनी ते मराठीतही आणले आहे) गुड फ्रायडेची वगैरे सुट्टी शाळांना असते, पण हे काय प्रकरण आहे ते कुठे माहीत असते पारशी नववर्ष आहे हे समजते, पण बाकी कुठे काय माहीत असते बुद्ध जयंती साजरी होताना बुद्धाचे तत्त्वज्ञान ही काय गोष्ट आहे हे कुठे ठाऊक असते यातून एक संचित आपण नाकारतो. समग्रतेला नाकारतो.

साधी गंमत सांगतो. ही गंमत आहे की शोकांतिका ते ठाऊक नाही. माझे थोरले भाऊ बालरोगतज्ज्ञ आहेत. पण महत्त्वाचे म्हणजे गौतम बुद्धाचे अभ्यासक आहेत. एका अनवट वळणावर त्यांना हा बुद्ध भेटला. त्यांनी रजनीशांचे व्याख्यान ऐकले. ज्यात रजनीश म्हणतात, बाकी सगळे धर्म संस्थापक त्या त्या काळाचे आहेत. पण, बुद्ध हा असा एकमेव माणूस, जो समकालीन आहे. औरोंको इतिहास से ढूंढना पडता है, मगर बुद्ध तुम्हे रास्ते में खडा मिलता है ... या आणि अशा गोष्टींनी त्यांनी बुद्ध वाचायला सुरुवात केली. झपाटून गेले. मग त्यांनी बुद्धाच्या तत्त्वज्ञानावर चिंतनात्मक आणि प्रासादिक अशा रचना केल्या. त्यावर आधारित काव्यसंग्रह, धम्मधारा, नुकताच प्रसिद्ध झाला. तो प्रसिद्ध व्हायचा अवकाश की लोकांनी त्यांना विचारणे सुरू केले, ओ, तुम्ही बौद्ध आहात हे आम्हाला माहीत नव्हते! आम्हाला वाटले तुम्ही हिंदू असाल! तो म्हणाला, विचारांच्या अर्थाने मी बौद्ध आहेच, पण जात-धर्माने बौद्ध

असल्याशिवाय मी बुद्धावर लिहू नये असे तुम्हाला का वाटते खरा विचारी माणूस तत्त्वज्ञान पाहतो. शिवाजीवर बोलले की मराठा, बुद्ध-आंबेडकरांवर बोलले की बौद्ध, फुल्यांवर बोलले की ओबीसी, हे काय प्रकरण आहे या पलीकडे गेल्याशिवाय आपल्याला ऐहिक मोक्ष नाही.

Reasoning संपले की कृत्रिम अधिष्ठान शोधावे लागते. खरे तर ज्या परंपरेत आपण वाढतो ती एवढी सकस आणि समृद्ध अशी आहे की आपण विचारी व्हायला हवे. म्हणजे महाभारत असो वा सुफी कवितांची परंपरा असो, बुद्ध असो वा चार्वाक असो, आपले पूर्वसुरी असे असूनही त्यांच्याशी नाळ जोडण्याचा प्रयत्न आपण अभावानेच करतो. आपल्याला आपल्या समृद्ध परंपरांचा अभिमान असतो आणि त्याचे पाईक होण्याची प्रतिज्ञाही करतो आपण, पण ही परंपरा काय आहे तेच विसरतो. प्रत्यक्षात 'आता विश्वात्मके देवे...' असे ज्ञानेश्वर म्हणत होते तेव्हा जागतिकीकरण हा शब्दही कोणी उच्चारला नव्हता. दूर कशाला अमेरिकेचा तेव्हा जन्मही झाला नव्हता. अशा वेळी हे तत्त्वज्ञान भारतात जन्माला आले. पण, आपण या तत्त्वज्ञानाकडे अस्मितेच्या अंगाने बघतो. एकूणच इतिहासाकडे अशा पद्धतीने बघण्याची दृष्टी आपण विकसित केली आहे. खरे तर, इतिहास हा कधीच भूतकाळाचा पट नसतो. तो समकालीन असतो. म्हणून तर मार्क्सवादी विचारवंत तुकाराम वा शिवाजीकडे मार्क्सवादी दृष्टिकोनातून पाहू शकतात. प्रत्यक्षात शिवाजी आणि तुकाराम यांच्या कितीतरी नंतर मार्क्स आला. पण, वर्तमानातील संदर्भांसह इतिहासाचे आकलन करण्याची दृष्टी मिळत असते. आज आपण ज्या प्रकारे हा इतिहासाचा अन्वय लावण्याचा प्रयत्न करत आहोत त्यावरून आजचे आपले दारिद्र्य लक्षात येते. इतिहासाचा पट असा श्रीमंत असूनही दरिद्री पद्धतीने त्याकडे पाहिले जाते. त्यातून आपण हे विसरतो की शिवाजीचा पहिला पोवाडा कोण्या बाबासाहेब भोसले अथवा पुरंदरेंनी लिहिला नाही, तर तो महात्मा फुल्यांनी लिहिला. शिवाजी हा महाराष्ट्राचा प्रेरणास्रोत आहे ते त्यांनी महाराष्ट्राला सर्वात प्रथम सांगितले. चवदार तळ्याचा सत्याग्रह करण्यासाठी बाबासाहेबांनी महाड निवडले, कारण रायगडचा तो परिसर होता. रयतेच्या राजाचा अवमान ज्या व्यवस्थेने केला, रयतेच्या राजाचा राज्याभिषेक करायला नकार दिला, त्या राजाच्या परिसरात बाबासाहेबांना समतेसाठी रणशिंग फुंकायचे होते. म्हणून त्यांनी महाड निवडले. असे असताना आज शिवाजी, फुले आणि बाबासाहेब ही प्रतीके म्हणून ज्यांनी निवडली आहेत, त्यांची दृष्टी किती संकुचित आहे हे आपल्याला ठाऊक आहे. विवेकाचे बोट सुटल्याचा यापेक्षा भयावह पुरावा आणखी कोणता असेल विकासाची आपली कल्पना असो वा शहरीकरणाची, आर्थिक समृद्धीची कल्पना असो किंवा सुखी संसाराची, या सगळ्यामागे विवेकाचा हा संदर्भ आहे.

विवेकाचे बोट सुटले की माणसे सैरभैर होतात. इतस्ततः भटकतात. त्यातून होणारी कोंडी आपण सभोवताली पाहत आहोत. मला कायम प्रश्न पडतो. रायगड जिल्हा हा खरे तर डाव्या विचारांचा बालेकिल्ला. जेवढ्या पुरोगामी चळवळी, संघटना, पक्ष इथे दिसतात तेवढे महाराष्ट्रात कुठेही दिसणार नाहीत. तरीही सर्वाधिक अंधश्रद्धा दिसतात त्या याच जिल्ह्यात. तेच बंगालचेही सांगता येईल. अर्थात कमी-जास्त प्रमाणात सर्वत्र अशा अंधश्रद्धा दिसतात. विशेषतः बुवा-महाराजांचे प्रस्थ अलीकडे वाढले आहे, असे लक्षात येते. याचे एक कारण आहे. सुरक्षिततेचा शोध घेण्यासाठी माणसे इकडे-तिकडे भटकतात. सुरक्षितता विचार करण्यात असते. पण, सामान्यतः विचारामुळे अधिक असुरक्षित वाटते. त्यापेक्षा आमचा विचार कोणीतरी अन्य माणसाने करावा, हे जास्त सोपे आहे. एकूणच या देशात कंत्राटदारांचे फावते. आपण सामाजिक क्षेत्रातही अशी कंत्राटे देऊन टाकतो. प्रश्न आमचे असतील पण ती उत्तरे तुम्हीच शोधा, उपाय सांगा आणि आम्हाला मोकळे करा, अशी भयानक सवय आपल्याला लागू पाहत आहे. भ्रष्टाचार अगदी तुमच्या घरात झाला तरी अण्णा हजारे कुठे गेले अशी हाक मारायची! मग दुसरे काय होणार प्रस्थापित त्याचा अर्थातच फायदा घेतात. त्यामुळे लोकांचे प्रश्न सोडवणारे कंत्राटदार निर्माण झाले आहेत. काही कंत्राटदार सामाजिक क्षेत्रातील आहेत, तर अनेक कंत्राटदार मानसिक क्षेत्रातील आहेत. राजकीय नेते हे त्या क्षेत्रातील बाबा आहेत आणि बुवा-बाबा म्हणजे धार्मिक क्षेत्रातील राजकारणी आहेत. एकदा तुम्ही विचार करणे थांबवले की असे होणारच. एखादा लोकपाल आला म्हणजे प्रश्न सुटणार नाही. किंवा हे राजकारणी गेल्याने फक्त बदल होणार नाही. मूळ मुद्दा आहे तो विचार करण्याचा. तुमच्यावतीने इतरांनी विचार करायचा आग्रह जोवर थांबत नाही तोवर तुमचे शोषण बंद होणार नाही. विचार करणारा, प्रश्न विचारणारा माणूस तयार करणे हे परिवर्तनवादी चळवळीसमोरचे सगळ्यात मोठे आव्हान आहे. कारण नव्या जगात एवढी गुंतागुंत आहे की पूर्वी कधी नव्हे एवढे शोषण आज होऊ शकते. होत असते. जागतिकीकरणाने खुलेपणा दिला तो माहितीचा. संधींचा. पण, विचारांचा खुलेपणा निर्माण झाला नाही. त्यामुळे जागतिकीकरणातील खुलेपणाचा उपयोग करून मक्तेदारी निर्माण करण्याचा प्रयत्न व्यवस्थेने केला. सुटी-सुटी आंदोलने तर करावी लागतीलच, पण प्रत्येकवेळी आम्ही कोणाचे तरी तारणहार आहोत, असे म्हणून आंदोलने करणे ही मलमपट्टी झाली. खरा उपाय

"तुमच्यावतीने इतरांनी विचार करायचा आग्रह जोवर थांबत नाही तोवर तुमचे शोषण बंद होणार नाही. विचार करणारा, प्रश्न विचारणारा माणूस तयार करणे हे परिवर्तनवादी चळवळीसमोरचे सगळ्यात मोठे आव्हान आहे. कारण नव्या जगात एवढी गुंतागुंत आहे की पूर्वी कधी नव्हे एवढे शोषण आज होऊ शकते. होत असते. जागतिकीकरणाने खुलेपणा दिला तो माहितीचा. संधींचा. पण, विचारांचा खुलेपणा निर्माण झाला नाही. त्यामुळे जागतिकीकरणातील खुलेपणाचा उपयोग करून मक्तेदारी निर्माण करण्याचा प्रयत्न व्यवस्थेने केला.

> **भारतात लोकशाही प्रगल्भ आहे हे खरे पण तीही अशा गोष्टींचा आधार कळत-नकळत घेते. कधी धर्माचे भय दाखवून, कधी नैतिकतेचा बागुलबुवा उभा करून, तर कधी जातीय समीकरणे मांडून, कधी पैशांचे आमिष दाखवून सामान्य माणसाला फसवण्याची प्रवृत्ती लोकशाही चौकटीतही दिसते. खरे तर आमिष आहे म्हणजे पुढे सापळा असणार हे आमच्या सामान्य आदिवासीला समजते; पण तरीही वारंवार फसत राहतो सामान्य माणूस. मग लक्षात येते की त्याचेही ते संकुचित राजकारण असते. सामान्य माणूस वाटतो तसा भाबडा नसतो. व्यवस्था त्याला जशी वापरून घेते, तसेच सामान्य माणूसही व्यवस्थेला वापरून घेत असतो!**

आणि खरा उपचार नाही. या देशाने लोकशाही स्वीकारली तेव्हाच विचारांचे हे स्वातंत्र्य आपसूक मिळाले. पण, राजकीयदृष्ट्या ते मिळाले म्हणून सामाजिक-मानसिक पातळीवर स्वातंत्र्य मिळते असे नाही.

मला आठवते, आमचे एक मित्र किस्सा सांगतात. पहिली सार्वत्रिक निवडणूक होती तेव्हाची गोष्ट. एका गावातील बडे जमीनदार निवडणुकीला उभे होते. त्यांच्या नोकराने त्यांना विचारले, मालक ही कसली निवडणूक आहे या निवडणुकीने काय होणार आहे त्यावर ते गृहस्थ उत्तरले, अरे काही नाही. तू मला आता मालक म्हणतोस ना! ही निवडणूक आटोपल्यावर खासदार म्हणायचे. बस्स! कोणतीही नवी व्यवस्था प्रस्थापित गिळंकृत करतात. जागतिकीकरण आणि लोकशाही या मिश्रणातून सर्वांना संधींचे अवकाश उपलब्ध झाले हे खरे, पण एकूण व्यवस्थेचा चेहरा बदलला नाही. अगदी वंचित समाजातील तरुण व्यवस्थेत संधी मिळवतो हे खरे, पण एकदा तो लाभार्थी झाला रे झाला की तो त्या व्यवस्थेचा अविभाज्य असा भाग होतो. या पार्श्वभूमीवर माध्यमांच्या संदर्भात अनेकदा बोलले जाते. एक गोष्ट आपण मान्य करायला हवी आणि ती म्हणजे माध्यमे ही या प्रस्थापित व्यवस्थेची पार्टनर आहेत. शिवाय पत्रकारिता असे आपण म्हणतो हे खरे पण पत्रकारिता मुळी पत्रकारांच्या हातात नाही. ती आहे उद्योजकांच्या हातात. अनेकदा तर असे जाणवते की माध्यमे, त्यात वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या, इतर वाहिन्या, त्याचप्रमाणे चित्रपट, नाटक, साहित्य सगळेच गृहीत धरू, एखाद्या अनेस्थेशियाप्रमाणे काम करतात. सामान्य माणसाला भूल देण्याचे काम माध्यमे करतात आणि मग व्यवस्था आपली शस्त्रक्रिया उरकून टाकते. माध्यमांविषयी मी निराशेने बोलतो आहे असे नाही. मी स्वत: माध्यमात आहे याचा मला अभिमान आहे आणि माध्यमांकडून मला अनेक आशा आहेत. माध्यमांचे योगदानही विलक्षण आहे. पण, त्यांचे सध्याचे स्वरूप आणि म र्यादा याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. आपल्याला या मर्यादांसह माध्यमांकडे पाहावे लागेल. पण मुख्य म्हणजे प्रत्येकजण माध्यम आहे, हे नव्या जगाचे सूत्र त्यासाठी लक्षात ठेवावे लागेल. मार्शल मॅकलुहान म्हणाला त्याप्रमाणे, ढ्हश ाशवळीं ळी ींहश ाशींरसश ! आता माध्यमे प्रत्येकाच्या हातात आणि आवाक्यात आहेत. मग तो मोबाईल असेल वा फेसबुक. माध्यम म्हणजे इंद्रियांचा विस्तार, ाशवळर ळी शींशपीळेप ेष ारप , असे असेल तर मग आज सर्वाधिक संधी आहे. सध्या जगात ज्या माध्यमांनी खळबळ माजवली ती पारंपरिक माध्यमे नाहीत. मग तो जुलिअन असांज असेल विकीलीक्सचा किंवा तहलका असेल. पारंपरिक माध्यमांना न सोडता या नव्या माध्यमांसह माणसाला अधिक सक्षम बनवण्याचे आव्हान आज आपल्यासमोर आहे.

या विवेकवादाचा संदर्भ भारतीय लोकशाहीच्या अनुषंगाने समजून घ्यायला हवा. फ्रेंच राज्यक्रांतीने स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूल्ये दिली खरी, पण स्वातंत्र्याच्या भानगडीत त्यांना समता आणता आली नाही. तर, रशियन राज्यक्रांतीने समतेचा अट्टहास करत स्वातंत्र्य आणि समतेचा बळी दिला. ही तिन्ही मूल्ये एकत्र नांदणारी लोकशाही हवी होती बाबासाहेबांना. म्हणून त्यांनी बुद्धाकडे पहिले. बुद्ध हा विवेकवादाचा आद्य पुरस्कर्ता. अलौकिक वगैरे नाकारत थेट मानवी प्रश्नांना भिडणारा. डॉ. प्रदीप आवटे यांनी बुद्ध तत्त्वज्ञानाला दिलेले काव्यरूप असे-

कारणावाचुनी, घडते ना काही
देव, दैव, काही, जगामाजी नाही
बुद्धीच्या आधारे घेई सत्यशोध
नको खुल्या श्रद्धा हाच मिळे बोध

हे सांगणारा बुद्ध. जगातील पहिला विवेकवादी. म्हणून तर ॲपलचा कर्ता-करवता स्टीव्ह जॉब्स बुद्धाचा अनुयायी होता. कारण विवेकाचे बोट ज्याला पकडायचे त्याला तोच मार्ग अनुसरावा लागतो.

कारणाविना ना, काहीही घडते
अंधश्रद्धेपायी सत्य ते दडते
सत्यशोधनासी, विवेक आधार
नको अंधश्रद्धा, नको खुळाचार, असे सांगणारा बुद्ध.
प्रत्ययासे ज्ञान तेची ते प्रमाण
एर अप्रमाण सर्वकाही

ही मांडणी बाबासाहेबांनी स्वीकारली ती म्हणूनच. म्हणून बाबासाहेबांनी सांगितलेली नैतिकता वेगळी आहे. आपल्याकडे नैतिकतेची कल्पना वेगळी असते. भैरप्पांच्या पर्वमधील गांधारी म्हणते, धृतराष्ट्राप्रमाणे मी डोळे बांधून घेतले त्याचा पश्चाताप नंतर कैकदा झाला. पण, तोवर माझ्या नैतिकतेचा जो गवगवा झाला होता त्यामुळे माझ्यातही एक अहंकार आला होता. आणि, ती प्रतिमा तशीच ठेवून माझे वलय कायम राखायचे होते. ही नैतिकता बुद्ध मानत नाही. बुद्ध काहीच मानत नाही. पण तो केवळ नाकारत नाही. तो होकारही देतो. प्रस्थापित व्यवस्थेला बुद्ध नकोसा होता. पण त्याला रोखणे शक्य नाही हे समजल्याने त्यांनी बुद्धाला सामावून घेतले आणि तो विष्णूचा दहावा अवतार आहे, असे जाहीर केले. देव, अवतार न मानणाऱ्या बुद्धालाच अवतार करून टाकले. ज्यांनी अजिंठा पहिला असेल त्यांना हा हास्यास्पद प्रकार समजेल. असो तर मुद्दा असा की बाबासाहेबांनी सांगितलेली संविधानिक नैतिकता हीच आजच्या विवेकशील माणसाची खरी नैतिकता असणार आहे.

या निमित्ताने लोकशाही व्यवस्थेविषयी बोलणे अपरिहार्य आहे. लोकशाही व्यवस्थेविषयी बाबासाहेबांनी मूलभूत असे चिंतन केले होते. त्यांच्या मते लोकशाहीचे रूप स्थिर नसते. ते नेहमी बदलत असते. लोकशाहीचे स्वरूप कालमानानुसार बदलते. शिवाय परिस्थितीनुसार त्यात बदल होऊ शकतो. लोकशाही म्हणजे काय याविषयी अनेक व्याख्या ज्ञात आहेत. लोकांनी लोकांसाठी चालवलेले लोकांचे राज्य अशी व्याख्या अब्राहम लिंकन यांनी केली. ती व्याख्या प्रसिद्ध आहे. बेजुअट या विचारवंताने लोकशाहीची व्याख्या केली, ती चर्चा करून राज्यकारभार चालवणे, अशा आशयाची होती. बाबासाहेब मात्र त्यापुढे जातात. त्यांची व्याख्या महत्त्वाची आहे. ते म्हणतात, लोकांच्या सामाजिक आणि राजकीय जीवनात रक्ताचा एक थेंबही न गाळता क्रांती घडवून आणणे म्हणजे लोकशाही. लोकशाही यशस्वी व्हायची असेल तर बाबासाहेब काही पूर्वअटी सांगतात. पहिली म्हणजे, लोकशाही रचनेत समता अपरिहार्य आहे. समता असल्याशिवाय लोकशाही व्यवस्था यशस्वी होऊ शकत नाही. दुसरा मुद्दा ते मांडतात, विरोधक ही लोकशाहीची सगळ्यात महत्त्वाची अट आहे. प्रबळ आणि सक्षम विरोधक आवश्यक आहेत. तुम्ही सत्ताधारी नसाल तरी चालेल, पण तुम्ही सक्षम विरोधक असायला हवे, असे बाबासाहेब मांडतात. विरोधाशिवाय आणि पक्ष व्यवस्थेशिवाय लोकशाही उभी राहू शकत नाही. तिसरा मुद्दा जो बाबासाहेब मांडतात, तो पाहिला म्हणजे अण्णा हजारे यांच्या आंदोलनाला मिळालेले यश समजते. त्या मेणबत्त्या आता विझल्या, पण त्या का पेटल्या हे पाहण्यासाठी बाबासाहेबांनी सांगितलेला हा तिसरा मुद्दा महत्त्वाचा मानायला हवा. ते म्हणाले, कायद्याचे राज्य नसेल, योग्य प्रशासन नसेल, तर भ्रष्टाचार बोकाळतो. त्यातून माणूस कोसळतो. त्यांनी सांगितलेला चौथा मुद्दा सगळ्यात महत्त्वाचा. बाबासाहेब म्हणाले, संविधानिक नैतिकता ही प्राधान्याची गोष्ट. बाकी नैतिकता सब झूठ. कोणी म्हणेल, स्त्रियांनी घराबाहेर पडणे अनैतिक, कोणी म्हणाले विधवेचा पुनर्विवाह अनैतिक. त्याला अर्थ नाही. संविधानिक नैतिकता हे खरे चारित्र्य. त्याचा अवलंब करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य. संविधानाने तुम्हाला फक्त सांगाडा दिला आहे. त्यात प्राण फुंकायचा तर संविधानिक नैतिकता मानायला हवी. त्यांनी उदाहरण दिले जॉर्ज वॉशिंग्टनचे. वॉशिंग्टन हा अमेरिकन लोकांसाठी देव होता. तो मनात आणता तर कितीही वर्षे सत्ता राबवू शकला असता. मात्र, त्याची पहिली टर्म संपल्यावर पुन्हा खुर्चीवर बसण्यास त्याने नकार दिला. लोक मागे लागले म्हणून दुसरी टर्म त्याने घेतली. पण, नंतर मात्र तो पायउतार झाला. त्यानंतर तो नियमच झाला. अमेरिकेत कोणत्याही अध्यक्षाला दोनहून अधिक टर्म्स मिळू शकत नाहीत. My Dear people, you have forgotten the purpose for which we made this constitution, because we did not want a hereditary monarchy and we did not want ruler or dictator, असे त्याने म्हटले. बाबासाहेब पाचवा मुद्दा सांगतात, तो आहे समाजाची सारासार विचारशक्ती. ही विवेकशक्ती पुन्हा अवलंबून आहे ती संविधानिक नैतिकतेवर, हे सांगायलाही ते विसरत नाहीत.

नवे जग अधिक गुंतागुंतीचे होत असताना ही गुंतागुंत सोडवून, उकल करण्याचे सामर्थ्य या सारासार विवेकात आहे. विवेक हे लोकशाहीचे अपत्य आहे, तशीच ती लोकशाहीची पूर्वअट आहे. लोकशाहीशिवाय तुम्हाला तुमचा विवेक वापरता येत नाही. मी मागे एक उदाहरण सांगितले होते. आयेशा सिद्दिका नावाच्या अभ्यासक बाईंनी पाकिस्तानच्या लष्करी सामर्थ्याची चिकित्सा करणारे एक पुस्तक काही वर्षांपूर्वी लिहिले. Military Inc. हे ते पुस्तक. पाकिस्तानी लष्कराचे अर्थरंग या नावाने मीच ते पुस्तक मराठीत आणले. त्यात त्यांनी एक मस्त किस्सा दिला आहे. झिया उल हक़ तेव्हा पाकिस्तानचे सर्वेसर्वा होते. ते अमेरिकेचे डार्लिंग होते. कारण अमेरिकेचे वेगळे हितसंबंध होते. पण हुकुमशहाला पाठिंबा कसा देणार अमेरिकेची ही खास पद्धत. मग लोकशाहीचा ड्रामा करायचा. त्याप्रमाणे त्यांनी झियांना सांगितले, काही करा आणि निवडणुका घ्या. जगाला मूर्खात काढा. मग झियांनी निवडणुकीचे नाटक केले. निवडणूक म्हणजे काय तर सार्वमत घेतले गेले. या सार्वमतासाठी एक प्रश्न विचारला गेला. इस्लामची प्रतिष्ठा कायम ठेवण्यासाठी झिया उल हक यांनाच पुन्हा निवडून देणे तुम्हाला योग्य वाटते की अयोग्य आता या प्रश्नाचे उत्तर काय देणार अशी ती लोकशाही. भारतात लोकशाही प्रगल्भ आहे हे खरे पण तीही अशा गोष्टींचा आधार कळत-नकळत घेते. कधी धर्माचे भय दाखवून, कधी नैतिकतेचा बागुलबुवा उभा करून, तर कधी जातीय समीकरणे मांडून, कधी पैशांचे आमिष दाखवून सामान्य माणसाला फसवण्याची प्रवृत्ती लोकशाही चौकटीतही दिसते. खरे तर आमिष आहे म्हणजे पुढे सापळा असणार हे आमच्या सामान्य आदिवासीला समजते; पण तरीही वारंवार फसत राहतो सामान्य माणूस. मग लक्षात येते की त्याचेही ते संकुचित राजकारण असते. सामान्य माणूस वाटतो तसा भाबडा नसतो. व्यवस्था त्याला जशी वापरून घेते, तसेच सामान्य माणूसही व्यवस्थेला वापरून घेत असतो! कारण त्याला विचार न करता शॉर्टकटचे स्वार्थ हवे असतात. त्यातून होते ते मात्र दीर्घकालीन नुकसान. हे नुकसान टाळण्याचा एकमेव मार्ग आपल्यासमोर आहे: विवेकाचा. विचार करण्याचा.

देश चालवणाऱ्या माणसांची गोष्ट

गेल्या दहा वर्षांत महाराष्ट्रातील युवा पिढीमध्ये प्रशासनिक सेवांबाबत आकर्षण निर्माण झाले असून दरवर्षी प्रशासनिक सेवा परीक्षांसाठी बसणाऱ्या मुला-मुलांची संख्या वाढत आहे. सुमारे ३५-४० वर्षांपूर्वी म्हणजे मी भारतीय प्रशासनिक सेवेत रुजू झाले, त्याकाळी महाराष्ट्रातील विद्यार्थी या परीक्षेकडे क्वचितच वळत होते. ब्रिटिश राजवटीत मात्र महाराष्ट्रातील कित्येक व्यक्ती आयसीएसमध्ये गेल्या होत्या व त्यांनी महाराष्ट्रात तसेच महाराष्ट्राबाहेरही - अगदी काश्मीर, आसामसारख्या ठिकाणी चांगली कामगिरी केली होती. असो. या नव्या करिअर अवेयरनेसच्या निमित्ताने ही प्रशासकीय सेवा काय आहे, यात निवड झाल्यानंतर काय करावे लागते, काय करावे, काय करू नये याचा ऊहापोह प्रस्तुत लेखात करीत आहे.

लीना मेहेंदळे

कुठलेही राज्यशासन किंवा व्यवस्था एकहाती चालत नाही, तसेच ती चालवायला काही शिस्त, काही नियमावली असते जेणेकरूनयंत्रणेला व्यवस्था चालवणे सुकर होते. त्यामुळे शासन-व्यवस्था चालवणे ही समाजाला देऊ केलेली एक सेवा आहे आणि त्यापोटी मोबदलादेखील योग्य प्रमाणात मिळाला पाहिजे, याबाबत कोणाचेच दुमत असणार नाही. जेव्हा अवाढव्य मोठी आणि सर्वस्पर्शी अशी राज्यव्यवस्था चालवायची असते तेव्हा त्यासाठी निवडलेली मंडळी बुद्धिमान, अभ्यासू आणि कामाचा उरक असणारी अशी हवी. तसेच त्यांच्या कामामुळे एकूण समाजहितावर आणि देशहितावर परिणाम होणार असल्यामुळे अशा मंडळींची नीतिमत्ता आणि जीवनमूल्य काय हा मुद्दादेखील महत्त्वाचा ठरतो, किंबहुना तोच सर्वाधिक महत्त्वाचा मानला गेला पाहिजे.

आजच्या भारतीय प्रशासकीय सेवा किंवा राज्यातील इतर प्रकारच्या सेवा यांचा उगम व विस्तार ब्रिटिशकालीन आहे, असे मानायला हरकत नाही. सन १७५६ मध्ये प्लासीची लढाई जिंकून ब्रिटिशांनी भारतात चंचुप्रवेश केला तेव्हाची एक मुख्य घटना लक्षात ठेवली पाहिजे. ती म्हणजे युरोपात व मुख्यत्वे इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीने मूळ धरून त्या औद्योगिक क्रांतीचा विस्तार वाढायला नुकतीच सुरुवात झाली आहे. तरीदेखील कृषी व जमीन यांनाच महत्त्व होते. म्हणून महसूल जमिनीचे रेकॉर्ड, सारा-वसुली हे शासन-अधिकाऱ्यांचे सर्वात महत्त्वाचे काम ठरले. तसेच इंग्लंडमधील उद्योगांना पूरक असे इतर उद्योग - मुख्यत: वस्त्रोद्योग आणि बाजारपेठेसाठी लागणारी यंत्रणा म्हणजेच रेल्वे वाहतूक, पोस्ट-तार खाते हे ही महत्त्वाचे होते. भारतात वनसंपत्ती अफाट होती. त्यामुळे वनांचे अधिकार ब्रिटिशांना हवे होते. सुरुवातीच्या काळात जरी ब्रिटिशांना बऱ्याच लढाया लढाव्या लागल्या तरी ब्रिटनमधील लोकशाहीला अनुसरून इथेही त्यांनी सिव्हिल ऑथोरिटीला पोलिसांपेक्षा अधिक महत्त्वाचे मानले होते. शिवाय एकदा सर्व लढाया संपल्या म्हणजेच १८५७ मध्ये की त्यानंतर कायदा सुव्यवस्थेचे प्रश्न मुख्यत्वेकरून जमिनीच्या वादातूनच उद्भवणार होते.

या सर्व कारणांनी ब्रिटिशांनी खास इंडियन सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा ठरवली. पण त्या परीक्षेसाठी फक्त ब्रिटनमधील तरुणच पात्र होते. त्यांनी कलेक्टर ही जिल्हास्तरावरील अत्यंत मानाची पोस्ट सांभाळावी अशी अपेक्षा होती. ब्रिटिशांच्या काळात कलेक्टर हा ब्रिटिशांचा राजप्रतिनिधी असे व त्याला भरपूर अधिकार होते. जमीन महसुलाची वसुली, पिकपाण्याची नोंद, दुष्काळ निवारण, सर्व्हे आणि सेटलमेंट, वनसंपत्ती, लॅण्ड ॲक्विझिशन करून उद्योगांना देणे, पोलिसांवर नियंत्रण इतकेच नव्हे तर क्रिमिनल प्रोसिजर कोडखालील कित्येक सेक्शनच्या गुन्ह्यांमधील निवाडा करणे आणि दंड ठोठावण्याचे अधिकारदेखील होते आणि त्यासाठी त्यांना ड्रिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट हे संबोधन होते. दुष्काळ, पूर, सर्व प्रकारच्या नैसर्गिक संकटांना तोंड देणे आणि जमीन व्यवहारांच्या प्रकरणात निवाडा देणे, झालेच तर दरवर्षी जिल्ह्याचे गॅझेटियर लिहून काढणे (गॅझेटियर म्हणजे थोडक्यांत जिल्ह्याचा वार्षिक अहवाल - कुठे कुठे काय काय होते आणि चालू वर्षात काय वाढ झाली) जनगणना, पशुगणना करणे ही कामेदेखील कलेक्टरच्या देखरेखीखाली महसूल विभागातील मंडळी करत.

याप्रकारे कलेक्टर हाच ब्रिटिश राज्याचा जिल्ह्यांतील प्रतिनिधी असे आणि त्याच्या कोणत्याही कामाला राज्याचा सदैव पाठिंबा असे. इतका की एकदा जळगाव कलेक्टर म्हणून काम करणाऱ्या ॲण्डरसन या अधिकाऱ्याने चक्क कलम १४४ लावून (म्हणजे अमुक हद्दीत प्रवेश करायचा नाही असे आदेश काढून) पंजाब मेलला जळगाव हद्दीतील रेल्वे रुळावर प्रवेश नाकारला होता तेव्हा तीन दिवसांच्या खोळंब्यानंतरही सरकारने ॲण्डरसनला त्याचा हुकूम मागे घेण्याची ऑर्डर दिली नाही तर त्याची बदली करून मगच पंजाबमेलला पुढे जाण्यासाठी रस्ता मिळाला. पुढे पहिले विश्व-युद्ध झाले. त्या काळी रेशनिंगची व्यवस्था सांभाळणे, त्यासाठी प्रतयक्ष धान्यवसुली करणे आणि धान्य साठ्यांवर जप्ती आणणे हे ही अधिकार कलेक्टरकडे आले.

> **हे सर्व एवढ्या विस्ताराने लिहायचे कारण असे की आय.सी.एस. अधिकारी म्हणजे जिल्ह्याचा कलेक्टर आणि कलेक्टर म्हणजे माईबाप सरकार असे एक समीकरण ब्रिटिश राजवटीत लोकांच्या मनांत ठसले आणि स्वातंत्र्यानंतरही आयसीएसऐवजी जे आयएएस हे नवे नामाभिधान मिळाले त्यातही कलेक्टरचा रुबाब व काम तसेच जनतेकडून असणाऱ्या न्यायाच्या व संकट निवारणाच्या अपेक्षा कायम राहिल्या. आजही युवा पिढी जेव्हा सरकारी नोकरीत येऊ इच्छिते तेव्हा त्यामागील एक कारण म्हणजे कलेक्टर या पदावर असलेला रुबाब किंवा महात्म्य.**

''हे सर्व एवढ्या विस्ताराने लिहायचे कारण असे की आय.सी.एस. अधिकारी म्हणजे जिल्ह्याचा कलेक्टर आणि कलेक्टर म्हणजे माईबाप सरकार असे एक समीकरण ब्रिटिश राजवटीत लोकांच्या मनांत ठसले आणि स्वातंत्र्यानंतरही आयसीएसऐवजी जे आयएएस हे नवे नामाभिधान मिळाले त्यातही कलेक्टरचा रुबाब व काम तसेच जनतेकडून असणाऱ्या न्यायाच्या व संकट निवारणाच्या अपेक्षा कायम राहिल्या. आजही युवा पिढी जेव्हा सरकारी नोकरीत येऊ इच्छिते तेव्हा त्यामागील एक कारण म्हणजे कलेक्टर या पदावर असलेला रुबाब किंवा महात्म्य.''

शिवाय आता आयएएस म्हणून केली जाणारी कित्येक कामे लोकांपुढे सातत्याने येवू लागली आहेत. पब्लिक सेक्टर अंडरटेकिंग हा प्रशासनात वेगळा विचार नेहरूंनी आणला आणि सुरवातीच्या काळात बरेच उद्योगधंदे सरकारने स्वत: सुरू केले. सर्वच खनिजांबाबत सरकारचे नियंत्रण होते. या दोन्ही ठिकाणी प्रमुख म्हणून सरकारी अधिकारी, विशेषत: आयएसएस अधिकारी आले. LPQ म्हणजे लायसेन्स, परमिट, कोटा यांचे राज्य आणि त्याद्वारे एखाद्यावर कृपा किंवा अवकृपा करणे हे सरकारच्या हाती आले.

थोडक्यात जसे कृषी आणि जमीन या दोन मुद्यांवर सरकारी अधिकारी रुबाबात असत. तसेच देशात औद्योगिक विकास सुरू झाल्यावर उद्योगांसाठी देण्या न देण्याच्या बऱ्याच गोष्टी पुन्हा सरकारी अधिकाऱ्यांच्याच हाती आल्या. म्हणजे रुबाबाला तेही एक कारण !

आपण सरकारमधील सिव्हिल सेवांकडे एक नजर टाकू या. सिव्हिल सेवा म्हणजे जनरल पर्पज सेवा. त्यामध्ये इंजिनिअरिंग, मेडिकल, ज्युडिशियल सायन्टिस्ट आणि शिक्षक या पाच सेवा मी वगळत आहे. कारण त्यांना एक ठराविक विषयांची प्रगल्भता एक्स्पर्टाइज लागतो. इतर सेवा - व्यवस्था राबवणाऱ्या सेवा या जनरल किंवा सिव्हिल सेवा होत. तर सिव्हिल सेवेतील सर्व अधिकारी उतरत्या क्रमाने पाहिले तर सर्वात वरिष्ठ केंद्र शासनाचा कॅबिनेट सेक्रेटरी आणि सर्वात खाली गावचा महसूल खात्याचा कोतवाल अशा एकूण १४ पायऱ्या आहेत. यूपीएससीच्या परीक्षेत निवडून येणारा आयएएस अधिकारी यापैकी थेट सहाव्या पायरीवर म्हणजे असिस्टंट कलेक्टर या पदावर नोकरीत शिरतो आणि आपल्या कारकिर्दीत पुढील सात पायऱ्यापर्यंत जाऊ शकतो. आठवी कॅबिनेट सेक्रेटरीची पायरी अगदी क्वचित लोकांना मिळते. मात्र त्याच्या प्रत्येक पायरीवर तो अधिकारी बहुतेक कार्यालय प्रमुख आणि असंख्य जबाबदाऱ्या पार पाडणारा अधिकारी असतो. याचे गणित एवढ्यावरूनच समजून घेऊ या की सुमारे १२० कोटी लोकसंख्येच्या या देशात सुमारे तीस राज्य आणि केंद्र सरकारची सर्व कार्यालये मिळून फक्त साडेचार ते पाच हजार आयएएस अधिकारी असतात आणि दरवर्षी फक्त शंभर सव्वाशे नव्या अधिकाऱ्यांची निवड होते. त्यांचे आदर्श व नीतीमत्ता ढासळायला कधी व कशी सुरुवात होते जे आपले आदर्श आणि नीतिमत्ता शेवटपर्यंत जपतात ते कशाच्या जोरावर असे करू शकतात. त्यांना पाठबळ कोणाचे असते पाचवा - जे आपला आदर्श सोडत नाहीत त्यांना काय काय सोसावे लागते व कसे कसे एकटे पाडले जाते सहावा - अशावेळी त्यांच्या पदरी निराशा येऊन त्यांची कामाची तळमळ थांबते व कसे तरी दिवस ढकलण्यामागे त्यांचा कल निर्माण होतो हे कसे थांबवावे सातवा - भ्रष्टाचार तर केला नाही पण कामाची तळमळ सोडून दिली. आलेल्या फाईली पुढे सरकवणे एवढचे काम करत राहिले. अशी अवस्था साधारणपणे नोकरीमधील कितव्या वर्षी निर्माण होते व कशामुळे पहिल्या व दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर आधी पाहू या ! संघ लोकसेवा आयोगाच्या परीक्षा ज्या पद्धतीने घेतल्या जातात म्हणजे - एलिमिनेशन राऊंड नंतर लेखी परीक्षा, नंतर मुलाखत त्यातून निवड (म.लो.से.आ.च्या पण अशाच घेतल्या जातात) त्यामध्ये सध्या तरी उमेदवारांचे जनरल नॉलेज, सोशल नॉलेज व सब्जेक्ट नॉलेज एवढेच तपासले जाते. मुलाखतीच्या वेळी व्यक्तिमत्त्वाबद्दल इतर काही गोष्टीदेखील निदर्शनास येतात. उदा. आत्मविश्वास किंवा आत्मप्रौढी, समयसूचकता, धाडकन विचारलेल्या अनपेक्षित प्रश्नाला तितक्याच तडफेने उत्तर देता येणे, सौम्य, शांत, गंभीर, विचारी, चिकित्सक किंवा अग्रेसिव्ह व्यक्मित्त्व असणे, विषयाची तयारी असणे इत्यादी गोष्टीही मुलाखतीमध्ये तपासल्या जातात आणि त्यावर मार्क दिले जातात.

''मात्र यातून कुठेही त्या त्या उमेदवाराचे आदर्श, जीवनमूल्य, कर्तव्य-निष्ठा, सत्य आणि न्यायाची चाड, राष्ट्रप्रेम इत्यादी तपासले जात नाही. ते सर्वांमध्ये शंभर टक्के आहे असे गृहीत धरले जाते. टीमवर्क, दुसऱ्यांना समजावून घेणे हे तपासले जात नाही आणि सर्वात मुख्य म्हणजे ग्रामीण भारताबद्दलचे ज्ञान किती हेही पाहिले जात नाही. सत्तास्थानी आल्याबरोबर प्रवृत्ती बदलेल काय, सेवेचा आदर्श जाऊन सत्ते गाजवण्याचे उद्दिष्ट येईल काय, या गोष्टींचा विचार किंवा चाचणी प्रत्यक्ष परीक्षा आणि निवडीच्या काळात केली जात नाही. तसेच ती पुढील एक वर्षाच्या प्रोबेशनच्या काळातही सहसा केली जात नाही.''

मग तुमच्याकडे आदर्श किंवा जीवनमूल्ये आहेत ते ज्या त्या निवडून आलेल्या उमेदवाराचा वैयक्तिक प्रश्न आहे असे मानले जाते.

> **"मात्र यातून कुठेही त्या त्या उमेदवाराचे आदर्श, जीवनमूल्य, कर्तव्य-निष्ठा, सत्य आणि न्यायाची चाड, राष्ट्रप्रेम इत्यादी तपासले जात नाही. ते सर्वांमध्ये शंभर टक्के आहे असे गृहीत धरले जाते. टीमवर्क, दुसऱ्यांना समजावून घेणे हे तपासले जात नाही आणि सर्वात मुख्य म्हणजे ग्रामीण भारताबद्दलचे ज्ञान किती हेही पाहिले जात नाही. सत्तास्थानी आल्याबरोबर प्रवृत्ती बदलेल काय, सेवेचा आदर्श जाऊन सत्ते गाजवण्याचे उद्दिष्ट येईल काय, या गोष्टींचा विचार किंवा चाचणी प्रत्यक्ष परीक्षा आणि निवडीच्या काळात केली जात नाही. तसेच ती पुढील एक वर्षाच्या प्रोबेशनच्या काळातही सहसा केली जात नाही."**

सेवेचा आदर्श जाऊन सत्ता गाजवण्याचे उद्दिष्ट येईल काय. या गोष्टींचा विचार किंवा चाचणी प्रत्यक्ष परीक्षा आणि निवडीच्या काळात केली जात नाही. तसेच ती पुढील एक वर्षाच्या प्रोबेशनच्या काळातही सहसा केली जात नाही.

मग तुमच्याकडे काय आदर्श किंवा जीवनमूल्ये आहेत ते ज्या ज्या निवडून आलेल्या उमेदवाराचा वैयक्तिक प्रश्न आहे, असे मानले जाते. हे जे विश्लेषण आयएएसच्या बाबतीत लागू आहे तेच इतर सर्वांसाठी सिव्हिल सर्व्हिसेस मग त्या यूपीएससी परीक्षेखालील असोत अगर एमपीएससी खालील.

आता थोडं या परीक्षेकडे वळणाऱ्यांचा विचार करू. स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रात उद्योगधंद्यांची वाढ झपाट्याने झाली. त्यामुळे जे खूप हुशार होते त्यांनी आयआयटी करून परदेशांत स्थायिक व्हायचे, पण ज्यांना इंजिनिअरिंग जमत नसेल त्यांनी उद्योगांशी निगडीत शिक्षण घ्यायचे. बाकीचे कॉमर्स व उद्योगामध्ये नोकरी मिळवायची असा एक पॅटर्न ठरून गेला. त्या तुलनेत ज्या राज्यांमध्ये उद्योगधंदे कमी होते तिथे सिव्हिल सर्व्हिसेसकडे रोजगाराचे साधन म्हणून बघावे लागत होते आज महाराष्ट्रात थोडे फार तेही कारण आलेले आहे. म्हणूनच युवा पिढी सिव्हिल सर्व्हिसेसकडे का येत आहे त्याचे पहिले कारण रोजगारासाठी. पण दुसरे कारण इथे मिळणारे अधिकार, सत्ता आणि रुबाब हेच आहेत. कित्येकांना या नोकरीत आल्यावर मिळवता येणाऱ्या बेसुमार वरकमाईची जाणीव आहे व ते उद्देश घेऊन या नोकरीत येणारे उमेदवारही असतातच. सुमारी वीस-एक वर्षांपूर्वी एका कार्पोरेट उद्योगाने असाही प्रयत्न केला की स्वत:च्या मर्जीतील उमेदवार निवडून आणण्यासाठी त्या - त्या राज्यातील परीक्षा आयोगाच्या पदस्थ किंवा अध्यक्षांनाच पैसे पोचवायचे आणि अशा प्रकारे 'आपली माणसे' या नोकऱ्यांमध्ये सरकावायची. पण त्याची वाच्यता झाली. काही सदस्य वा अध्यक्ष पकडले गेले आणि या घराण्यानेही ठरवले की निवड होऊ घातलेल्यावर लक्ष देण्यापेक्षा निवड झालेल्यांनाही विकत घ्यायचा प्रयत्न करावा हे बरे.

वरील परिच्छेद लिहिताना एकूण चित्र काळेकुट्ट आहे असे सांगायचे नसून याही परिस्थितीत या परीक्षाकडे वळणारे किमान पन्नास टक्के उमेदवार देशासाठी व समाजासाठी काही तरी करायच्या भावनेने इकडे येण्याची स्वप्न बघतात हा मुद्दा अधोरेखित करायचा आहे. अशा प्रकारे सिव्हील सर्व्हिसमध्ये येणारी चार प्रकारची वर्गवारी आपण पाहिली इमानाची चाकरी करून भाकरी मिळवण्यासाठी, सत्ता व रुबाबासाठी. वरकमाईतून खूप श्रीमंत होण्यासाठी समाज व देशासाठी काही करावे म्हणून. आणि आधीच सांगितल्याप्रमाणे परीक्षेच्या सिस्टिममध्ये अशी कोणतीही पध्दत नाही जेणेकरून उमेदवारांचे खरे कारण आणि मनोवृत्ती समजून येईल. त्यामुळे हुशारी आणि मुलाखतीत दिसून आलेले व्यक्तिमत्त्व एवढ्याच निकषांवर निवड होते. समाजाच्या दृष्टीने विचार केला तर चौथ्या प्रकारांतले अधिकारी हवेत, पहिल्या वर्गातले पण बरे, दुसऱ्या वर्गातले चालू शकतात पण तिसऱ्या प्रकारचे अजिबात नकोत. मात्र तिसऱ्या प्रकारचे लोक एकदा नोकरीत शिरले की त्यांना काढून टाकण्याची प्रक्रिया अतिकिचकट आणि दीर्घकालीन असे ही आपल्या व्यवस्थेमधील सर्वात वाईट बाब आहे. म्हणून मग समाजाचा भर चौथ्या प्रकारच्या अधिकाऱ्यावर राहतो.

मात्र गेल्या वीस वर्षात असेही चित्र दिसते की, नोकरीत शिरताना आदर्शवाद घेऊन आलेली मंडळी हळूहळू सत्ता व रूबाबाच्या प्रलोभनांना बळी पडतात. तसेच त्यातील कित्येक मंडळी गैरमार्गाने मिळणाऱ्या पैशांच्या प्रलोभनाला देखील बळी पडतात. पण त्या आधी या अधिकाऱ्यांवर कसे कसे दबाव आणले जातात आणि त्यांचा आदर्शवाद संपवण्याचा प्रयत्न केला जातो ते ही पाहू या. आदर्शवाद संपवण्यालाच 'वठणीवर आणणे' असा शब्दही कित्येक राज्यकर्त्यांच्या आवडीचा शब्द आहे.

लोकशाहीमध्ये विधिपालिका, कार्यपालिका आणि न्यायपालिका असे जे तीन भाग केले आहेत. त्यातील कार्यपालिका किंवा एक्झिक्युटिव्ह प्रणाली म्हणजेच प्रशासन व यामध्ये मंत्रिमंडळ हा लोकप्रतिनिधींचा गट तर नोकरीशाही हा शासकीय नोकरीत आलेल्या अधिकाऱ्यांचा गट असतो. अर्थातच लोकप्रतिनिधी असलेलया राज्यकर्त्यांचा अधिकार मोठा असतो. ब्रिटिशकालीन व स्वातंत्र्यानंतर प्रशासनांत हा मोठा फरक आहे की त्याकाळी लोकप्रतिनिधी नव्हते. आता आहेत. त्यामुळे अधिकारांचे विभाजन झालेले आहे. लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यात मुख्य फरक असे की, लोकप्रतिनिधी हे लोकानुयायी असतात म्हणा किंवा त्यांना लोकांची जाण असते म्हणा. त्यांना दर पाच वर्षांनी निवडून यायचे असते आणि त्यासाठी लागणाऱ्या पक्षाच्या व पैशाच्या पाठबळाचा विचार करता आताच्या दशकांत सहसा कोणी राजकीय व्यक्ती 'स्वच्छ' राहूच शकत नाही अशी परिस्थिती आहे. अमरसिंह सारखा माणूस मोठ्या तोऱ्यात सांगू शकतो की -पॉलिटिक्स इज अ हाय रिस्क हाय गेन बिझिनेस ॲण्ड इन एनी बिझिनेस प्रॉफिट मॅक्सीमायझेशन इज द अल्टिमेट गेम प्लान' या वक्तव्याला कुणाही राजकीय नेत्याने विरोध केल्याचे अजून तरी माझ्या ऐकण्यात नाही.

म्हणूनच असे राज्यकर्ते आदर्शवादी अधिकाऱ्याला 'वठणीवर आणण्याचा' प्रयत्न करतात. त्यातील सर्वात प्रभावी साधन म्हणजे

बदली करणे, अधिकार काढून घेणे, खोटे आळ घेणे, साईडिंगच्या पोस्टला टाकणे, लोकांदेखत पाणउतारा करणे आणि प्रसंगी धमक्या देणे.

पहिल्या शस्त्राचा उपयोग वारंवार केला जात असल्याचे आपण बघतो. सुमारे तीस ते पस्तीस वर्षाच्या नोकरीत जर एखाद्या अधिकाऱ्याची बदली वीस-पंचवीस वेळा होत असेल तर तो अधिकारी चांगले काम कसे दाखवू शकेल आणि त्याच्या हुशारी किंवा समाजासाठी असलेल्या कर्तव्यबुद्धीचा फायदा समाजासाठी काय मिळू शकेल. यासाठी बदल्याबाबत धोरण निश्चित करा अशी मागणी अतयंत क्षीण आवाजात अधूनमधून केली जाते. मात्र केंद्रात आणि प्रतयेक राज्यांतही ॲडमिनीस्ट्रेटिव्ह रिफॉर्म नावाच्या फॅशनेबल विषयाची वारंवार चर्चा होत असूनही असले कोणतेही धोरण ठरवले जात नाही. उलट आता तर, कित्येक विभागामध्ये 'पैसे दे दो, पोस्टिंग ले लो' या चालीवर पैसे कमावले जातात. यामुळे ज्यांना असे पैसे द्यायचे नसतील त्यांच्या आदर्शवादाला कुठेतरी सुरूंग लागायला सुरुवात होते.

गेल्या काही वर्षात पोलिस रिफॉर्म कमिशनने केलेल्या शिफारशी मंजूर केलेल्या नाहीत. आयएएस अधिकाऱ्यांविषयी मार्गदर्शक तत्त्वं आखून द्या, अशी मागणी माधव गोडबोले यांच्यासारख्या उच्चपदावर राहिलेल्या व्यक्तीने केली होती त्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला. सुब्रह्मण्यम या कॅबिनेट सचिव राहिलेल्या व्यक्तीने पुन:एकदा पीआयएल दाखल केली आहे. मात्र हे पुरेसे नाही. निदान इतर कनिष्ठ अधिकाऱ्यासाठी अशी पॉलिसी तयार करण्याचे काम प्रत्येक खात्यातील विभाग सचिव त्या त्या खात्यातील एकूण कामाचा व पदांचा विचार करून करू शकतात. मात्र तसेही होत नाही. या साठी नोकरीत नव्याने येणाऱ्या युवा पिढीने इथून पुढे जोर लावून धरावा लागेल आणि मॅट (महाराष्ट्र ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ट्रिब्युनल) किंवा कॅट (सेंट्रल ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ट्रिब्युनल) यांची मदत घेता येईल.

आजच्या काळात सरकारी नोकरीत आदर्शवाद राखणे ही एक लक्झरी आहे. मी नोकरीत आले तेव्हा सुरुवातीला मला वाटायचे की खूप दृढनिश्चय असल्यामुळे मी आदर्शवाद जोपासू शकते. पण हळूहळू आजूबाजूला चित्र दिसू लागले की तुम्ही 'जनता' असाल तर तुम्हाला वारंवार भ्रष्टाचाराला तोंड द्यावे लागते आणि कधीतरी वैतागून आदर्शवाद संपुष्टात येतो. मात्र वरिष्ठ अधिकारी असल्यास या वारंवारच्या रूटीन भ्रष्टाचाराला तोंड द्यावे लागत नाही. काही काहीच प्रसंग येतात आणि तेवढे निभावून नेण्याची क्षमता तुमच्याकडे असली की पुरे. याबाबत मला दोन वैयक्तिक उदाहरणे द्यावीशी वाटतात. एका पोस्टिंगमध्ये मी घेतलेल्या निर्णयाने एका कर्पोरेट घराण्याची गोची होत होती. तेव्हा मला निरोप मिळाला की आमच्या मनासारखा निर्णय करा. तुमच्यासाठी अमुक अमुक फॉरेन ट्रेनिंगची सोय करू. पण मी तो धुडकावून लावला. हे सोपे होते. कठीण प्रसंग त्यानंतर आला. मुले दहावी-बारावीच्या तोंडावर आलेली. सर्वत्र भली मोठी कॅपिटेशन फी घेणारी पुढारी कॉलेजेस निघालेली होती. मुले हुशार होती पण त्यांनी अमुक टक्के मार्क मिळवावे यापेक्षा त्यांनी विषय नीट समजून घ्यावा यावर आमचा भर असे. त्यांना ट्रेकिंग, अवांतर वाचन, हॉबीज करता याव्या म्हणून कोचिंग क्लास लावलेले नव्हते. अशा परिस्थीतीत ९८ टक्के वगैरे मार्ग मिळाले नाहीत. म्हणून सरकारी इंजिनिअरींग कॉलेजात प्रवेश मिळाला नाही तर आपण कॅपिटेशन फी पोटी टेबलाखालून पैसे देऊन पुढारी कॉलेजमध्ये जायचे नाहीये याबाबत मानसिकता तयार करून झाली होती आणि अचानक नेमके एक वर्ष आधी उन्नीकृष्णन जजमेंट या नावाने प्रसिध्द असलेला सर्वोच्च न्यायालयाचा निकाल जाहीर होऊन कॅपिटेशन कॉलेजेसमध्येही हुशार मुलांना बिनवशिल्याने प्रवेश मिळण्याची संधी उघडली. हा सुमारे १९९१ मधला निकाल असावा. अशाप्रकारे समाजातील चांगुलपणाच्या घटनेमुळे आदर्शवाद टिकवता आला. अन्यथा पेच मोठा होता. अशाच प्रकारचा पेच इतरांवर येतो. अशावेळी काहींचा आदर्शवाद इतका दृढ असतो की मला चुकीच्या मार्गासाठी पैसे द्यावे लागले तरी चालेल पण मी चुकीच्या मार्गाने स्वत:साठी पैसे घेणार नाही, असा ठामपणा ते दाखवू शकतात. मात्र ते सर्वांच्या बाबतीत टिकत नाहीत.

आदर्शवाद संपण्याची काही दु:खद उदाहरणं मी पाहिलेली आहेत. ज्याला मोह आणि गुर्मी (मला कोण काय करू शकेल) एवढीच दोनच कारणे सांगता येतील. प्रशासनिक सेवेत अत्यंत हुशार, अभ्यासू, कामसू म्हणून गाजलेला अधिकारी - बहुते सर्व पोस्टिंग मनासारखी, प्रेस्टिजियस आणि त्याची तडफ दाखवता येऊ शकेल अशीच मिळालेली. निराश व्हावे असे नोकरीत एकही कारण नाही. पण अचानक आपण थोड्याशा पळवाटांच्या आधारे मुंबईत आणि स्वस्तात, स्वत:च्या पदाचा वापर करून खूपशी घरं घेऊ शकतो. ती घ्यावीत असा मोह निर्माण झाला आणि आदर्शवाद मागे पडला अशी उदाहरणं आहेत.

ती जशी आयएएस अधिकाऱ्यांची आहेत शी इतर मध्यम श्रेणीच्या अधिकाऱ्यांचीही आहेत. त्यामुळे आदर्शवाद का संपतो याचे उत्तर देता येईल. नोकरीत जाच-त्रास झाला, म्हणून वेळच्या वेळी प्रमोशन किंवा सुसंगत आणि मनासारखे पोस्टिंग न मिळाल्याने नैराश्य आले म्हणून किंवा मिळू शकणाऱ्या पैशाच्या मोहात पडले म्हणून. पण किती निराशा सोसावी लागली की आदर्शवाद मोडतो किंवा मोहाच्या कोणत्या क्षणी आदर्शवाद मोडतो याला ठराविक नियम किंवा उत्तर नाही.

''निराशेमुळे आदर्शवाद मोडण्याची स्थिती थांबवायची असेल तर सिस्टिममध्ये सुधारणा पाहिजेत. त्या करायला वरच्या अधिकाऱ्याकडे तगादा लावला गेला पाहिजे. पण नुकतीची नोकरीत आलेली युवा-पिढी घाबरते आणि जसे जसे दिवस-महिने लोटतात तसे तसे त्यांचे मानसिक बळ संपत जाते. मात्र मला अजून तरी उपाय दिसतो. त्यांचे बळ वाढवण्याचा..''

आज महाराष्ट्रात कित्येक स्पर्धा परीक्षा कोचिंग संस्था निघाल्या आहेत. त्यांनी एखादी एकत्र असोसिएशन बांधली तर त्या सरकारकडे असा आग्रह धरू शकतील. मोहापोटी आदर्शवाद संपला असे वारंवार व्हायला नको असेल तर मात्र वरचेवर प्रशिक्षण, संस्कार, नीतिमूल्यांचे सबलीकरण असे उपाय योजावे लागतील तसेच प्रशासनात पारदर्शकता आग्रह धरावा लागेल. या सर्व मुद्यांवर समाजात, शैक्षणिक संस्थेमध्ये, विचारवंतांमध्ये वेळोवेळी चर्चा घडवून आणायला हवी. कारण प्रशासन चांगले असणे, सुप्रशासन असणे आणि युवा पिढीतील हुशार व आदर्शवादी तरुणी-तरुणांनी इकडे वळणे ही आपल्या सर्वांचीच गरज आहे.

युथफुल्ल सिनेमाच्या गोष्टींची गोष्ट

– **श्रीनिवास नार्वेकर** shri.narwekar@gmail.com

श्रीनिवास नार्वेकर

तरुण म्हणजे सळसळता उत्साह... तरुण म्हणजे उत्फुल्लता... तरुण म्हणजे युथफूलनेस... हा उत्साह, ही उत्फुल्लता, हा युथफुलनेस पडद्यावर पकडण्यासाठी आजघडीला प्रत्येक निर्माता प्रयत्न करतोय. अर्थात हे त्यांचे प्रयत्न किती फळतायेत, किती वाया जाताहेत, हे त्या त्या वेळी दिसतंच आहे. भविष्यात हे चित्र अधिक स्पष्ट होणारच आहे, पण आज भारतीय चित्रपटसृष्टी शंभराव्या वर्षात पदार्पण करत असताना एक महत्त्वाचा टप्पा येऊन ठेपला आहे, जो एकूणच भारतीय सिनेमाच्या इतिहासात फार मोठी महत्त्वाची नोंद करुन ठेवणारा आहे. हा टप्पा आहे, युवककेंद्रित सिनेमांचा... हा टप्पा आहे, तरुण वर्गाला नजरेसमोर ठेवून सांगितलेल्या कथांचा... हा टप्पा आहे, तरुण वर्गाला अधिकाधिक आपल्याकडे खेचून घेण्यासाठी सर्वार्थाने होत असलेल्या प्रयत्नांचा... आणि हा टप्पा आहे, अर्थातच, येनकेनप्रकारेण आज काहीशा संदिग्ध रेषेवर उभ्या असलेल्या तरुण वर्गाला हर तऱ्हेनं या जाळ्यात गुरफटवून ठेवण्याचा...

गेल्या काही वर्षातल्या - प्रामुख्याने - हिंदी सिनेमांवर आपण नजर टाकली तर एक गोष्ट प्रकर्षानं लक्षात येते, ती म्हणजे, हे सर्व चित्रपट बव्हंशी आजच्या तरुणवर्गाला नजरेसमोर ठेवून तयार केले गेलेले आहेत. साधारणपणे मध्ये पोरगेलासा आमीर खान आणि बाहुलीसारखी दिसणारी-बोलणारी जुही चावला अशी जोडी पडद्यावर आली आणि 'कयामत से कयामत तक' (नासिर हुसेन, मन्सूर खान) ने इतिहास घडवला. प्रेमात पडावं अशी जोडी आणि तेवढंच प्रेमात असावं असं त्यांच्या प्रेमकथेचं सादरीकरण, यामुळे त्या वेळच्या तरुणांच्या मनात 'कयामत...' घर करून बसला, त्यानंतर अवघ्या चारच वर्षांनी आमीर खान, आयेशा जुल्का वगैरेंचा (पुन्हा नासिर हुसेन, मन्सूर खान) 'जो जीता वही सिकंदर' आला आणि त्यानेही 'कयामत...'प्रमाणेच तरुणांच्या मनात स्थान मिळवलं. त्यापूर्वीच्याच वर्षी आलेल्या महेश भटांच्या 'दिल है कि मानता नहीं'सुद्धा तरुणांच्या मनात जाऊन बसला. आमीर खान नावाच्या एका गोड छोऱ्याने त्या वेळी तरुणांच्या मनात स्थान मिळवलं.

याचदरम्यान, आणखी एक चेहरा रुपेरी पडद्यावर प्रस्थापित होऊ लागला. नासिर हुसेन फिल्म्सच्या 'कयामत...'च्याच पुढल्या वर्षी राजश्रीचा 'मैने प्यार किया' आला. अवघी तरुणाई हिरवळून उठली आणि सलमान खान नावाचा अगदी नवा गडी एका रात्रीत स्टार झाला. मध्ये आणखी एका स्टारचा उदय झाला. त्याचं नाव होतं शाहरुख खान. टीव्हीच्या पडद्यावरून रुपेरी पडद्यावर मध्ये 'दिवाना'तून पदार्पण केल्यानंतर 'डर' आणि 'बाजीगर' ॲण्टीहिरो शाहरुख खान स्टार झाला. त्यापाठोपाठ पुन्हा मध्ये पूर्णपणे कौटुंबिक वळणाचा व तेवढाच युथफुल असलेला 'हम आपके है कौन',मध्ये 'दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे'मध्ये 'राजा हिंदुस्तानी',मध्ये 'दिल तो पागल है'आणि मध्ये 'हम दिल दे चुके सनम'...

म्हणजे ही अकरा वर्षं केवळ आणि केवळ तरुणाईची होती. आज काळ बदलला. तरुणही बदलला. काळाप्रमाणे त्याची आवडनिवड, जीवनशैली, रुचि-अभिरुची (खरं तर अभिरुची हा शब्द अलीकडे फार जपून वापरावा लागतो) बदलली. त्यामध्ये चांगले-वाईट बदल झाले. त्याचे चांगले-वाईट परिणाम एकूण वातावरणावरही झाले. पण या अकरा वर्षांचा इतिहास आजही तेवढाच ताजा आहे. आजही सिनेमांचं महत्त्व तेवढंच आहे. 'दिलवाले दुल्हनिया...'चा शो आजही मराठा मंदिरला नित्यनेमाने होत असतो आणि चक्क आजही 'दिलवाले...' तेवढ्याच उत्साहाने बघणारी मंडळीही आहेत.

थोडक्यात काय, काळ बदलतो, तरुणाईचा वर्ग बदलतो, त्यांची व्यक्त होण्याची-करण्याची पध्दत बदलते, पण एकूण भावना थोड्या फार फरकाने त्याच आणि तशाच प्रकारच्या असतात. आणि हा तरुणाईचा उत्साह जोपर्यंत आहे, तोपर्यंत केवळ आपल्याकडेच नाही, तर एकूणच जगभरात सिनेमामाध्यमाला मरण नाही. आजघडीस भारत हा सर्वाधिक तरुण असलेला देश आहे. भारताचं सरासरी वय वर्षं आहे. पर्यंत तो काहीसा अधिक तरुण होईल, त्याचं वय साधारण होईल. त्यापाठोपाठ संयुक्त राष्ट्र, नंतर चीन व जपान हे तरुण देश आहेत. भारतात आज घडीस ते हा वयोगट सर्वाधिक असल्याचं जनगणनेतून स्पष्ट झालंय. त्यामुळे साहजिकच देशाची सर्वच क्षेत्रांतली एकूणच करारमदार या वयोगटावर आहे. बघा, गोष्टी म्हटल्या तर तशा अगदी साध्या आहेत. गेल्या काही वर्षांत सीसीडी म्हणजे कॅफे कॉफी डे, बरिस्तांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहे आणि आता तर स्टारबक्सही भारतात आलीय. मॉल्स, मल्टीप्लेक्समधली तरुणांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढलीय. तरुणांची या ठिकाणी वाढलेली ही संख्या आपल्याला काय दाखवते तर हा वर्ग पैसा खर्च करू शकतो. कारण या वर्गातील बहुतेक जण स्वत:ला हवा असलेला स्वत: कमावताहेत. त्यामुळेच आपल्याला नेमकं काय आणि कसं हवंय, याची त्यांना पुरेपूर जाणीव आहे. ही जाणीव चुकीची आहे की बरोबर आहे, हा भाग पुन्हा अलाहिदा ! .....आणि अन्य उद्योगांप्रमाणेच सिनेमा हा आपल्याकडेही एक उद्योग असल्यामुळे आजच्या तरुणाकडे सिनेमाची मुख्य बाजारपेठ म्हणून पाहिलं जाऊ लागलंय आणि परिणामस्वरुप गेल्या काही युवककेंद्रित सिनेमांची लाटच्या लाट येऊ लागलीय. या लाटेतले किती सिनेमा तरतायेत, किती सिनेमा बुडतायेत, हा वेगळ्या चर्चेचा विषय... पण एकूणातच सिनेमांचा प्रवाह मोठ्या प्रमाणावर बदललाय, बदलतोय, एवढं नक्की !

तरुण आणि सिनेमा हे नातं पूर्वीपासून चालत आलेलं आहे. आज फक्त या नात्यांतल्या गडदपणात फरक पडलाय. त्या-त्या

> **हा टप्पा आहे, तरुण वर्गाला नजरेसमोर ठेवून सांगितलेल्या कथांचा... हा टप्पा आहे, तरुण वर्गाला अधिकाधिक आपल्याकडे खेचून घेण्यासाठी सर्वार्थाने होत असलेल्या प्रयत्नांचा... आणि हा टप्पा आहे, अर्थातच, येनकेनप्रकारेण आज काहीशा संदिग्ध रेषेवर उभ्या असलेल्या तरुण वर्गाला हर तऱ्हेनं या जाळ्यात गुरफटवून ठेवण्याचा...**

काळातल्या तरुणावर त्यांच्या आवडीनिवडीप्रमाणे त्या-त्या काळातल्या - देशी असो वा विदेशी - सिनेमांचा किंवा कलावंतांचा प्रभाव पडत असतो. मग काही जणांवर दिलीप-राज-देवचा असेल, मधुबाला-नूतनचं गारुड असेल, काही जणांवर रॉबर्ट डी निरो, पॉल न्यूमनचा प्रभाव असेल, ऑड्री हेपबर्न, लिझ टेलर त्यांच्या मनात रुतून बसलेली असेल, गुरुदत्त-बिमल रॉय असतील किंवा कपोला-वायलर असतील. पण गंमत म्हणजे, हे सगलं फार मोठं आहे. सिनेमा उद्योग असतानाही तो एक धर्म म्हणूनही पाळला जायचा. आज या माध्यमाचा उपयोग बव्हंशी धंदा म्हणून केला जातोय आणि या धंद्याचं लक्ष्य आहे, केवळ आणि केवळ युवक... आजचा तरुण वर्ग... आणि उद्योग म्हणून कार्यरत असलेल्या सिनेमाचा नेमका 'धंदा' करण्यासाठीच आपल्याकडे गेल्या दोन-पाच वर्षांत युवककेंद्रित सिनेमांची लाट मोठ्या प्रमाणावर आली आणि आज तर दर पाच सिनेमांमागे किमान एक सिनेमा युवककेंद्रित आहे.

पूर्वीचा तरुणसुध्दा सिनेमा पाह्यचा, तो हळूच... आई-वडिलांना न सांगता... कॉलेजसाठी मिळालेला पॉकेटमनी साठवून... एखादं लेक्चर बंक करून... क्लासला किंवा कुठल्यातरी कामाला जात असल्याची थाप मारून... एकत्र कुटुंब पद्धतीच्या घरांमध्ये तर नव्यानं लग्न झालेल्या जोडप्यानं कधीतरी सिनेमाला जाणं हे खरं तर सिनेमा पाहण्यापेक्षा एकांत मिळवण्यासाठीचं एक महत्त्वाचं कारण असायचं. हळुहळू हा तरुण स्वायत्त होत गेला. स्वत:चे निर्णय स्वत: घ्यायला त्याने सुरुवात केली. त्याची वैचारिक दृष्टी बदलत गेली. त्याची मानसिकता बदलत गेली. जसजसा काळ बदलू लागला, परिस्थिती बदलू लागली, तसतसा एकूण सिनेमाही बदलू लागला. वर म्हटल्याप्रमाणं बव्हंशी तरुणांचे निर्णय तरुण स्वत: घेऊ लागले. काय पाह्यचंय, हे ते स्वत: ठरवत असल्यामुळे आणि गेल्या काही वर्षांच्या काळात तर सीडी-डीव्हीडीज्, इंटरनेट, फिल्म सोसायटीज्, फिल्म फेस्टिव्हल्स यांचे प्रमाण वाढल्यामुळे तरुणांसाठी सिनेमांचं विश्व अधिक व्यापक झालं आणि त्यातून त्यांच्या आपल्या सिनेमाबद्दलच्या अपेक्षा बळावल्या. त्यामुळे साहजिकच निर्मात्यांनाही त्याचा विचार करणं भाग पडू लागलं. शिवाय आजच्या काळातली तरुण पिढी प्रचंड टेक्नोसॅव्ही आणि तांत्रिकदृष्ट्या अगदी हुशार असल्यामुळे त्यांच्या अपेक्षेला उतरणारा सिनेमा देणं, ही निर्मात्यांची व तरुण प्रेक्षकवर्गाचीही गरज बनली. शिवाय असे सिनेमा बघायला येणारा बहुसंख्य तरुण प्रेक्षक हा क्रिमीलेअर असल्यामुळे विषयही तसेच शोधणं क्रमप्राप्त बनलं. आणि त्यातून काही सिनेमे बनले. त्यांना खूप चांगला प्रतिसादही मिळाला. काही लो-बजेट सिनेमांनी तर खूप चांगला व्यवसाय करून दिला. अडचण एकच होती, या गटातल्या तरुण वर्गाला आकर्षून घेऊ शकणारे विषय हे अर्थातच मध्यमवर्गीय तरुण वर्गापासून काहीसे दूर असलेले होते. अजून त्यांना त्याची झळ बसलेली नाहीय म्हणा, किंवा परिस्थितीस्वरुप त्यांना तशा कोणत्याही परिस्थितीचा अनुभव घेता आलेला नाहीय म्हणा, पण हे विषय त्यांच्यापासून दूर होते. या सिनेमांचा आनंद घेतला त्यांनी. पण कितीतरी विषयांशी त्यांना जवळीक साधता आली नाही. युवककेंद्रित चित्रपटांमध्ये पुन्हा एकदा ते करा वर्षांचा काळ resurrect झाल्यासारखा उभा राहिला खरा, पण त्यामध्ये कृती आणि वृत्तीने बराच फरक पडला. पूर्वीच्या मानाने आताचा काळ काहीसा अधिक चंगळवादी झाल्यामुळे आपण अधिकाधिक दुसऱ्यांच्या पुढे कसे राहू, किंवा आपला समोरच्यावर कसा प्रभाव पडेल, याकडे जास्तीत जास्त लक्ष देणारा तरुण वर्ग आपल्या फोनवरचे रिंगटोन्स, कॉलरटोन्स यांची 'निवड' करायला लागला. 'चॉईस' हा त्यांच्या बाबतीत महत्त्वाचा घटक बनला. पश्चिमी चित्रपट पाहण्याची संधी उपलब्ध झाल्यामुळे तो परदेशी सिनेमाशी तुलना करत आपला सिनेमा पाहू लागला आणि नाही आवडला तर सरळ नाकारू लागला. त्यामुळेच चित्रकर्त्याला आपल्या निर्मितीबद्दल अधिक सजग राहायची गरज भासू लागली. पूर्वी आपला चित्रपट कलात्मकदृष्ट्या लोकांना आवडायला हवा, अशी बव्हंशी भावना असायची. आज लोकांना काय आवडेल, आवडतं, आणि कशा पध्दतीने आवडतं हे पाहून सिनेमा बनवला जातो. मग ती आवड नो एन्ट्री, क्या कूल है हम किंवा गोलमाल छाप का असेना... ती आवड महत्त्वाची मानली जाऊ लागली. आजघडीला कलात्मकता किंवा वैचारिकता यापेक्षा मार्केटिंग हा अत्यंत महत्त्वाचा घटक मानला जातोय आणि साहजिकच त्यासाठी केवळ आणि केवळ उत्पन्नाकडेच लक्ष ठेवून एकूण सिनेमाची उभारणी व मांडणी केली जाते. त्यामुळे मग साहजिकच मातीही चकचकीत आवरणात गुंडाळून सोन्याच्या भावात विकली जात असल्याचे आज चित्र आहे.

ते या प्रातिनिधिक वर्षातल्या वर उल्लेखलेल्या सिनेमांवर जर आपण नजर टाकली, तर एक गोष्ट नक्कीच लक्षात येईल की तरुणाईसाठी तयार करण्यात आलेल्या या सर्व सिनेमांचं सार प्रेम आहे. मग ते 'कयामत...' किंवा 'मैने प्यार...'चं अल्लड प्रेम असो, 'दिल है कि...' अनाहूत सहवासानं निर्माण झालेलं प्रेम असो, 'दिल तो पागल है' किंवा 'हम दिल दे चुके सनम'मधलं त्रिकोणातलं प्रेम असो, किंवा अगदी 'डर' आणि 'बाजीगर'मधलं हिंस्र प्रेम असो, सर्वांचा गाभा एकच होता... प्रेम... फक्त त्याच्या मांडणीची पद्धत वेगवेगळी होती, पण तीव्रता सगळ्यांची सारखीच होती आणि त्या वेळच्या तरुणांनी ती स्वीकारली. तरुणांचे प्रश्न गंभीरपणाने मांडणाऱ्या चित्रपटांची निर्मिती करावीशी वाटली नाही कोणाला. प्रेम ही गोष्ट वगळून तरुणांचं जग, तरुणांचं भावविश्व, त्यांचे प्रश्न या

> **पूर्वीचा तरुणसुध्दा सिनेमा पाह्यचा, तो हळूच... आई-वडिलांना न सांगता... कॉलेजसाठी मिळालेला पॉकेटमनी साठवून... एखादं लेक्चर बंक करून... क्लासला किंवा कुठल्यातरी काम ाला जात असल्याची थाप मारून... एकत्र कुटुंब पद्धतीच्या घरांमध्ये तर नव्यानं लग्न झालेल्या जोडप्यानं कधीतरी सिनेमाला जाणं हे खरं तर सिनेमा पाहण्यापेक्षा एकांत मिळवण्यासाठीचं एक महत्त्वाचं कारण असायचं.**

गोष्टी सजगतेनं मांडाव्याशा वाटल्या नाहीत कोणाला. कारण मुळात आपल्याकडे आजही सिनेमा हा केवळ आणि केवळ मनोरंजनाचे माध्यम म्हणूनच समजला जातोय. त्यामुळे दोन घटका करमणूक याच दृष्टीने त्याकडे पाहीलं जातंय. काही अपवाद आहेत, पण नेहमीप्रमाणेच अपवाद नियम सिध्द करत नसतात.

गेल्या दहा वर्षांत काळ झपाट्याने बदलला. आजही प्रेमकथांची चलती आहे. थोड्याफार फरकानं त्यात वैविध्य आहे, genre मध्ये फरक पडलाय तो एवढाच की प्रेमकथांच्या बरोबरीनेच आता गुन्हेगारीपट हा विषयदेखील युवककेंद्रित होऊ लागलाय. मला वाटतं, प्रेमकथांपेक्षा या गुन्हेगारीपटांमध्ये, त्यांच्या विषयांमध्ये काहीसं वैविध्य आहे. अग्निपथ, आमीर, अन्वर, भेंडी बाजार, जॉनी गद्दार, नायगन, वेनस्डे, वन्स अपॉन अ टाईम इन मुंबई, ओमकारा, वास्तव, मकबूल, सेहर, कमिने, गुलाल, गँग्ज ऑफ वासेपूर, फूटपाथ, अपहरण अशी बरीच नावं घेता येतील. अणि बरेचसे सिनेमे युवककेंद्रित आहेत. आणि त्यांना तरुणांनीही चांगला प्रतिसाद दिलेला आहे. एकूणच युवककेंद्रित सिनेमांची हळूहळू तयार होत जाणारी बाजारपेठ लक्षात घेत यशराज फिल्म्सने 'वाय फिल्म्स'चा बॅनर उभा केला. ज्यामध्ये सबकुछ तरुणच, ही संकल्पना होती. तरुणांनी तरुणांसाठी तयार केलेला तरुणांचा सिनेमा, या पायावर 'वाय फिल्म्स' सुरू झाली. त्यांनी केलेला पहिला सिनेमा 'जॉन टकर मस्ट डाय'वरून बेतलेला 'लव का द एण्ड' हा होता. याचा गाभादेखील प्रेम हाच होता. ज्युनिअर कॉलेजमधल्या मुलांचं प्रेम. आता हे प्रेम की आकर्षण हा आणखी एक वेगळा मुद्दा. पण अगदी तुमच्याआमच्यातलीच वाटणारी कोवळी मुलं, त्यांचं प्रेमप्रकरण, त्यांच्या अडचणी यांच्याशी तरुण झटकन रिलेट झाला. तरुणांमध्ये प्रचंड लोकप्रिय व सर्वार्थानं 'हॅपनिंग एक्साइटमेंट' असलेल्या सोशल नेटवर्किंग साईटचा आधार घेऊन केलेल्या वाय फिल्म्सचाच 'फ्रेंडशिप करोगे' हादेखील युवककेंद्रित सिनेमाच्या प्रवाहातलाच एक भाग होता.

गंमत म्हणजे, ते या काळात आमीर, सलमान, शाहरुख हे तीन खान आणि त्यानंतर अजय देवगण, अक्षयकुमार पडद्यावर आल्यानंतर अगदी कालपर्यंत आपल्या सिनेमातला तरुण नायकही पस्तीस-चाळीशीचा होता. अनिल कपूर, सनी देवलही 'दणकट'. तरुण मंडळीसुध्दा तरुण नायक म्हणून काम करत होती. गेल्या दहा वर्षांत मात्र हे चित्र झपाट्यानं बदललं आणि तरुणांना पडद्यावर स्वत:चे अनेक चेहरे सापडू लागले. ते ही तीन दशकं सर्वस्वी दिलीपकुमार, राज कपूर, देव आनंद यांची होती. चं दशक आधी राजेश खन्नाचं होतं, मग अमिताभ बच्चनचं.. त्या त्या काळातल्या तरुणांची ही प्रेरणास्थानं होती. अमिताभ बच्चन तर आजही 'युथफुल' आहे. वयाच्या सत्तरीतही त्याचा करीश्मा कायम आहे. या वयातही 'बुड्ढा होगा तेरा बाप' वगैरेसारख्या चित्रपटांनी तो तरुणाईला आजही तेवढंच आकर्षून घेऊ शकतो, हे त्यानं सिद्ध केलेलं आहे.

पण अमिताभ हा एकमेव अपवाद वगळता, पस्तीस-चाळीशीचा तरुण बघणं आताच्या तरुणांना कंटाळवाणं वाटू लागलं. शाहरुखच्या चेहऱ्यावर तर आता बऱ्यापैकी सुरकुत्या दिसू लागल्यात. तरीही तरुण नायक म्हणून पडद्यावरचा वावर कायम आहे. सलमान आपल्या 'अंगी'भूत गुणांवर अजूनही तरुणांच्या मनात टिकून आहे. वॉन्टेड, दबंग, बॉडीगार्ड, एक था टायगर ही सलमानच्या निर्विवाद प्रभावाची उदाहरणं आहेत. आमीरची स्वत:ची एक शैली आहे. पण प्रत्येक वेळी त्या शैलीनं तो तरुणांना आकर्षून घेतोच असं, नाहीय. अलीकडल्या काळातला 'गजनी' वगळता तरुणांवर आमीरचा प्रभाव राहिलेला नाही. शिवाय ही तिन्ही खान मंडळी 'स्टार' आहेत आणि त्यांनी आपलं स्टारडम जपलेलंही आहे. त्यामुळे आता आजचा तरुण या स्टारडमच्या प्रभावातनं बाहेर पडू इच्छित आहे अणि त्याचाच परिणाम म्हणून स्टारडम न दिसणाऱ्या चेहऱ्यांना स्वीकारायला तरुणांनी सुरुवात केली. आणि सुदैवाने यांचे सिनेमेही तुलनेने चांगले निघाले.

'जाने तू या जाने ना' आणि त्या पाठोपाठ 'देल्ली बेल्ली' व 'एक मैं और एक तू'त इम्रान खानने आपला ठसा तरुणांच्या मनावर उमटवला. 'सांवरीया' आणि त्यापाठोपाठ 'वेक अप सिद' रणबीरने आपलं स्थान पक्कं केलं, ते अगदी कालपर्यंतच्या 'रॉकस्टार' आणि 'बर्फी'पर्यंत. 'बँड बाजा बारात' एकदम पुढे आलेला रणवीर सिंगसुद्धा तरुणांचं आशास्थान आहे. बायांमध्ये दीपिका पदुकोण, अनुष्का शर्मा, परिणिती चोप्रा, कल्की कोचलीन आणि या सगळ्यांबरोबरच अगदी करीना कपूरसुध्दा तरुणांच्या मनात घर करून आहेत. करीनानं आपलं तरुणपण अजूनही टिकवून ठेवलंय.

मधला एक काळ हृतिक रोशनचा होता. मध्ये 'कहो ना प्यार है' आला आणि हृतिक एका रात्रीत स्टार झाला. त्यानंतर 'कोई मिल गया' आणि त्यापाठोपाठ क्रिश, धूम, जोधा अकबर या सिनेमांनी त्याचं तरुणांच्या मनातलं स्थान पक्कं केलं. कहो ना...पाठोपाठ मध्ये फरहान अख्तरनं 'दिल चाहता है' आणला आणि तरुणांच्या सिनेमांची एकूण गणितंच बदलून गेली. 'दिल चाहता है'चं गारुड आजही तरुणांच्या मनावर कायम आहे. त्यापूर्वी अभिनयाच्या नावानं बोंब असणारा सैफ अली खान 'दिल चाहता हैं' मुळं अभिनय करू शकतो, असा समज निर्माण झाला आणि त्यानंतर त्यानं कष्टपूर्वक स्वत:ला सुधारलं. त्याचे त्यानंतरचे सिनेमे अभिनयाच्या बाबतीत अधिकाधिक

> **हे आतापर्यंत आपण बोललो, बॉलीवूडच्या युवककेंद्रित सिनेमांबद्दल. पण बॉलीवूडच्या मानाने, मला वाटतं, बंगाली सिनेमांमध्ये युवक केंद्रित सिनेमांचं, आणि तेसुध्दा वैचारिक पातळीवर अधिक समृद्ध असलेल्या युवक केंद्रित सिनेमांचं प्रमाण काहीसं अधिक आहे.**

चांगले होत गेले. साहजिकच काहीसा थोराड असूनही सनी देवल किंवा अनिल कपूरपेक्षा सैफला तरुणांनी सहज स्वीकारला आणि त्यानंही त्यांचा आपल्यावरचा विश्वास सार्थ ठरवला.

मला वाटतं, हृतिक, रणबीर, इम्रान, रणवीर, प्रतीक बब्बर, अनुष्का, दीपिका अण्णि त्यांच्याबरोबरच सैफ, करीना ही तरुणांच्या मनातली आजची स्थानं आहे. नॉन-ग्लॅमरस चेहरा असलेला पण प्रचंड ऊर्जा आणि अभिनयाची ताकद असलेला नवाजुद्दीन सिद्दीकीसुध्दा तरुणांच्या मनातला ताईत बनू पाहतोय. काही वेळा कितीतरी लो बजेट सिनेमे मुख्य धारेतल्या सिनेमांपेक्षा खूप उजवे असूनदेखील केवळ प्रसिद्धीअभावी ते मागे राहतात. सुपरड्युपर होण्याची क्षमता असते त्यांच्यात. पण होत नाहीत. काही बऱ्यापैकी गल्ला गोळा करतात, काही अयशस्वी ठरतात. त्यापैकी काही सिनेमे म्हणजे 'पहला पहला प्यार' (एमपी) - यातल्या रसलान मुमताझनं खूप गोड काम केलं होतं. तोच नंतर 'तेरे संग'ध्ये होता. एमपी ही टिपीकल ज्युनिअर कॉलेजगोअर्सची टिनएज लव्ह स्टोरी होती. छोट्या छोट्या गोष्टींनी खूप छान खेळवला होता सिनेमा. 'तेरे संग' हा धोक्याच्या वयाच्या उंबरठ्यावरल्या षोडषवर्षीयांची गोष्ट होती. अल्पवयीन मुलीच्या प्रेग्नंट राहण्याचा विषय असूनदेखील खूप छान संयतपणे हाताळला होता सिनेमा. बॅण्ड बाजा बारात, एक दिवाना था, एक मैं और एक तू, जोडी ब्रेकर्स, तनु वेडस् मनू हे अशा सिनेमांनीही तरुणाईला आपल्याकडे खेचून आणले. 'दिल चाहता हैं'प्रमाणेच तीन मित्रांची गोष्ट सांगणारा झोया अख्तरचा 'जिंदगी ना मिलेगी दोबारा' तरुणाईनं डोक्यावर घेतला. 'लव्ह सेक्स धोखा' हा वेगळ्या धाटणीचा सिनेमा देणाऱ्या दिबाकर बॅनर्जीचे खोसला का घोसला, ओये लकी लकी ओये हेसुध्दा तरुणाईचेच सिनेमे होते. जॉनी गद्दार, कमिने, या गुन्हेगारीपटांनाही तरुणाईनं आपल्या मनात स्थान दिलं.

'प्रेम' ही एकच संकल्पना वेगवेगळ्या पद्धतींनी, वेगवेगळ्या genre नी मांडण्याचा प्रयत्न करणारे, त्याचबरोबर वेगवेगळे विषय अगदी हलक्याफुलक्या पध्दतींनी मांडू पाहणारे सिनेमेही आले आणि त्यांनाही तरुणांनी चांगला प्रतिसाद दिला. स्पर्म डोनेशनसारखा गंभीर विषय अगदी हसतखेळत मांडू पाहणारा 'विकी डोनर'देखील तरुणांनी सहजपणे स्वीकारला. अर्थात हा विषय एवढ्या उथळपणे घ्यायचा का, हा जरी वेगळ्या चर्चेचा विषय असला, तरी त्यामध्ये काही व्यावसायिक गणितं दडलेली होती, हे एकदा मान्य केलं की केवळ विषयाचं वेगळेपण आणि त्याची धाडसानं केलेली मांडणी या गोष्टी, माझ्या मते, महत्त्वाच्या ठरतात. स्ट्रगलर्सचा प्रवास दाखवणारा झोया अख्तरचा लक बाय चान्स, तरुण मनसुखानीचा दोस्ताना, इम्तियाज अलीचा रॉकस्टार, हबीब फझलचा इश्कजादे, एकता कपूर बॅनरचा रागिणी एमएमएस, कश्यप बिजॉय नंबियारचा शैतान, राजकुमार हिरानीचे मुन्नाभाई एम बीबीएस, लगे रहा मुन्नाभाई, थ्री इडीयटस्, सागर बलेरीचा भेजा फ्राय हे काही महत्त्वाचे 'तरुण' सिनेमे आहेत.

हल्लीच्या तरुणाईच्या भाषेत, विचार करण्याच्या यंत्रणेत फार मोठा बदल झालाय आणि तरुणाईचे चित्रपट बनवण्याच्या नावाखाली त्याचं चित्रसुध्दा सिनेमांमधून दिसलं. नो एण्ट्री, मस्ती, क्या कूल है हम, क्या सुपर कूल है हम या सिनेमांतनं आजच्या तरुणाईची तथाकथित भाषा आणि वैचारिकतेचं प्रदर्शन झालं. कमरेखालच्या विनोदांना दाद देणारी तरुणाई प्रामुख्याने याच काळात 'बहरली' आणि विनोदी चित्रपट म्हणजे, अशा प्रकारचे विनोद व चाळे असलेला सिनेमा अशी काही जणांनी धारणा होऊन त्यांनी एकाच धारेत भाराभर सिनेमे गाळायला सुरुवात केली. पण प्रत्येक सिनेमाचा एक एक काळ असतो, तेवढ्या काळापुरता तो सशपीश चालतो, मग स्थित्यंतर येते, पट बदलतो, प्रवाह बदलतो, एक नवा सशपीश रुळू लागतो. पण तरीही 'प्रेम' सशपीश असलेल्या सिनेमांना तसं कधीही मरण नसतं. फक्त ते कशा पध्दतीनं हाताळले जातात, त्यावर त्या सिनेमाचं यशापयश ठरतं. आजही रोमँटिक कॉमेडी सशपीश हैद्राबाद ब्लूज' हा साली आलेला नागेश कुकनूरचा सिनेमा एका वेगळ्या 'तरुण' सिनेमाचं प्रतीक वाटतो मला. कुकनूरचाच 'इक्बाल'ही एक महत्त्वाचा तरुण सिनेमा आहे. राकेश ओमप्रकाश मेहराचा 'रंग दे बसंती' आणि रोहित शेट्टीचा तद्दन व्यावसायिक 'सिंघम' हे परस्परविरोधी टोकाचे सिनेमेही त्यातल्या 'युथफुल्ल'नेसमुळे आजचा तरुण स्वीकारतो.

आरक्षणाचा विषय हा कॉलेजयुवकांमध्ये आजही काही ठिकाणी फार ज्वलंत आणि त्रासदायक आहे. प्रकाश झांचा 'आरक्षण' किती गंभीर होता, यावर चर्चा न करता केवळ आरक्षणाच्या विषयामुळे हा सिनेमादेखील 'युथफुल' ठरला हे विचारात घेणं गरजेचं आहे. लेडीज व्हर्सेस रिकी बहल, मिलेंगे मिलेंगे, वेगळे सटायरीकल सिनेमे म्हणून तेरे बिन लादेन, फंस गये रे ओबामा हे सिनेमेसुध्दा तरुणाईच्या मनातले ताईत ठरले. जोडी ब्रेकर्स, तनु वेडस् मनू यासारखे चित्रपट रुळलेल्या वाटेनं न जाता काहीशा वेगळ्या पद्धतीने जातात, त्यामुळे बरं वाटतं. हा असा वेगळा प्रवाह स्वीकारायची एकदा तरुणाईला सवय लागली, निर्मात्यांना त्यांच्याबद्दल खात्री वाटू लागली की नक्कीच काही ना काही प्रयोग होत राहतील आणि काहीतरी वेगळं चित्र नक्कीच निर्माण होऊ शकेल.

आज जवळजवळ ६०% लोकसंख्या ३० वर्षांखालची आहे. या वर्गाचे प्रश्न, त्यांच्या समस्या, त्यांची मानसिकता, वैचारिकता वेगळी आहे. एलीट क्लासमधला तरुण, मध्यमवर्गीय तरुण आणि झोपडपट्टीतला तरुण या तिन्ही वर्गातील तरुणांच्या समस्या, त्यांचे प्रश्न वेगवेगळे आहेत. आणि आपण या सर्व चित्रपटांवर नजर टाकली, तर काही अपवाद वगळले, तर बरेचसे सिनेमे हे एलीट क्लासच्या तरुणाईचे आहेत. त्या वर्गात वापरले जाणारे शब्द, शिव्या, त्यांची लाईफस्टाईल, वावर हा या सिनेमांचा यूएसपी

होतोय आणि मध्यमवर्गीय व झोपडपट्टीतल्या तरुणांनादेखील त्याच यूएसपीच्या जोरावर या सिनेमांकडे खेचले जातेय. मला वाटतं, या एलीट क्लाससाठी बनवल्या जाणाऱ्या तरुणाईच्या सिनेमांबरोबरच उरलेल्या दोन वर्गातील तरुणांसाठीही त्यांचे म्हणून सिनेमे बनवले जावेत. झोपडपट्टीतल्या किंवा कनिष्ठ वर्गीय तरुणांची कथा म्हणून बऱ्याच वेळा गुन्हेगारीपटच समोर येतात. त्यात वेगळेपणा येण्याची गरज आहे.

तरुणाईचा सिनेमा म्हणजे केवळ प्रेमाचा सिनेमा नव्हे... तरुणाईचा सिनेमा म्हणजे केवळ एलीट क्लासची प्रचलीत हिंग्लिश बोली भाषा, त्यांचा मुक्त वावर नव्हे... अर्थात तरुणांना केवळ तरुणाईचेच सिनेमे हवे असतात, असंही नाही. पण आपलं वाटावं असं काहीतरी त्यांना त्यात हवं असतं. हे आपलं वाटणारं द्यायला ज्या सिनेमांना जमतं, ते तरुणांच्या मनात बसतात. मात्र अलीकडल्या काळात मुळातच तरुणवर्गाच्या मानसिकतेचा कल फारसा गंभीर होण्याकडे/राहण्याकडे नसल्यामुळे त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोनही फारसा गंभीर नाही, हे वेळोवेळी दिसत आहे. (मी अपवादात्मक टक्केवारीबद्दल बोलत नाहीये.) हा गंभीर नसलेला दृष्टिकोन खरं तर आजच्या तरुणाईला कुठे नेणार आहे, ठाऊक नाही, पण ब-याच वेळा, जे काही होतंय, घडतंय, ते कुठेतरी बदललं पाहिजे, काहीतरी सुधारलं गेलं पाहिजे, असं सारखं वाटंत राहतं, पण बदलणं, सुधारणं म्हणजे नेमकं काय आणि कसं, हे प्रश्न उरतातच.

तरुण हे आज सिनेमाची मुख्य बाजारपेठ बनू पाहत आहे आणि बाजारपेठेचं गणित प्रामुख्याने शहरी आणि शहरीकरणाकडे व संस्कृतीकडे आकर्षिल्या गेलेल्या तरुणांकडे लक्ष केंद्रित करून मांडलं जात आहे. मुळातल्या शहरी, चंगळवादी तरुणाईला या सगळ्या गोष्टीचं फॅसिनेशन आहे, आणि त्याचं आकर्षण वाटून ग्रामीण किंवा निम-शहरी तरुणही काहीसा या वावटळीत खेचला जातोय. हे चित्र म्हटलं तर दुर्दैवी आहे, म्हटलं तर प्रागतिक आहे. पण हे अशा प्रकारचं फॅसिनेशन कधीही प्रागतिक नसतं, नसावं... मल्टिप्लेक्स, सीसीडी, बरिस्तामध्ये तासन्तास घालवणाऱ्या, दिवसाकाठी भरपूर खर्च करू शकणाऱ्या, निर्माता व थिएटरमालकांना मोठ्या प्रमाणावर महसुली उत्पन्न मिळवून देणाऱ्या तरुणाईसाठी प्रामुख्याने आजचा सिनेमा तयार होतोय, हे वास्तव आहे. त्यामुळेच हे वातावरण अधिकच 'युथफुल' करण्याच्या प्रयत्नात केवळ धंदा समोर ठेवूनही काही प्रयोग (!!!) केले जातायेत. हलकट जवानी, चिकनी चमेली हे तेच तर उद्योग आहेत. तरुणाईसाठी (एकूणच जमातीसाठी अर्थात) नेहमीच आकर्षणाचा विषय असलेला सेक्स शक्य होईल तेवढ्या पद्धतींनी विकला जातोय.

हे आतापर्यंत आपण बोललो, बॉलीवूडच्या युवककेंद्रित सिनेमांबद्दल. पण बॉलीवूडच्या मानाने, मला वाटतं, बंगाली सिनेमांमध्ये युवक केंद्रित सिनेमांचं, आणि तेसुध्दा वैचारिक पातळीवर अधिक समृद्ध असलेल्या युवक केंद्रित सिनेमांचं प्रमाण काहीसं अधिक आहे. अलीकडेच आलेल्या बपी बरी जा, तीन यारी कथा, काही वर्षांपूर्वीचा कालबेला किंवा असे अन्यही काही सिनेमे विचारात घेण्यासारखे आहेत. पण मुळात बंगाली सिनेमा हा कलात्मक बाबींसाठी प्रामुख्याने चर्चिला जातो. त्यामुळे बंगाली सिनेमे अशा प्रकारच्या विषयांची मांडणी काहीशा गंभीरपणाने करतात, हे नक्कीच आशादायी चित्र आहे. दक्षिणी भाषेतल्या तरुणाईच्या सिनेमांची तर वेगळीच गत आहे. ते चित्र बॉलीवूडपेक्षाही भयानक आहे. त्यामुळे दाक्षिणात्य सिनेमांमधल्या 'तरुण' सिनेमांबद्दल बोलण्यात फार काही अर्थ नाही, नसतो. असो..

तरुणाईचे सगळे सिनेमे सहजपणे स्वीकारणारा आजचा तरुण त्यामुळेच 'कोलावेरी डी' अगदी सहजपणे स्वीकारतो आणि अवघ्या काही तासांच्या आत देशभरातल्या तरुणांच्या तोंडावर रुळते, 'गंगनम'चं स्वागतही ही तरुणाई तेवढ्याच उत्साहाने करते. 'धूम' त्यातल्या एकुणातल्याच तरुणाईच्या धूममुळे थेट घुसतो. रोजा, माचिस, दिल से यासारखे वेगळ्या पार्श्वभूमीवरचे चित्रपटदेखील तरुणाईला आकर्षून घेतात.

मराठीत मात्र अशा प्रकारच्या युथफुल सिनेमांचं प्रमाण फार कमी आहे. च्या दशकात सचिन, अशोक सराफ, महेश कोठारे, लक्ष्मीकांत बेर्डे यांना तरुणांनी स्वीकारलं खरं, पण....

पुन्हा आलाच की हा पण...

सध्या भरत जाधव, संजय नार्वेकर, मकरंद अनासपुरे, अंकुश चौधरी ही नावं आहेत मराठीत.. पण त्यातलं कुणीच 'युथफुल' म्हणावं असं, हुकमी तरुण खेचू शकेल, असं नाहीये. नाही म्हणायला, मराठीत ठोकळा चेहरा असला तरी गोंडस दिसणारा विवेक, रवींद्र महाजनी, विक्रम गोखले हे देखणे चेहरे होऊन गेले. पण आजच्या घडीला मराठीत ना 'युथफुल' चेहरा आहे, ना एखाददुसरा 'शाळा', 'देऊळ' किंवा थोड्या फार प्रमाणात 'काकस्पर्श' वगळता दुसरा 'युथफुल' सिनेमा आहे. 'काकस्पर्श'ही मधली का असेना, एका तरुण विधवेची गोष्ट आहे, आणि ती गोष्ट आजच्या तरुणाईनं स्वीकारली. मराठीत आजघडीला 'युथफुल' काहीच नाही, हे विधान काहीसं धारदार वाटण्याची शक्यता आहे. पण त्याला पर्याय नाही. काही अपवाद वगळता मराठी सिनेमे ज्या पध्दतीने चाललेत, ते पाहता आणखी काय बोलता येईल

एकूणात काय, आजचा 'युथफुल' सिनेमा प्रामुख्याने बॉलीवूडमध्ये जो तयार होतोय, तो काहीसा व्यवसायकेंद्री आहे, त्यांना युवकांच्या समस्या घेऊन काही मांडण्याचा व त्याद्वारे युवककेंद्रित सिनेमा देण्याचा प्रयत्न करायचा नाहीय, तर आजच्या तरुणाईची नेमकी मानसिकता व वैचारिकता () लक्षात घेऊन आम्ही पूर्णपणे युवककेंद्रित सिनेमांकडे लक्ष देतोय, अशी हाकाटी पिटत आपला धंदा वाढवायचा आहे. पण तरुणाईला आवडणारा सिनेमा आणि तरुणाईचा सिनेमा या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. निर्मात्यांच्या (आणि दिग्दर्शक-कलावंत व प्रेक्षकांच्याही) वैचारिकतेत व मानसिकतेत असा काही बदल झाला, तर आणि तरच तरुणाईला थेट भिडणारा, त्यांच्या समस्या मांडणारा, त्यांची उकल शोधणारा त्यांचा स्वत:चा असा सिनेमा तयार होऊ शकेल.

अवधुत परळकर

माणूस : खुर्चीअल्याडचा आणि पल्याडचा

दीप्ती राणे, वय वर्षे एकोणीस, ही रूइया कॉलेजातली विद्यार्थिनी. काही महिन्यांपूर्वी टाइम्स ऑफ इंडियात तिचं एक लहानसं पत्र प्रसिद्ध झालं होतं. बेस्टच्या डेपोत तिला आलेला एक अनुभव तिनं पत्रात सांगितला होता.

काय होतं या दीप्तीच्या लहानशा पत्रात दीप्ती पत्रात म्हणते . . .
''कॉलेजातला पहिला दिवस होता. मी त्या दिवशी चुकीच्या बसमध्ये चढले. दुपारी साडेतीनला माझी बस शीव डेपोत पोचली. मला क्रमांक २२ ची बस हवी होती. शीव डेपोत मी पहिल्यांदा येत होते त्यामुळे मी गोंधळून गेले. मला २२ क्रमांकाच्या बसचा स्टॉप सापडेना. मी डेपोतल्या चौकशी खिडकीपाशी गेले. २२ चा स्टॉप कुठे आहे म्हणून तिथं बसलेल्या माणसाला मी विचारलं. उत्तराऐवजी बराच वेळ तो टक लावून माझ्याकडे पाहत राहिला. नंतर म्हणाला, स्टॉप कुठं आहे ते तू स्वतः शोधून काढ. त्या चौकशी खिडकीच्या बाजूला एक फलक होता. त्यावर लिहिलं होतं...मी आपली काय सेवा करू तरी वरील प्रकरणी बेस्टच्या महासंचालकांनी लक्ष घालून त्या व्यक्तीवर योग्य ती कारवाई करावी.''

कल्पना आहे दीप्तीचं पत्र समोर ठेवल्यावर काही वाचक म्हणतील- हे काय लावलंय आम्हाला कशाला ऐकवताय हे आम्हाला यात काही नवीन नाही.

यात काही नवीन नाही हे खरं आहे. पण यात काही नवीन नाही म्हणूनच याकडे लक्ष वेधून घेणं मला आवश्यक वाटतं. ही घटना पहिल्यांदा घडत असती तर.. येतो केव्हातरी असा चमत्कारिक अनुभव म्हणून त्याकडे दुर्लक्ष करता आलं असतं. काऊंटरपाशी बसलेली व्यक्ती शेवटी माणूसच असते; कामाच्या ओझ्यामुळे किंवा घरच्या काही समस्यांमुळे वैतागून माणूस कधी कधी असा वागतो अशी स्वतःची समजूत घालता आली असती. पण चौकशीच्या खिडकीत बसलेल्या व्यक्तीचं हे उर्मट वागणं; नेमून दिलेलं काम न करणं हे आता रूटीन बनलंय. आपल्यापैकी अनेक हा उद्वेगजनक अनुभव रोजच्या रोज घेत आहेत. चालायचंच म्हणून आपण हे सारं स्वीकारलंय हे तर त्याहून उद्वेगजनक आहे. व्यवस्थेतल्या गलथानपणाबद्दल आपण सारे वर्षानुवर्षे कुरकुरत आलो आहोत. पण फक्त आपसात कुरकुर. कृती नाही.

काऊंटरवर बसलेली माणसं अशी का वागतात समोरच्या व्यक्तीला योग्य ती माहिती पुरवणं हा आपल्या कामाचा भाग आहे; त्यासाठी आपल्याला दरमहा वेतन मिळतं याची त्यांना अजिबात जाणीव नसते की काय खूप लहान वयापासून मी काऊंटरपलीकडच्या माणसांना पाहत आलोय. अनेकजण तर पेपरातून डोकं वर काढून पाहातही नाहीत. घसा खाकरून आपल्याला त्यांचं लक्ष वेधून घ्यावं लागतं. घराजवळच्या एका बँकेत परवा गेलो होतो. दुपारची वेळ. बँकेत गर्दी नव्हती काऊंटरपाशी मीच एकटा उभा होतो. पण पलीकडचा माणूस मी उभा असल्याची दखल घ्यायलाही तयार नव्हता. पाच-दहा मिनिटं गेली, तो मान उचलून वर पाहीच ना मग मी गंमत केली; मी त्या काऊंटरवर डोकं ठेवून चक्क झोपलो. मी झोपल्यावर सगळी बँक जागी झाली. कुणीतरी ओरडला, कामत त्यांचं काय ते पाहा. कामतनं वर पाहिलं आणि माझ्या हातातलं पासबुक मागून घेतलं.

का वागतात अशी ही माणसं ही माणसं आहेत तरी कोण परग्रहावरून आलेले पाहुणे आपल्यातल्याच कोणीतरी तिथं जाऊन बसावं आणि खुर्चीला रेलून बसल्यावर पार बदलून जावं काश्मीरं ते कन्याकुमारीपर्यंत कुठेही जा; प्रत्येक कार्यालयात, खुर्चीतली माणसं आणि खुर्चीसमोर ताकळत उभी असलेली माणसं असे माणसांचे दोन तट पडलेले दिसतील. खुर्चीच्या पलीकडली माणसं गुर्मीत तर अलीकडली माणसं गरजू आणि म्हणून केविलवाणी, असं जिथं तिथं दृश्य.

खुर्चीपलीकडल्या बथ्थड चेहऱ्याच्या माणसांची एक टोळी या देशात आहे. आणि मंत्री-संत्री नाही तर ही टोळीच या देशातल्या लोकांवर राज्य करते आहे. या वृत्तीची माणसं जोवर प्रशासन सेवेत आहेत तोवर या देशात कोणत्याही प्रकारचं परिवर्तन अशक्य आहे.

लेखाच्या सुरवातीला उल्लेखलेलं दीप्ती राणेचं पत्र लहान असलं तरी देशाच्या एका मोठया गंभीर प्रश्नाच्या

मुळाशी घेऊन जाणारं आहे. असं वाटतं पंतप्रधानांना ओरडून सांगावं, तुमचे अणुऊर्जा प्रकल्प, इन्फोटेक इन्स्टिट्यूट, आय.आय.टी. वगैरे सारं खड्ड्यांत जाऊ द्या. समोरच्या माणसांशी कसं बोलायचं, कसं वागायचं हे या खुर्चीतल्या लोकांना शिकवणाऱ्या शाळा काढा आधी. कॉम्प्युटर, फॅक्स, इंटरनेट याचं जाळं उभारून सार्वजनिक प्रशासनाला गती येईल हा भ्रम आहे आपला. खुर्चीपलीकडली ही जमात सत्तेतून आलेला आपला माज, आपली निष्क्रियता जोवर सोडत नाही तोवर देशात कोणत्याही स्वरूपाचं परिवर्तन संभवत नाही. रिक्षा-टॅक्सीवाल्यांना शिस्त लावण्यासाठी जनतेची आंदोलनं होतात; रस्त्यावर खड्डे बुजवले नाहीत म्हणून लोक रस्त्यात ठिय्या मांडून ओरडा करतात. प्रशासकीय कामकाजातले हे खड्डे बुजवायसाठी सत्याग्रह का केले जात नाहीत खुर्चीतल्या बेजबाबदार अधिकाऱ्यांना त्यांच्या टोलवाटोलवीबद्दल जाब विचारण्यासाठी मोर्चे का काढले जात नाहीत मोघम आणि अस्पष्ट उत्तरं देऊन किरकोळ कामासाठी या देशातील नागरिकांना एका टेबलापासून दुसऱ्या टेबलाकडे नाचवलं का जाते आहे

मी पोटतिडकीनं हे प्रश्न विचारतोय.... आणि माझ्या प्रश्नाची उत्तरं ज्याच्यापाशी आहेत तो माणूस ओठ आवळून पलीकडच्या खुर्चीवर आरामात रेलून बसला आहे.

लक्ष्मीकांत देशमुख

बदलत्या तरुणाईची पाच कारणे व तीन समस्या!

काही दिवसापूर्वी पुण्यामध्ये 'पुलोत्सवा'मध्ये कृतज्ञता पुरस्कार स्वीकारताना डॉ. अभय बंग म्हणाले होते, ''भारताच्या भवितव्याबद्दल आशावादी आहे. कारण आज आपला देश खऱ्या अर्थाने 'तरुण भारत' आहे. आजचं भारताचं वय सरासरी सव्वीस वर्षे आहे. पुढील पंचवीस-तीस वर्षे त्याचा आपल्याला फायदा-डीव्हीडंड मिळेल!''

त्यांनी पुढे त्यांच्या भाषणात असंही विधान केलं की, 'भारतात आज तीन क्रांत्या होताना दिसतात. एक म्हणजे संगणक-मोबाईल क्रांती. त्यामुळे आम आदमी 'एनपॉवर' झाला आहे. दुसरी म्हणजे भ्रष्टाचारा विरोधातली अण्णा हजारे प्रणित सामान्य माणसांची लढाई. तिला मी 'नॅनो क्रांती' म्हणेन. आणि तिसरी म्हणजे युवा क्रांती.''

तरुणाईच्या संदर्भात डॉ.अभय बंग यांच्या विधानांचा काही दिवसापासून विचार करीत आहे. खरंच का तरुणांची संख्या भारतात जास्त असल्यामुळे आपण भारताच्या भवितव्याबद्दल आशावादी राहावं अशी स्थिती आहे का तथाकथित संगणक-मोबाईल क्रांती व आम आदमीची भ्रष्टाचार विरोधातली व एकूण व्यवस्था परिवर्तनाची नॅनो क्रांतीमध्ये बदल घडवून आणण्याची क्षमता आहे मुख्य म्हणजे आजची तरुणाई-आजचा तरुण वर्ग या साऱ्यांचा गांभीर्याने विचार करीत आहे का तो बदलासाठी सजग आहे का मागील वीस वर्षात भारत प्रचंड वेगानं बदलला आहे. त्यातही तरुण वर्गाच्या बदलाची प्रक्रीया अधिक जलद व विस्मयकारक आहे. त्यासाठी पांच कारणं माझ्या मते आहेत.

एक म्हणजे १९९१ पासून सुरू झालेली जागतिकीकरणाची व आर्थिक सुधारणेची प्रक्रिया. त्यामुळे वाढलेली उद्यमशीलता. एक फार मोठा संधी मिळालेला शहरी तरुणाचा वर्ग आज उच्चभ्रू झाला आहे. त्याच्या हाती पैसा खेळतो आहे त्यामुळे मॉल्स, मल्टीप्लेक्सेस व हॉटेलस्मध्ये गर्दी दिसते. त्यांची क्रयशक्ती चांगल्या प्रमाणात वाढली आहे.

दुसरं कारण म्हणजे संगणकापाठोपाठ झालेली मोबाईल क्रांती. आज भारतात टॉयलेटपेक्षा जास्त मोबाईल्स आहेत. त्यामुळे माहितीची देवाणघेवाण सुलभ झाली आहे. प्रत्येकाला-तरुणासह माहितीच्या आधारे निर्णय व निवड करणे सुलभ झाले आहे. मोबाईल व संगणक हा आजच्या काळातला महात्मा गांधी प्रणित आधुनिक चरखा झाला आहे, हे डॉ. अभय बंग यांचे निरीक्षण मार्मिक आहे. चरखा हे स्वातंत्र्यपूर्व काळात आर्थिक स्वावलंबनाचं प्रतीक होतं. तर संगणक-मोबाईल हे आजच्या काळातलं स्व-विकासाचं प्रतीक झालं आहे. केवळ प्रतीक नाही तर धारदार हत्यार. त्यामुळे तरुण शेतकरी उत्तम शेती व मार्केटिंग करू शकतो, युवा उद्योजक उत्पादन करु शकतो. एका अर्थानं हा अल्लाउद्दिनचा जादुई दिवा आहे, तो तरुणास विचारतो आहे, 'हुकुम मेरे आका.' त्याला कोणता व कसला हुकुम द्यायचा- माहिती विचारायची जी जीवनउपयोगी ठरेल हा तरुणाईपुढचा सवाल आहे. त्याचा स्व-विकासासाठी उपयोग करणाऱ्या तरुणात वाढ होताना दिसते आहे ही समाधानाची बाब आहे.

मागील वीस वर्षात तरुणाई झपाट्याने बदलली त्याचं तिसरं कारण आहे केबल इलेक्ट्रॉनिक क्रांती. चोवीस तास चालणारे न्यूज व मनोरंजनाचे चॅनेल. त्यामुळे जग जवळ आले आहे, एका अर्थाने ते वैश्विक खेडे झाले आहे. त्यामुळे तरुण पिढी स्मार्ट, चौकस झाली आहे. मोठी संपन्नतेची व वैभवाची स्वप्ने ती पाहायला शिकली आहे. पण या क्रांतीनं तरुणाई अमेरिकनाईज्ड झाली आहे. त्यांची भोगवादी जीवनशैलीचं. तिला अपार आकर्षण निर्माण झालं आहे. यात फायदे जरूर आहेत. कारण त्यामुळे संपत्ती निर्माण होते आहे, पण तोटे त्याहून जास्त. वाढती विषमता व पर्यावरणाचा ऱ्हास हे दोन गंभीर प्रश्न त्यातून निर्माण झाले आहेत. पुरेसे काम व शिक्षण नसलेला तरुणांचा एक फार मोठा वर्ग दिशाहीन स्वप्नरंजनात जगतो आहे. त्याचं त्यानंतरचं वैफल्य समाजाला त्याचा स्फोट झाला तर परवडणारं नाही.

तरुणाईच्या बदलाचं चवथं कारण म्हणजे मंडल कमिशनचा परिणाम. वीस वर्षानंतर त्यातलं सकारात्मक जाणवणारं दृश्य म्हणजे ओ. बी. सी. तरुणांची झपाट्यानं होणारी प्रगती. राजकीय क्षेत्रात या वर्गाचा वाढलेला प्रभाव, तो जर सामाजिक व आर्थिक प्रगतीत परावर्तीत झाला तर भारताची प्रगती झपाट्यानं होईल. पण आज तरी तसं होताना दिसत नाही. उलटपक्षी जाती-जातीमधील

> **तर संगणक-मोबाईल हे आजच्या काळातलं स्व-विकासाचं प्रतीक झालं आहे. केवळ प्रतीक नाही तर धारदार हत्यार. त्यामुळे तरुण शेतकरी उत्तम शेती व मार्केटिंग करू शकतो, युवा उद्योजक उत्पादन करु शकतो. एका अर्थानं हा अल्लाउद्दिनचा जादुई दिवा आहे, तो तरुणास विचारतो आहे, 'हुकुम मेरे आका.' त्याला कोणता व कसला हुकुम द्यायचा- माहिती विचारायची जी जीवनउपयोगी ठरेल हा तरुणाईपुढचा सवाल आहे. त्याचा स्व-विकासासाठी उपयोग करणाऱ्या तरुणात वाढ होताना दिसते आहे ही समाधानाची बाब आहे.**

दरी वाढली आहे. त्यातून अनेक प्रश्न निर्माण होताना दिसत आहेत. पण त्यांची उत्तरं दृष्टिक्षेपात नाहीत.

बदलत्या तरुणाईचं पाचवं कारण हे बाबरी मशिदीच्या विध्वंसानंतर उफाळलेल्या व आजही न शमलेल्या धार्मिक उन्मादामध्ये आहे. आजची तरुणाई कांही प्रमाणात त्याला बळी पडताना दिसते. पुन्हा ग्रामपंचायत, सोसायटीपासून लोकसभेपर्यंत दर चार दोन महिन्याला कुठल्या ना कुठल्या होणाऱ्या निवडणुकीमुळे ग्रामीण व निमशहरी तरुण जाती-धर्माच्या टोकदार होत जाणाऱ्या भ्रामक अस्मितेला बळी पडतोय. त्याचीही वाढत जाणारी संकुचितता एक चिंतेची बाब आहे.

या पाच प्रमुख कारणामुळे मार्गात वीस वर्षात भारताची तरुणाई बदलली आहे, हे निर्विवाद सत्य आहे.

सर्व बाबींचा साकल्याने विचार करता डॉ. अभय बंग प्रमाणे तरुण भारतमुळे उद्याचा उज्वल भारत घडेल असं ठामपणे सांगणं कठीण आहे. ते शक्य नाही असं नाही, पण त्यामागे देशाच्या राजकारणानं व खुद्द तरुणाईनं कांही समस्या निर्माण करून ठेवल्या आहेत.

पहिली समस्या आहे निकृष्ट शिक्षणाची. प्राथमिक शिक्षणामध्ये नक्कीच लक्षणीय प्रगती 'सर्व शिक्षणअभियाना'त झाली आहे. पण माध्यमिक शिक्षणामध्ये प्रगती असमाधानकारक आहे आणि काही ब्रँड बनलेल्या शिक्षण संस्था वगळल्या तर उच्च शिक्षणाची अत्यंत दयनीय स्थिती आहे. पदवीप्राप्त तरुणामुळे ना भाषेचे उत्तम ज्ञान असते (इंग्रजी सोडा, मराठी पण नीट लिहीता येत नाही.) ना विज्ञानाची-अर्थशास्त्र-व्यवस्थापनाची कौशल्ये असतात. अगदी एम टेक झालेले व उच्च दर्जाचे अभियंते पण खऱ्या अर्थाने 'अभियंते'(एंप्ल्योएबल) नसतात. कुशल मनुष्यबळाचा अभाव ही भारताची फार मोठी समस्या आहे. त्यासाठी उत्तम शाळा-कॉलेजेस व त्यातून उत्तम शिक्षण मिळण्याची कमतरता भारतावर प्रेम करणाऱ्या कुणाही सुबुद्ध नागरिकाची झोप उडवणारी व चिंताग्रस्त करणारी आहे.

याला जसं शिक्षणाचा व्यापार करणाऱ्या शिक्षण संस्था व तथाकथीत शिक्षणसम्राट कारणीभूत आहेत, तद्वतच आजचा तरुणही आहे. त्याला ज्ञानाची भूक नाही, त्यासाठी कठोर परिश्रम करण्याची तयारी नाही. चाकोरीबाहेरचे अभ्यासक्रम निवडण्याची व त्यात पूर्ण पारंगत होण्याची आस नाही. हे मी सर्वसाधारण स्वीपींग स्टेटमेंट करीत नाही. आजही दहा-वीस टक्के तरुण ज्ञानाचे भुकेले आहेत व त्यामुळेच आजची भारताची प्रगती आपण पहात आहोत, पण उर्वरित साठ ते ऐंशी टक्के तरुणांचं काय त्यांना उत्तम जीवन जगण्यासाठी ज्ञानाची लालसा नाही हे मोठं दुर्दैवी चित्र पहायला मिळतं. आज संगणक-मोबाईल क्रांतीमुळे माहिती जरुर मिळते, पण त्याचं ज्ञानात रूपांतर करण्याचं शिक्षण त्यांना मिळालं तर ज्ञान क्षेत्रात क्रांती घडेल. पण हे कोण करणारं राज्यकर्ते दरवर्षी नवे नवे शैक्षणिक प्रयोग करताना दिसतात, पण त्याचा सकारात्मक परिणाम जाणवत नाही. मुख्य म्हणजे ज्ञानाचं बाजारीपण रोखण्यासाठी तरुणांनीच पुढे आलं पाहिजे. कारण तेच खऱ्या अर्थानं सर्वात मोठे 'स्टेक होल्डर' आहेत.

दुसरी समस्या आहे वाढत्या विषमतेची. विषमता जशी आर्थिक आहे, तशीच ती सामाजिक आहे. तिचं एकच उदाहरण द्यायचं झालं तर स्त्री-पुरुष विषमता होय. अठराव्या शतकापासून आपल्या समाजसुधारकांनी स्त्री शिक्षण व स्त्री-पुरुष समतेचा वसा उचलून प्रचंड डोंगराएवढं काम केलं. आज सावित्रीच्या लेकी सर्व क्षेत्रात झेप घेण्यासाठी सज्ज आहेत. त्यांच्यात बुद्धिमत्ता आहे, परिश्रमाची तयारी आहे. पण आजच्या तरुणीच्या प्रगतीआड आजचा तरुण येताना दिसतोय. माझं निरीक्षण व अभ्यासाअंती असं मत झालं आहे की, मागील शंभर वर्षात स्त्री बदलली, आधुनिक झाली. पण पुरुषी मानसिकता बदलली नाही. ती आजही पुरुष वर्चस्वता मानते, स्त्रीला दुय्यम लेखते. तिला तिचा 'स्पेस' देत नाही, पुरेसे स्वातंत्र्य देत नाही. पुन्हा केबल-दूरचित्रवाणी क्रांतीमुळे व्यापारी उत्पादने खपविण्यासाठी जाहिरातीधून स्त्रीला भोगवस्तू व विक्रयक्षम वस्तू म्हणून प्रस्तुत केलं जातंय ते उबग आणणारं आहे. पण कळत-नकळत त्याला आजची तरुणीपण बळी पडतेय. तिलाही फॅशन शो, ॲडल्ट थीमचे सिनेमे-शोज आणि 'झिरो फिगर/बॉडी' मिरविण्यात अभिमान वाटतो. त्यासाठी तथाकथीत समतेचा दाखला ती व मतलबी पुरुष देतात. त्यामुळे स्त्री ही उपभोगाची वस्तू आहे असं तरुण मनावर बिंबलं जात आहे, त्यातून तिच्यावरील वाढते लैंगिक अत्याचार होताना दिसतात. आजचा तरुण त्याबाबत कितपत सजग आहे लाखमोलाचा हा सवाल आहे. त्याचं उत्तर मला माहीत नाही. पण ते भीषण आहे हे नक्की.

तिसरी समस्या माझ्या मते तरुणाईच्या सामाजिक असंवेदनशीलतेची. माझी पिढी ही 'युक्रांद'च्या चळवळीनं भारावलेली होती. सत्तर-ऐंशीच्या दशकात दलित पँथर पण जोरात होती. स्त्रीवादी चळवळीही पूर्ण जोशात होत्या. त्यावेळी मोठया प्रमाणात

> **मागील शंभर वर्षात स्त्री बदलली, आधुनिक झाली. पण पुरुषी मानसिकता बदलली नाही. ती आजही पुरुष वर्चस्वता मानते, स्त्रीला दुय्यम लेखते. तिला तिचा 'स्पेस' देत नाही, पुरेसे स्वातंत्र्य देत नाही. पुन्हा केबल-दूरचित्रवाणी क्रांतीमुळे व्यापारी उत्पादने खपविण्यासाठी जाहिरातीधून स्त्रीला भोगवस्तू व विक्रयक्षम वस्तू म्हणून प्रस्तुत केलं जातंय ते उबग आणणारं आहे. पण कळत-नकळत त्याला आजची तरुणीपण बळी पडतेय. तिलाही फॅशन शो, ॲडल्ट थीमचे सिनेमे-शोज आणि 'झिरो फिगर/बॉडी' मिरविण्यात अभिमान वाटतो.**

तरुण वर्ग या साऱ्या चळवळीत हिरीरीने भाग घेताना दिसायचा. आजचं चित्र काय आहे एकदम विपरीत. सुशिक्षित तरुण वर्ग नोकरी-उद्योग व उपभोगात एवढा रममाण झाला आहे की, तो सामाजिक भानाला पारखा झाला आहे. गेल्या वीस वर्षातलं हे चित्र आहे. अपवाद म्हणावा आशेचा किरण म्हणा २०१२ मध्ये तो अण्ण हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी आंदोलनात नेटीझन म्हणून का होईना सामील होतोय, हे सुचिन्ह आहे. पण एकूण विचार करता आशेला फारसा वाव नाही.

आजच्या तरुणाईच्या सामाजिक संवेदनशून्यतेचं काय कारण आहे मूल्य शिक्षण व वाचन संस्कृतीचा अभाव. राष्ट्रप्रेम, समाजऋण, दलित-वंचिताबद्दल सहानुभूती हे शब्द तरुणाच्या बोलण्यातून व मनातूनही पार नाहिसे झालेले दिसतात. मल्टीप्लेक्समध्ये चकचकीत स्त्रीचं दुय्यमत्व अधोरेखित करणारा 'कॉकटेल' सिनेमा पाहताना मला जाणवलं की, सिनेम ापूर्वी राष्ट्रगीताच्या वेळी त्या त्रेपन्न सेकंदातही तरुण वर्गाचे मोबाईल वाजत होते (जे सिनेमाच्या वेळी सायलेंट मोडवर असतात) आणि राष्ट्रगीताचा शेवटचा 'जय हो' संपण्यापूर्वी धपकन खुर्चीत तरुण वर्गास बसताना मी टीपलं होतं. हे एक छोटं प्रातिनिधिक उदाहरण. ज्या तरुणाईसाठी अमेरिका स्वर्ग वाटतो, तो भारत नामक त्याच्या देशाबाबत किती सजग व प्रेमी आहे हा प्रश्न स्वतःच्या मनाला विचारावा व स्वतःच उत्तर शोधावं. पण असा प्रश्न तरुणाईला पडतो का त्याचं प्रमाण लक्षणीय आहे की नगण्य तरुणाईनं याचा विचार केला पाहिजे.

विरुद्धरुपी दृश्य म्हणजे वाढती अंधश्रध्दा, बुवाबाजी आणि धार्मिकता. लालबागचा राजा, सिद्धिविनायक व शिर्डीमध्ये तरुणांची रांग दिवसेंदिवस वाटत आहे. बुवा-गुरुंचा सुळसुळाट झाला आहे व त्यांना तरुणाईचा उदंड प्रतिसाद आहे. हे कशाचं लक्षण आहे वैफल्याचं जीवघेण्या स्पर्धेचं की असुरक्षिततेचं मग या समस्या असल्या तरी वादळ पेलणार कोण तरुणाई की वृद्ध- मोठी माणसं तरुणपणीच म्हातारी मानसिकता तरुणाईला कुठे घेऊन जाणार आहे

तरीही शंभर टक्के अंधार नाही. पेला पुरता रिकामा नाही. हा आशावाद आहे, सकारात्मकता आहे. त्यालाही कारण तरुणाईचा पाच-दहा टक्के वर्ग. तो विविध क्षेत्रे आत्मविश्वासानं पादाक्रांत करताना दिसतो आहे. हा वर्ग जेव्हा बहुसंख्य -किमान पन्नास टक्के होईल तेव्हा 'तरुण भारत' (वयाच्या दृष्टीने आज असलेला) खराखुरा 'तरुण भारत' (कर्तृत्ववान) होईल. तो सुदिन किती जवळ असेल हे तरुणाईवर अवलंबून आहे. कारण (प्रदीपच्या शब्दात सांगायचं झालं तर) 'तुमही हो भविष्य मेरे भारत विशालके.'

पत्ता; बी/२, श्रीनिवास गार्डन,सुमित्रा सदन समोर,
केदारनाथ मंदिराजवळ, मॉडेल कॉलनी,शिवाजीनगर
,पुणे-४११०१६
संपर्क : laxmikant05@yahoo.co.in
०९३२५२९७५०९

आधुनिक भिंतीवरील गप्पा !

फेसबुकची वॉल, नव्या जमान्याच्या या भिंतीवर अनेक गोष्टी सुरु असतात..प्रत्येक मित्राची वेगळी गोष्ट ..अशा घटनांचा , स्टेटसचा महापुरच असतो आणि त्याचा मारा आपल्यावर होत असतो . पण या धबडग्यात काही हिरे मोती सापडत जातात . काही लेखक आपल्या स्टेटस मधुनही इतके काही चांगले बोलुन जातात की म्हणावे वाटते .. 'वाह !!!! ' असेच काही हिरे मोती वाचंकासाठी . ज्येष्ठ लेखक चं. प्र. देशपांडे यांच्या फेसबुक लिखाणाची हि दिवाळी भेट .

–चं. प्र. देशपांडे

मानवी संबंध हे प्रत्यक्ष दर्शन, अंदाज, कल्पना, तर्क, बुद्धी या मनाच्या आकलन मर्यादेत घडतात, फुलतात, बिघडतात वा बरबाद होतात. उदाहरणासाठी आपण जोडीदार, प्रियकर, प्रेयसी या संबंधाबाबत बोलू. आता संबंधित व्यक्ती चोवीस तास तुमच्या समोर असू शकत नाही. स्थलकालात ती अनेकदा लांब असते. मनाला असणाऱ्या स्थलकालाच्या मर्यादांमुळे त्याला सगळीकडचे सत्य तर दिसू शकत नाही. त्यामुळे संबंध एक तर अंधसंशययुक्त वा अंधविश्वासयुक्त होतो. अंधसंशययुक्त संबंधात प्रचंड हाल आणि छळ अंतर्भूत असतात. म्हणून, त्यापेक्षा, अंधविश्वासयुक्त संबंध बरा, असे म्हणावे काय की आधुनिक जीवनशैलीत विश्वास, प्रतारणा, निष्ठा यांना स्थानच राहिलेले नाही, असे म्हणावे संशयग्रस्त व्यक्तीला मानसिक रोगी समजून तीवर उपचार करायची सोय आहे, पण या रोगाला बळी पडणे मनाला अनेकदा भागच पडते, याकडे लक्ष द्यायला आपण का तयार नसतो की मनाला उपलब्ध असणाऱ्या साधनांवर संबंध आधारित असणे, हेच निरर्थक समजावे असे, यातून समोर येणारे प्रश्न पाहायला आपण नकार का देतो त्यापेक्षा विध्वंस होणे / करणे हे आपल्याला अधिक सोयीस्कर का वाटते एकमेकांचा छळ न करता जगण्याची काही पद्धत असूच शकत नाही का असे काही ना काही गृहीत धरून अंध जगणे, याला माणसाचे भागधेय म्हणावे का म्हणजे, बरोबर, नैतिक, श्रेयस असे शब्द टाकून देणेच शहाणपणाचे होईल का मग जगण्यातली 'सर्जकता' म्हणजे काय

"

प्रयत्नाने नव्हे तर सैल, मोकळे स्वतंत्र सोडल्याने मन शांत होते.

"

आपल्या बाजूचे आणि आपल्या विरुद्ध, आपल्याला आवडणारे आणि न आवडणारे, सरळ वाटणारे आणि डावपेचात्मक वाटणारे अशा तपशीलांचा विचार करत जाणे म्हणजे गर्तेत कोसळत जाणे ! बरेच तपशील काल्पनिकही असू शकतात ! तपशीलांना बळी न पडणे हिताचे !

"

मुळात आपल्याकडून आपल्यालाच न पटणाऱ्या कृती घडू शकतात, याला स्वतःशी झालेली बेइमानी म्हणणे भाग आहे आणि त्याची शिक्षा म्हणून मानसिक खरचटत राहणेही भाग आहे !

"

अतिरेकी दुःखाप्रमाणेच अतिरेकी सुखही भीती वाढवणे आणि शरीर-मनाचा नाश करणे हे दोन्ही एकत्रितपणे करते.

"

समाजमान्य नैतिक, कायदेपाळू, सभ्य, निरुपद्रवी असे जगायला कोणतेच मन तयार नसते- त्याला दडपून त्या साच्यात बसवावे लागते- पण त्या साच्यात मन न बसवणाऱ्याला सगळेच हलकट, नीच म्हणतात !

"

रस्त्यावरचा गुंड, राजकीय पुढारी, धर्माभिमानी, विचारसरणीनिष्ठ आणि अभ्यासू बुद्धिवादी या सगळ्यांचे पायाभूत सांगणे एकच असते माझ्याविरुद्ध बोलायचे नाही! आणि हे सगळेच आपापल्या टोळ्या करून राहतात.

"

मृत्यूची भीती म्हणजे आहे ते नाहीसे होण्याची भीती. तो येईपर्यंत आहे ते नाहीसे होण्याचा प्रश्न नाही आणि तो आल्यावर ते नाहीसे झालेले कळायचा प्रश्न नाही ! सारांश, आहे ते कधीच नाहीसे होत नाही !

“

माणसाच्या समूहजीवनातले आणि सगळ्याच संबंधांतले, विषमता, अपमान, छळ असे आजार आणि त्याच्या शरीराचेही % आजार हे त्याच्या मन वापरण्याच्या सध्याच्या सर्वमान्य पद्धतीतून उगम पावतात, हे स्पष्टच आहे. हे हजारो वर्षे चाललेले असूनही, मन वापरण्याची अशी विध्वंसक नसलेली अशी काही पद्धत असू शकेल का, हा प्रश्नही विचारायला माणूस तयार होत नाही !

“

भूमिका ही विचारपूर्वक, कष्टपूर्वक घडवलेली, स्वीकारलेली मानसिक अवस्था -- एक पवित्रा, पोझ -- असते. हा एक ताण असतो. ताण दुःखमय असतो, हे सांगायला मानसशास्त्रज्ञाची गरज नाही. या अर्थाने, सगळे भूमिकावाले दुःखाचे पुरस्कर्ते आणि दुःखी असतात. ते स्वतःच्या किंवा कुणाच्याही आयुष्यात शांततेचा -- आनंदाचा क्षण आणू शकत नाहीत.

मी इतरांचे मुखवटे फाडायला निघालो आहे -- हा माझाही एक मुखवटाच असतो की नसतो

माणसे नसतातच, त्यांच्या प्रतिमा फक्त असतात.

आपल्या डोक्यात आलेले प्रेम, राग, लोभ, तिरस्कार, उत्सुकता, समाधान -- एवढेच जगणे

“

आपली बाजू शाबीत करण्याचा वा बदला घेण्याचा विचार चालू असेपर्यंत झालेल्या अपमानाच्या दुःखातून बाहेर पडता येत नाही, दोन्हींतून एकदमच बाहेर पडावे लागते.

“

कलेत काहीही त्याज्य वा वर्ज्य नाही, असे म्हणणाऱ्यांनीच ' आनंद ' हा शब्दही जणू जगण्यातूनच हद्दपार करावा, याला काय म्हणावे

“

कलेची प्रमुख कृती ही जगण्यात श्रेयस जागवणे, ही असते -- असे म्हटले तरी आपल्या चर्चेसाठी, ' म्हणजे काय ', हा प्रश्न उरतोच !

“

बाकीचे जाऊ द्या, स्वतःचेच सगळेच चुकतेय असे वाटणे, पश्चात्तापाच्या वेळा निघून जाणे, अजूनही ' सुधारता ' न येणे, पद्धत न राहणे, सर्वमान्य वागणे नसणे, तरीही, अस्वस्थतेत जगत राहणे --

“

अत्यंत टोकाची अकल्पित घटना ! पण घडू शकते ! अशी घटना घडायला लाखो घटक कारणीभूत असतील -- त्यांत आपणही असू शकतो ! कोणतेच प्रश्न गंभीर आणि महत्त्वाचे न वाटता जगत राहणे, याचाच हा परिपाक असू शकतो ! हलगर्जीपणा, आळस आणि हेतूपूर्णता !

“

आपले वागणे ठरण्यासाठी मनाशिवाय दुसरा स्रोत नाही, असे असल्यावर, खरे, खोटे, प्रामाणिक, अप्रामाणिक, निष्ठावान, व्यभिचारी, सांस्कृतिक, असांस्कृतिक, सभ्य, असभ्य -- हे सगळे गुण-अवगुण जगण्यात असणार -- या ना त्या नात्यात -- या ना त्या क्षेत्रात. या गोंधळातून मार्ग काढत, आपल्या अपेक्षेप्रमाणे आपले जगणे घडवण्याचा प्रयत्न करणेही त्यातच आले. एका व्यक्तीला जे बरोबर वाटते तेच तसेच बरोबर वाटणारी दुसरी व्यक्ती असू शकत नाही. शक्य तो यातून सावरत चालणे, हे सर्वांनाच करावे लागते. एकाला वा अनेकांना मान्य असलेली कोणतीच पद्धत एकाच्या वा कुणाच्याही जगण्यात असू शकत नाही. मन द्वंद्वात्मकच असणार -- त्यासहच जगावे लागणार. एक सर्वमान्य पद्धत अशक्य.

'आधी बसू, मग बोलू 'व्यावसायिक रंगभूमीवर सध्या गाजणारे नाटक, विद्यासागर अध्यापक यांनी लिहिलेले. हे नाटक बेतलेले आहे ते त्यांच्याच 'मॅन + वुमन+ नेबर्स' या एकांकिकेवर. काही वर्षांपूर्वी विविध एकांकिका स्पर्धेतून ही एकांकिका बरीच गाजली होती. तिने असंख्य बक्षिसे मिळवली. मात्र ती कुठेही प्रकाशित झाली नव्हती . हीच एकांकिका 'नमस्कार'च्या वाचकांना खास दिवाळी भेट म्हणून ...

मॅन + वुमन + नेबर्स.....

(पडदा उघडतो तेव्हा रंगमंचावर दोन्ही बाजूला दोन वेगवेगळ्या घरांचे दृश्य दिसते. प्रेक्षकांच्या डाव्या बाजूला मिस्टर पाटील यांचे तर उजव्या बाजूला मिस्टर काळे यांचे घर. मिस्टर रमेश पाटील आपल्या घरात झोपलेले. त्यांची बायको स्मिता बाल्कनीतल्या झाडाला पाणी घालत आहे. पलीकडे मि. काळे ज्यांचे नाव अजय त्यांच्या बाल्कनीत सूर्यनमस्कार घालत आहेत. त्यांची बायको अनघा बेडवर झोपली आहे.)

स्मिता : (रमेशच्या डोक्यावरून पांघरुण काढत) अहो बघा...बघा शेजारचे काळे काय करतायत....

रमेश : (नाईलाजाने) काय

स्मिता : बघा तरी...

रमेशः काय करताय काय (चिडून)

स्मिताः (त्रासिक स्वरात) तुम्हीच ऊठा आणि बघा. (रमेश ताडकन उठतो आणि बाल्कनीत येतो. पाठोपाठ स्मिता.)

रमेश : (काहीच न पाहिल्याप्रमाणे) कुठं काय करतायत

स्मिताः बघा..बघा ते सूर्यनमस्कार घालतायत. नाहीतर तुम्ही.

रमेश : (प्रचंड चिडून) ते सूर्यनमस्कार घालतायत हे दाखवायला तू माझी झोपमोड केलीस

स्मिता : (चिडून) हो...मग काय दाखवू

रमेशः मला वाटलं, काळे स्वतःच्या बायकोला कंटाळून अंगावरचे सगळे कपडे काढून बाल्कनीत उभे आहेत. (वैतागून पुन्हा येऊन झोपू लागतो. स्मिता पाठोपाठ येते.)

स्मिताः आता पुन्हा झोपू नका.

रमेशः अगंबाई..मला थोडा वेळ तरी झोपू दे.

स्मिताः नाही. उठा. रात्री उशिरापर्यंत पित राहायचं आणि सकाळी उशिरापर्यंत लोळत पडायचं. हे नाही चालणार मला...

रमेशः मग तू लोळत पड.

स्मिताः मी आता झोपणार नाही आणि तुम्हालाही झोपू देणार नाही.

रमेशः पण का

स्मिताः ते शेजारचे काळे झोपलेत का

रमेश : (पुन्हा अंथरुणातून उठत) अगं ते काळे गेले तेल लावत.

(काळेंचे सूर्यनमस्कार घालून होतात. ते जवळ असलेली तेलाची बाटली उचलतात. अंगाला लावत आत निघून जातात.)

स्मिताःहो.. चांगल्या माणसांची उदाहरणं तुम्हाला दिली की तुम्हाला त्रास होणारच.

रमेश : हे बघ, तू मला सारखं त्या काळेंचं उदाहरणं देणं बंद कर.

स्मिताः का दुसऱ्या लोकांच्या चांगल्या गोष्टी आपण घ्यायला काय हरकत आहे

रमेश : नाही. मी स्वतः एक अतिशय हुशार माणूस आहे. मला सकाळी स्वतःच्याच पाया पडायला आवडतं. इतकं मी मानतो मला समजलं (केविलवाण्या स्वरात) आणि सकाळी सकाळी तरी या गोष्टीवर वाद नको.

स्मिताः तुम्हाला स्वतःची प्रगती व्हावी असं नाही वाटत

रमेशः वाटतं. खूप वाटतं पण सकाळी सकाळी नाही.

स्मिताः तुम्ही स्वतःत बदल करायला हवा.

रमेशः नाही. चहा आण.

स्मिताः नाही आणणार. (रडायला लागते.)

रमेशः(आवाज चढवून) अगं माझे आई सकाळी सकाळी नको हे अश्रू. चहा आण. (स्मितानाईलाजाने आत जाते.) च्यायला ह्या काळ्याच्या ... (रमेश पुन्हा झोपतो. अजय काळे चहा घेऊन येतो आणि अनघाला उठवू लागतो.)

अजयः अनघा उठ. चहा घे. मला उशीर होतोय. आज शाळेत लवकर जायचंय.

अनघाः रविवारीसुद्धा शाळा
अजयः हो. अग आज पालकांची सभा ठेवलीय.
अनघाः मी आज ठरवलं होतं की शॉपिंगला जायचं.
अजयः आज नको. उद्या जाऊया.
अनघाः इतका काय सारखं काम काम आणि काम तुझं माझ्याकडे लक्षच नाहीये.
अजयः माझं तुझ्याकडे पूर्ण लक्ष आहे.
अनघाः मला खूप एकटं एकटं वाटतं घरात.
अजयः तुला कितीतरीवेळा सांगितलं की मुलांना इकडे आणूया. आपण इथं आणि मुलं शिकायला महाबळेश्वरला हे मला पटतं नाही.
अनघाः हे बघ तो विषय पुन्हा नको. ती दोघं तिथं आहेत तिथंच ठीक आहेत.
अजयः अगं पण मी एक हाडाचा शिक्षक आहे आणि त्या दोघांनी स्वतःचे वडील शिक्षक असताना दुसऱ्यांकडून शिक्षण घ्यायचं हे काही मला पटलेलं नाही.
अनघाः तू किती वर्षे हाच विषय उगाळणार आहेस मुलं आता प्राथमिक शाळेतून माध्यमिक शाळेत गेली. मीसुद्धा तिथेच शिकलेय.
अजयः ठीक आहे. मला काही म्हणायचं नाहीये.(उठून जायला निघतो. ती त्याचा हात धरते.)
अनघाः ए...लगेच डिस्टर्ब झालास
अजयः नाही गं. बोल. (पुन्हा बसतो.)
अनघाः तू माझ्याशी काही बोलतच नाहीस. आपल्यात काही अटॅचमेंटच नाही असं मला म्हणायचं होतं.
अजयः अगं अटॅचमेंट नाही कशी आहे ना.
अनघा :मला ही खूप....खूप लोनली वाटतं.
अजयः म्हणजे
अनघा : म्हणजे एकटं. कोरडं
अजय : (मोठ्यांदा हसत) अगं प्रत्येक माणूस जन्मतःच एकटा असतो. बरं मला उशीर होतोय..
(जाऊ लागतो. त्याच वेळी स्मिता चहा घेऊन येते. काळेंच्या घराकडे पहात राहते.)
अनघा : तसं नव्हे. काल मी टीव्हीवर माहेरची साडी पहात होते.
अजयः (नाईलाजाने) मग
अनघाः नाही मला तो पिक्चर पहाताना रडूच आलं नाही.
अजयः बरोबर आहे. तो हास्यास्पदच पिक्चर आहे.
अनघा :नाही. तो पिक्चर खूप इमोशनल आहे. पण मलाच रडू आलं नाही. शेजारच्या घाटपांडेकाकू फार रडल्या म्हणत होत्या. मला काय झालंय तेच कळंत नाही. (अजय तिला जवळ घेतो.)
स्मिता : अहो, ते बघा.
रमेश : काय पुन्हा सूर्यनमस्कार
स्मिता : नाही हो. बघा तरी. (स्मिता रमेशला ओढतच बाल्कनीत नेते. अजय अनघाला जवळ घेतो. तिचे चुंबन घेणार एवढ्यात त्याचा मोबाईल वाजतो. तो घेतो. स्मिता आणि रमेश हा सीन पहात उभे आहेत.)
अजयः हो..मी निघालोच आहे सर. पाच मिनिटांत पोहोचतो. (स्मिता अतिशय तल्लीन होऊन तर रमेश संतापाने हे दृश्य पहात आहे. अजय तिला चुंबन न देताच जातो. अनघा नाईलाजाने उठून आवरायला आत निघून जाते.)
रमेशः हे फार झालं (आत येत) आता या काळ्यांनी मला माझ्या बेडरुममध्ये काय करायचं हे शिकवायचं म्हणजे फारच. ए काळे तुझ्या।।।...
स्मिता : अहो...ओरडू नका.
रमेशः अगं ओरडू नको मग काय करू अं लक्षात घे मला या सगळया गोष्टीचा फार त्रास होतोय. या काळ्यामुळे माझं जगणं नष्ट होत चाललंय. आता मी आत्महत्या किंवा तुझा खून किंवा काळेचा खून करीन.
स्मिताः (रडायला लागते.) तुझं हे नेहमीच असतं. स्वतःला काही करता येत नाही म्हटल्यावर जोरात संतापायचं.
रमेश : काय जमत नाही अं काय जमत नाही मी काय आता या काळ्यासारखा रोमान्स करायचा शक्य नाही. आणि त्या काळ्यालासुद्धा समजायला पाहिजे गधड्याला. आपण चाळीतून अपार्टमेंटमध्ये रहायला आलोय. आपण एक सभ्य गृहस्थ आहोत आपण एक घर घेतलंय. त्या घराला नको इतक्या खिडक्या आहेत.आजुबाजूला लोक असतात ते काहीही पाहू शकतात. त्यांना चांगल वाईट काय याची सारासार बुद्धी असू शकत नाही. अशामुळे त्यांचं मनस्वास्थ बिघडण्याचा धोका असतो. आपल्याला मुलं

झाली नाहीत हे केवढं चांगलं आहे. हे असलं काही बघून ती पार कामातनं गेली असती.

स्मिताः (हळवी होत) पुन्हा तो विषय काढलास.

रमेशः (अचानक शांत होतो.) सॉरी..... मला तुला दुखवायचा उद्देश नव्हता. माझ्या तोंडातून निघून गेलं ते. (स्मिता रडत रहाते. तो तिला जवळ घेतो.) मी म्हटलं ना, सॉरी.

स्मिताः दरवेळी तुझा दुखवायचा उद्देश नसतो. पण मन दुखावलं जातंच नां

रमेशः अगं पण मी ते भावनेच्या भरात तसे म्हणालो.

स्मिताः पण भावनेच्या भरात तरी का

रमेश :(थोडासा चिडत) अगं पण रागापोटी बोलल्या गेलेल्या गोष्टीचं कसं जस्टीफिकेशन देणार

स्मिताः तसं नाहीये ते. आपल्याला मुलं न झाल्यामुळं तुझ्या पुरुषी अहंकाराला फार मोठा धक्का बसलाय. त्यामुळे तुच्या तोंडून चुकून येतंय ते. इथं ते शेजारचे काळे असते तर सावरलं असतं त्यांनी स्वतःच्या बायकोला.

रमेशः (भयंकर चिडत) पुन्हा काळे (तिच्यावर हात उगारत) आता गप्प बस. पुन्हा काळे नको.

(भयंकर अस्वस्थ.) आयला या काळेचा चुकून एखाद्या दिवशी माझ्या हातून खून होईल.

(स्मिता रडू लागते. रमेशच्या हाताला एक वस्तू लागते. तो बाल्कनीत येतो. काळेंच्या घराकडे संतापाने पहातो. ती वस्तू त्या घराच्या दिशेने भिरकावतो. अचानक प्रकाश जातो. काच फुटल्याचा आवाज. संगीत सुरु.) पुन्हा प्रकाश येतो तेव्हां अजयने शीर्षासन केलेले.सकाळची वेळ. रमेश दरवाजा उघडून आत येतो. हातात. सहज बाल्कनीत जातो. काळेला पाहून थबकतो. स्वगत) हे अशक्य आहे. ह्या काळेचं वाढतंच चाललं. (रमेश घाईघाईने बाहेर जातो. अनघा त्यांच्या बाल्कनीत येते.)

अनघाः कुणी फोडली असेल हो खिडकी

अजय : काय माहीत (शीर्षासनातून बाहेर येतो.) आपण इथं रहायला नवीनच आल्यामुळे संशयतरी कुणावर घेणार आपल्या समोर रहाणारी माणसंसुद्धा सभ्य दिसतात.

अनघाः हो पाटील नावाचे कुटुंब समोर रहाते. त्यांच्या बायकोला मी ओळखते.

अजयः कशी काय

अनघाः बिल्डिंगच्या भिशीमंडळात येतात ना त्या.

अनघाः बरं विषयांतर नको. आज तरी शॉपिंगला जायचं नां

अजयः अगं पण मी आज पैसे काढायचे विसरलो.

अनघाः मग मी एक काम करते मी पैसे काढते. तू मला जॉईन हो.

अजयः चालेल. (अनघा ड्रॉवरमधून पासबुक घेत जाऊ लागते.)

अनघाः वेळेवर येशील ना

अजयः काही काळजी करू नकोस. मी पोहोचतोच. (अनघा जाते काही वेळाने दारावरची बेल वाजते अजय जाऊन दार उघडतो. दारात रमेश.)

रमेशः मी रमेश पाटील.

अजयः हो. मी ओळखतो तुम्हाला.

रमेशःकसं काय

अजयः म्हणजे समोर बघून हो.

रमेशः अच्छा. तसं तर मी ही तुम्हाला चांगलंच ओळखतो.

अजयः या नां आपण आत या.

रमेशःहो. घरात कोणी नाही का

अजयः नाही आम्ही दोघंच असतो. मुलं शिकायला महाबळेश्वरला असतात.

रमेश :अच्छा अच्छा.

अजयः बोला ना काय काम काढलंय

रमेशः खून करायचा होता.

अजयः अं

रमेशः खून करायचाय

अजयः (ताडकन उठत) कुणाचा

रमेशः खरंतर तुमचा.

अजयः (घाबरत) कशाबद्दल

रमेशः (त्याला समजावत) नाही घाबरू नका. मी खुनी नाही. एका मार्केटिंग कंपनीत सर्व्हिसला आहे.

अजयः (एकदम हायसं वाटत) बरं तुचा स्वभाव फार मजेशीर आहे हं.

अजयः पण तुम्ही एकदम खुनाचं कसं काय बोललात

रमेशः सांगतो. तुम्हाला थोडंसं विचित्र वाटेल पण सांगतो. आपण जरी एकमेकांना ओळखत नसलो तरी समोरासमोर राहून ओळखतो.

अजयः बरोबर.

रमेशः आपली पत्नीतर आमच्या हिला चांगलं ओळखते.

अजयः हो.

रमेशः आपणाला आमची पत्नी रोज पहात असते.

अजयः काय

रमेश : हो. नाही म्हणजे दुसऱ्या कुठल्या अर्थाने नव्हे तर तुम्ही काय करताय हे बऱ्याचवेळा ती बाल्कनीतून पहात असते.

अजयः बरं. काय काम काढलंय

रमेशः सांगतो. तुम्ही करत असलेल्या गोष्टी ती मला करायला लावते. कुठं सूर्यनमस्कारच घाल. कुठं शीर्षासन घाल. कुठं त्यांनी ही वस्तू घेतली ती आपण घेऊया. असं सारखं दिवस रात्र चालू असतं. सकाळी उठल्यापासून वाद चालू होतात. ते चुकवायला मी जास्त वेळ बाथरुममध्येच असतो.

अजयः आश्चर्य आहे. तुझ्याकडे असं काही चालू आहे याची मला काहीच कल्पना नाही. गंमतच आहे.

रमेशः गंमत ही गंमत आहे अहो मिस्टर मी वेडा व्हायची वेळ आली आहे. पूर्वी ती मला तिच्या माहेरची उदाहरणं द्यायची. तुम्ही आल्यावर माहेरच्या माणसांची जागा तुम्ही घेतलीत.

अजयः गंमत आहे.

रमेश : (ताडकन उभा रहात) अहो मिस्टर, ही गंमत नाहीये. तुम्हाला काय वाटलं मी काय इथं गंमाडी जंमत सांगायला आलोय

अजयः नाही...म..मला..तसं म्हणायचं नव्हतं..मी

रमेशः काय तू..मी..तू..मी अं अहो इथं जीव जायची पाळी आलीय. मला एक सांगा तुमच्या चांगल्या वागण्यामुळे जर माझा संसार उद्ध्वस्त होणार असेल तर तुचं वागणं वाईट आहे असंच म्हणायला पाहिजे ना

अजयः काय काय

रमेशः एक लक्षात घ्या. ती कुणाचं उदाहरण देते

अजयः कुणाचं

रमेश : अहो कुणाचं काय तुमचं.

अजयः अं हो, माझं.

रमेशः त्यामुळे माझं नुकसान होतंय. आत्ता हे सगळं तुच्यामुळे होतंय हे तुच्या लक्षात आलं नां

अजयः हो. पण..

रमेशःएक व्यक्ती म्हणून तुम्ही याला जबाबदार नाही

अजय : आहे..पण ..

रमेशः मला एक सांगा रस्त्यावर एखाद्या माणसाला ॲक्सिडेंट होऊन लागलं तर तुम्ही त्याला मदत करता नां

अजयः हो.

रमेशःमग इथं तर तुमच्यामुळे प्रॉब्लेम होतोय आणि तुमची काहीच नैतिक जबाबदारी नाही.

अजयः नाही..

रमेशः नाही कशी

अजयः नाही मला जबाबदारी म्हणायचं नव्हतं. माझी ती आहेच. फक्त मला याची कल्पना नव्हती. आणि तुम्ही मला हे येऊन सांगताय हे विचित्र वाटतंय.

रमेशः अहो विचित्र वाटतंय काय ते आहेच. मलाही विचित्रच वाटत होतं. पण बायको सारखी दुसऱ्याचं उदाहरण द्यायला लागली तर कुठला नवरा हे रोज सहन करणार हो आणि यावर उपाय म्हणजे मी वेडं होणं किंवा मी तिचा खून करणं किंवा मी तुमचा खून करणं.

अजयः (जरा सावध होत) पण माझा

रमेशः हो. म्हणजे माझी अवस्था लक्षात घ्या.

अजयः अहो पण मी गुन्हा केलेला नाही.

रमेशः पण या गोष्टीला तुम्हीसुद्धा जबाबदार आहात हे तुम्हाला पटलंय असं म्हणालात ना

अजयः हो. पण याचा अर्थ तुम्ही माझा खून करावा याला तुम्हीपण जबाबदार आहात ना

रमेशः हो. पण माझ्या वागण्याला मर्यादा आहेत. तुमच्या नाही. मग बदल कुणी करायला हवा

अजयः (थोडासा चिडून) अहो, तुम्ही काय बोलताय हेच मला कळेनासं झालंय. तुम्ही तुचा प्रॉब्लेम आहे म्हणून सांगता. त्याला मी जबाबदार आहे म्हणता. मी तुमचा खून करू शकतो म्हणता. तुमच्या बायकोच वागणं बरोबर नाही म्हणता. तुम्ही काय बोलताय हे तुमच्यातरी लक्षात येतंय का

पाटील आता फक्त ही तुमची मिशी जरा जास्त लांब आहे म्हणून तुमचा खून करतो असं म्हणायचे तुम्ही बाकी राहिला आहात.

रमेशः गोंधळलात ना नेमकं हेच माझं होतंय. समजलं

अजयः अहो पण मला का याचा त्रास

रमेशः माझंही नेमकं हेच म्हणणं आहे. तुम्ही कितीही चांगलं वागत असा पण काळे खूप चांगले आहेत. काळे खूप चांगले आहेत असं सारखं म्हणत ती मला त्रास देते.

अजयः म्हणजे प्रॉब्लेम तुमच्या बायकोत आहे.

रमेशः हो.

अजयः पण मग तिनं स्वतःत बदल करायला हवा किंवा तुम्ही तिला समजावून सांगायला हवं.

रमेशः हे सगळं जमलं असतं तर मी इथं आलो असतो (दोघंही शांत. रमेश काही वेळाने.)

मला तर गेले काही दिवस एक विचित्र स्वप्न पडतंय.

अजयः कोणतं

रमेशः सांगू नाही म्हणजे तुम्हाला कसं सांगायचं तेच समजत नाहीये.

अजय :अहो सांगा आता. आता आणखी काय विचित्र असणार आहे

रमेशः मला पहिल्यांदा स्वप्न पडलं ते मागच्या आठवड्यात. माझं आणि हिचं भांडण झालं होतं त्यादिवशी.

अजयः स्वप्न काय होतं

रमेशः आम्ही दोघं भांडतोय आणि तुम्ही आमच्या बाल्कनीला बाहेरच्या बाजूने लोंबकळत आम्हाला चोरुन पहाताय. आणि जोर जोरात हसताय. नंतर काही दिवसांनी तुम्ही दिवाणखान्यात बसला आहात आणि आमच्याकडे बघून हसताय.

अजयः आणि तुम्ही काय करताय

रमेशः भांडण. आणि या सगळ्याचा कहर झाला जेव्हा तुम्ही मला आमच्या बेडरुममध्ये दिसायला लागलात. (अजय ताडकन उठतो.) अर्थात हे ही स्वप्नच होतं.

अजयः (थोडसं चिडून) मिस्टर पाटील तुम्ही मनोरुग्ण आहात. पुढचं स्वप्न दिसायच्या आत स्वतःवर इलाज करून घ्या.

रमेशः नाही. मी पूर्ण बरा आहे. आणि स्वप्न पडणं म्हणजे काही मनोरुग्ण नव्हे. आपल्या सगळ्यांनाच तशी स्वप्न पडतात आणि स्वप्नात ओळखीची किंवा बघितलेली माणसंच असतात. प्रॉब्लेम माझा नाहीये तिचा आहे.

अजय : मी बोलू का एकदा त्यांच्याशी

रमेशः काय बोलणार

अजयः हेच...म्हणजे त्यांनी असं वागणं बरोबर नाही.

रमेशः हे तर मी तिला कित्येक वर्षे सांगतोय.

अजयः हे बघा तुम्ही बोलणं आणि मी बोलणं यात फरक पडणार. माझं ऐकतील त्या. अहो मी हाडाचा शिक्षक आहे.

रमेशः नको. तुम्ही समजावून सांगितलत तर तिला काही क्षण पटेल ते. आणि तुमची इमेज आणखीनच घट्ट होईल तिच्या मनात. ती तुमच्याबद्दल आणखीनच बोलायला लागेल आणि माझी स्वप्नं वाढतील.

अजयः मग काय करायचं

रमेशः तुम्ही दारू पिता

अजयः काय नाही.

रमेशःतुम्ही आज माझ्याकडे पार्टीला या. तिच्यासमोर फक्त आपण दारू पिता असं दिसलं तरी माझा प्रॉब्लेम सॉल्व!

अजयः अहो पण मी पित नाही.

रमेशः अहो पण खोटंच असणार आहे सगळं. हे बघा ह्यातून चांगलं निष्पन्न होणार असेल तर काय वाईट

आहे आणि ती माझी बायको आहे. मला तिच्या बरोबर संसार करायचा आहे. तुमची इमेज तिनं सेव केलेली आहे आणि ती एकदा तिच्या मनातून ती इमेज गेली की ती रिलॅक्स होईल.

अजयः कशी काय

रमेश :कारण ती हट्टी असली तरी माझं सगळं म्हणणं पटतं तिला तेव्हा.

अजयः मला एक प्रश्न पडलाय तुम्ही एवढं सगळं बोलता आणि तरी तुच्यावर अशी वेळ यावी म्हणजे...

अजयः पण तुम्ही म्हणताय तसं मी वागलो तर माझी इमेज नाही खराब होणार

रमेशः होणार ना. पण ती माझ्या बायकोपुरती. आणि ती माझी बायको आहे. तुमची नाही.

अजयः ती अपार्टमेंटमध्ये माझ्याबद्दल वाईट बोलायला लागली म्हणजे

रमेश : ती तसं करणार नाही. एकदा का तिला कळलं की तुम्ही ती विचार करते त्यापेक्षा वेगळे आहात की ती एकदम तुमच्याबद्दल बोलायची बंद होईल. अहो, मी सांगतोय ना.

अजयः ठीक आहे. मी आज रात्री येतो.

रमेशः आणि थोडसं विचित्र वागलात की तिला शॉकच बसेल. जमेल ना

अजयः न जमायला काय झालंय अहो मलाही खरंतर असं वागायची इच्छा आहेच. पण आत्ता चान्स मिळतोय. ठीक आहे. तुम्ही म्हणता तसं करून बघू. तुमचा प्रॉब्लेम सॉल्व झाला तर आमचा कसा सोडवायचा याचा विचार करुया.

रमेशः (ताडकन उठत) तुमचं काय

अजयः ते सांगतो नंतर.

रमेशः नाही. तुमचं काय ते सांगा. कसला धक्काबिक्का देऊ नका. माझी कंडिशन आणखीन वाईट होईल.

अजयः सांगतो हो. अगोदर तुमचं तरं होऊन जाऊ दे. रात्री भेटूच.

(अंधार. पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा अजय आणि रमेश दोघं रमेशच्या घरी दारू पित बसलेत. स्मिता आश्चर्यचकित. भयंकर चिडलेली. तिला काळेंचं हे रूप नवीनच.)

रमेशः घ्या हो.

अजयः नाही नको.

रमेश :घ्या हो. एवढ्यानं काहीच होत नाही. अगं जरा ते भडंग घे ना जरा. (स्मिता रागारागानं निघून जाते.)

अजयः (हळू आवाजात.) तुम्ही खरंच थम्स अपमध्ये दारू नाही ना मिसळलेली

रमेशः छे हो.

अजयः नाही मला एकदम चढल्यासारखी वाटतेय.

रमेशः नाही नाही. ते सायकॉलॉजिकल आहे.

अजयः मग घ्यायला हरकत नाही. बरं तुच्या मिसेस खूप चिडल्यासारख्या वाटतात.

रमेशः नाही नाही. तिचा चेहराच तसा आहे. तुम्ही एन्जॉय करा. ती तुमच्या या अनपेक्षित प्रतिमेमुळे अशी वागतीय. (स्मिता येते. भडंगाची प्लेट टेबलवर जरा आपटत.)

स्मिताः घ्या.

रमेशः तर अजयजी मला तुमचे विचार खूपच पटले. ही नेहमी म्हणायची त्यांना एकदा घरी बोलवा. त्या निमित्ताने ओळख होईल. एकमेकांचे विचार शेअर करता येतील.

अजयः हो नां. मलाही खूप बरं वाटलं.

स्मिताः खूप विचार शेअर झाले. झोपू या का आता

रमेश : अगं असं काय करतेस अं तुला झोप आलीय का मग तू जाऊन झोप ना.

अजयः पाटीलसाहेब खूप उशीर झालाय निघू या का आता

स्मिताः नाही नाही. मी असंच म्हटलं. हे रोजच उशिरा उठतात. मला सवय आहे तशी जागायची.

रमेशः (थोडंसं चिडून) ठीक आहे.

अजयः बाकी काहीही म्हणा हं पण तुमची साडी खूप छान आहे.

स्मिताः थँक्यू (थोडीशी हसते.)

अजयः मला हिरवा रंग खूप आवडतो. (अजयचे बोलणे थोडेसे तोल गेल्यासारखे.)

रमेशः बरं बरं असू दे.

अजयः म्हणजे फक्त रंगच नाही तर त्या रंगाचे कपडे घातलेली माणसंसुद्धा.

रमेश : (खाकरतो.) अजयजी घ्या ना.

अजयः घेतो ना आणि काय योगायोग आहे बघा माझी पँटसुद्धा हिरवीच आहे आज.

(स्मिता हसते. रमेश वैतागून)

रमेशः ठीक आहे. (मुद्दाम विषय बदलत) काळे तुमचा शाळेत शिकवण्याचा विषय कुठला

अजयः मराठी. पोरं माझ्यावर खूश असतात. रोज कविता म्हणायला लावतो सगळ्यांना.

(थोडंसं गात) हिरवे हिरवे गार गालीचे हरित तृणांच्या मखमालीचे. त्या सुंदर मखमालीवरती फुलराणी ती खेळत होती.

रमेशः (जवळ जवळ ओरडत) काळे बास ीी बास आता. तुम्हाला जास्त झालीय.

अजयः नाही. का तुम्हाला आवडत नाही

रमेशः काय

अजय : हिरवे हिरवे गार गालीचे..

रमेशः नाही. मला हिरव्याची ॲलर्जी आहे. मला लाल रंग आवडतो. खून का समजलं.

स्मिताः मला मात्र हिरवाच रंग आवडतो.

रमेशः तुला कुणी विचारलंय

स्मिताः तसं नव्हे आपलं एक सांगितलं त्यांना.

रमेश : तुला मघाशी झोप आली होती नां तू आत जा आता.

स्मिताः पण मला इथेच थांबायचं असेल तर

रमेशः मी सांगतोय ना जा म्हणून (स्मिता नाईलाजाने जाते. रमेश अजयला) काळेसाहेब बहुतेक मला वाटतं तुम्ही बास करावं. तुम्हाला थोडी जास्त झालीय.

अजयः नाही नाही तसं काही नाही.

रमेशः नाही पण पुरेच . हवं तर उद्या परत बसू. चला. (अजयला उठवतो. दारापर्यंत नेतो.)

अजयः मजा आली हं पण.

रमेश : (नाईलाजाने) हो मला पण मजा आली.

अजयः पण तुम्हाला लाल रंग आवडतो मला वाटलंच नव्हतं की तुम्हाला लाल रंग आवडत असेल म्हणून.

रमेश : (नाईलाजाने काहीतरी बोलायचे म्हणून) हो. आवडतो मला लाल रंग. मॅड कलर. मॅडच आहे मी.

अजय : (बाहेर गेलेला पुन्हा आत येत) काय

रमेश :स्मिताऽऽ ...स्मिता..ऽऽ (स्मिता बेडरुममधून बाहेर येते.) लाज नाही वाटत त्या काळ्यांसमोर फिदीफीदी हसायला

स्मिताः का तुम्हाला का राग एवढा माझा

रमेशः अगं तू ह्या काळेचं सारखं उदाहरण देतेस. साला हरामखोर आहे तो.

स्मिता : तुम्ही तरी त्यांना कशाला घरी बोलावलं

रमेशः वा ! हे बरंय. तू मला रोज त्यांचं उदाहरण देऊन छळतेस आणि आता विचारतेयस का आणलंत म्हणून

स्मिताः तुम्हाला मला दाखवायचं होतं की काळे दारू पितात म्हणून. म्हणूनच तुम्ही त्यांना घरी घेऊन आलात आणि माझ्यासमोर त्यांच्या बरोबर पित बसलात. तुम्हालाही माहिती आहे मला घरात या गोष्टी आवडत नाहीत. तरीही तुम्ही मुद्दामच केलंत हे सगळं.

रमेशः हो मुद्दामच केलं. तुझ्या लक्षात आलं ना काळे हा माणूस कसा आहे ते अगं दारू पिऊन मी कधी कुणाच्या बायकोला असं म्हणालेलो नाही की तुमची साडी छान आहे म्हणून.

स्मिताः हो तुम्ही कुणा दुसऱ्या बाईला असं म्हणाला नसाल पण स्वतःच्या बायकोला जर कुणी तुझी साडी चांगली आहे, असं म्हटलं तर तुम्हाला राग येतो

रमेश : हे बघ हे कुठल्याही पुरुषाची नॅचरल रिॲक्शन आहे.

स्मिता : मग त्यांना हिरवा रंग आवडतो आणि मला ह्यासुद्धा नॅचरल रिॲक्शनच आहेत.

रमेशः खड्डयात गेल्या तुमच्या नॅचरल रिॲक्शनस. (काही क्षणांनी) अगं तो मनुष्य तिथं पितोय तर त्याच्या कुठल्या बोलण्याला काय प्रतिसाद द्यायचा हे तुला कळायला नको

स्मिताः पण तुम्ही त्यांना बोलावलंच का आणि मी काय बारमधली वेटर नाही तुम्हाला पाहिजे त्या पद्धतीनं सर्व्ह करायला.

रमेशः हे सगळं तुझ्यामुळेच नाईलाजानं चाललंय. मला त्या काळेबद्दल काहीही वाटत नाही. उलट रागच आहे माझ्या मनात.

स्मिताः राग का आहे मी त्यांना चांगल म्हणते म्हणूनच नां

रमेशः असेल कदाचित.

स्मिताः असेल नाही. तसंच आहे. तुम्ही तुमच्या ऑफिसमधल्या बायकांबद्दल चांगल बोलत असता म्हणून काही मी राग नाही ठेवत त्यांच्याबद्दल मनात. तुम्हाला मी म्हणजे एक वस्तू म्हणून हवी आहे. आपल्या आवश्यकतेनुसार वापरायला. ऊठ म्हणलं की उठणारी बस म्हटलं की बसणारी.

रमेशः (किंचित शांत होत) तसं तर माझंसुद्धा आहे. बॉस मला असाच वापरत असतो. रात्री अपरात्री फोन करतो. मला सतत कामात ठेवतो. टार्गेटस् देतो. त्या टार्गेटस् ना पूर्ण केलं की बक्षीस म्हणजे महाबळेश्वर ट्रिप, दारू आणि पूर्वी केलं त्यापेक्षा मोठं टार्गेट. हे सगळं वस्तू म्हणूनच वापरणं आहे. प्रत्येकजण दुसऱ्याला वस्तूसारखं वापरतोय. आणि मी बळी पडत नाहीये या सगळ्याला (काही क्षण शांतता. स्मिता त्याच्या जवळ येते. त्याच्या डोक्यावनरून हात फिरवते.)

स्मिताः ख रं मला तुला दुखवायचा उद्देश नव्हता. आपण सगळेच तसं वागतोय.

रमेशः सालं मला एक कळत नाही. आपल्याला तात्त्विकदृष्ट्या सगळं पटलेलं असतं. पण वागता मात्र तसं येत नाही. अतिशय, मिडिऑकर जगणं आहे आपलं. नालायक होत चाललोय आपण दिवसेंदिवस प्रत्येक बाबतीत. प्रत्येक गोष्ट आपल्याला पाहिजे तशी मॅनेज करण्यासाठी काय वाट्टेल ते करायचं. (पॉज) सालं दारू खरं बोलायला लावते हेच खरं. (दारू आणि भडंगाच्या प्लेट उचलायला लागतो.)

स्मिताः थांब मी नेते. (स्मिता प्लेट उचलून आत नेते. दारावरची बेल वाजते. रमेश जाऊन दार उघडतो. दारात अजय.)

रमेशः तुम्ही पुन्हा

अजयः हो. माझी बायको मला आता घरात घेत नाहीये. मी दारू प्यायलोय असंच तिचं म्हणणं आहे.

(रमेश चकीत.अंधार..)

(काळेंचं घर. अनघा, अजय, रमेश, स्मिता. चौघे शांत कुणीच बोलत नाहीये.)

अनघाः गेल्या तीन महिन्यांपासून रोज भेटतोय आपण आणि एकाच मुद्द्यावर भांडतोय. म्हणलं आज सगळेच एकत्र येऊन यावर काही मार्ग काढता येतोय का ते बघूया. स्मिता : माझा नवरा गेले तीन महिने रोज दारू पिऊन झिंगून येतोय. तुला तुझा नवरा असं वागला तर आवडेल

स्मिताः पण आपल्या आवडीचा प्रश्णच कुठे येतो यांच्या डोक्यात

अजयः मी त्या दिवशीही प्यायलेलो नव्हतो. पण त्या दिवसानंतर मात्र रोज प्यायला लागलो तुझ्यामुळे.

अनघाः माझ्यामुळे माझ्यासाठी अजय तू मला सुखी करण्यासाठी दारू पितोयस का काय

अजयः नाही. मि. पाटील तुम्हीच सांगा.. जर तुम्ही न पिणारे असाल आणि तुमच्यावर जर 'तू फार पूर्वीपासून पित असला पाहिजेस' असा जर संशय सतत घेतला गेला तर तुम्ही अस्वस्थ नाही होणार

स्मिताः त्याचं उत्तर हे देऊ शकणार नाहीत. कारण ते पिणारेच आहेत.

रमेशः (त्या काही बोलायचंय पण सुचत नाही अशा अवस्थेत.) मला खूप बोलायचं आहे पण बोलत नाही.आपण त्यांचा प्रॉब्लेम सोडवायला इथं आहोत याचं भान ठेवूया जरा.

अनघाः बरं पाटील मी म्हणते तुम्ही कधी इतकी प्यायलात की तोल जाऊन पडलायत आणि कॉलनीतल्या माणसांनी तुम्हाला घरी पोहोचवलंय

रमेशः नाही. काळेंचं प्रमाण वाढलंय हे खरंच आहे. पण तुम्हीच सावरायला हवं.

अजयः ती काय सावरणार एक नंबरची संशयी आणि हट्टी बाई आहे ती. स्वतःच खरं करणारी. नवऱ्याला फक्त एका वस्तूसारखं वापरू पहाणारी.

स्मिताः अहो असं काय बोलताय तिला. तुम्ही जरा शांत व्हा. अहो आमच्याकडेसुद्धा

रमेशः (वाक्य तोडत, चिडत) आपलं यात काही काढायला नको. हं. शक्यतो बोलताना हे भान असू दे.

स्मिताः का तुम्ही सारखं हे बोलू नको, ते बोलू नको असं करू नका आता. मला काय बोलायचं ते चांगलं कळतं.

रमेशः तसं असतं तर तुला मला हे सांगायची वेळ आली नसती.

स्मिताः तुम्ही सतत जमेल तिथं दडपशाही करत आला आहात माझ्यावर. तुम्हीतर अजिबातच बोलू नका.

रमेशः (आणखी चिडत) तुला सांगून पटत नाही म्हणल्यावर दडपशाहीशिवाय काय करणार

अनघा : हे बघा मि. पाटील तुम्ही जरा शांत व्हा.

रमेशः अहो कसा शांत होऊ

अनघाः अहो तुम्ही मी बोलावलंय म्हणून आमच्यासाठी आलात आणि आता तुम्हीच भांडताय

रमेशः (एकदम लक्षात येऊन) ओके.. बोलूया. तुच्याबद्दल बोलूया.

अजयः मला एक सांगा पाटील, समजा तुम्हाला मुलं असती आणि तुमच्या बायकोनं हट्टानं तुमच्या मनाविरुद्ध त्यांना शिक्षणासाठी बाहेर ठेवलं तर तुम्हाला ते त्रासदायक नाही वाटत रहाणार

रमेशः तुम्ही सगळे मलाच का सारखे प्रश्न विचारताय बरं विचारताय ते विचारताय आणि ते प्रश्नसुद्धा 'तुम्ही जर असे असता किंवा तुम्ही जर तसे नसता तर' अशा स्वरुपातले आहेत. अहो कशी देऊ मी उत्तर

अनघाः एक मिनिट. अजय मला एक सांग, मुलं बाहेर ठेवण्याचा आणि तुझ्या दारूचा काय संबंध

अजयः ते फक्त एक कारण झालं. अशी बरीच कारणं आहेत तुझ्यात ज्यामुळे मी दारू प्यायला लागलो.

अनघाः म्हणजे माझ्यामुळे तू असं वागायला लागलास.

अजयः हो.

अनघाः मग दे मला घटस्फोट आणि हो मोकळा.

अजयः हिनं हे एकच लावून धरलंय गेले काही महिने. जसं काही हे सगळं टिकवायची जबाबदारी

एकट्या माझीच आहे. घटस्फोट तर घटस्फोट होऊन जाऊ दे एकदा.

स्मिताः एक मिनिट. असं काही करायचं नाहीये आपण. स्वतःला सावरत आणि दुसऱ्याला सावरत जायचंय पुढे आपल्याला आयुष्यात. कुणालाही न तोडता. आपण जरा वेळ शांत बसू या. थोडा वेळ गेला म्हणजे वेगळं काहीतरी सुचेल. (अचानक लाईट जातात.)

अजयः अरेच्चा लाईट गेले

अनघाः मी मेणबत्ती आणते. (अनघा आत जाते.)

अजयः आपले गंभीर प्रश्न हास्यास्पद होतायत याच एक मला फार वाईट वाटतंय.

रमेशः हो ना. उत्तम नाटक होऊ शकेल यावर. ! पैसेही सुद्धा भरपूर मिळतील.

अजयः अशाप्रकारे बारीकसारीक प्रश्नांवरून स्वतःच आयुष्य बरबाद करत राहाणंच मुळात हास्यास्पद आहे.

(अनघा मेणबत्ती घेऊन येते.)

स्मिताः मला लहानपणीचे दिवस आठवले.. लाईट गेले की आम्ही मुलं गाण्यांच्या भेंड्या खेळायचो.

अनघाः अग हो. आम्ही पण. लाईट येईपर्यंत खेळ रंगत जायचा.

स्मिताः खेळू या

रमेश :काय भेंड्या ही काय वेळ आहे गाणी म्हणायची

स्मिताः पण थोडावेळ आपण मनोरंजनात घालवला तर फ्रेश होऊ आपण.

अजयः मला तर ही एस्केपच वाटते.

अनघाः वाटेना का एस्केप. खेळू या. किंवा हां माझ्या लहानपणी माझे आजोबा सांगायचे कि चीनमध्ये प्राचीन काळी अशी पद्धत होती की नवरा बायकोचं भांडण झालं की त्यांच्या डोळ्यावर एक काळी पट्टी बांधायचे आणि त्यांनी एकमेकांशी एका रुममध्ये बोलायच. फक्त अट अशी की खरं बोलायचं.

स्मिताः हे मजेशीर आहे. खेळू या.

रमेशः नको.

स्मिताः का खरं बोलायची भीती वाटते ठीक आहे. ज्यांना वाटते ते कट.

अजयः ठीक आहे. खेळू या.

अनघाः थांबा मी रिबीनी आणते.

रमेशः मला तर हा प्रकार फालतू वाटतोय.

स्मिताः का

रमेशः तो खेळ दोघांचा असणार आहे. आपण चौघांनी खेळायचं म्हणजे बुद्धिबळ डबल्सनी खेळण्यासारखं आहे.

स्मिताः अहो, गंमत म्हणून खेळायचं.

रमेशः ठीक आहे. शिवाय अंधारात स्वतःची जाणीव तीव्रतेनं होते. (अनघा येते.)

अनघाः घ्या. आपापल्या डोळ्यांवर बांधा. (सगळे बांधतात.)

स्मिताः आपण क्षणभर आंधळे झालोय असं वाटलं.

अजयः पण आपण आहोतच तसे. चला. कुणापासून सुरवात

सगळेः तुझ्यापासून.

रमेशः जो तुमच्या मनात येईल तो विचार बोला. शक्यतो विचार पॉझिटिव्ह असू द्या.

अजयः (काही क्षण विचार करून) ही सारखं माझ्यावर हक्क गाजवायचा प्रयत्न करते ते मला आवडत नाही.

अनघाः पण मी...

रमेशः एक मिनिट. त्यांना पूर्ण बोलू द्या.

अनघाः ठीक आहे.

अजयः ही गेले काही महिने आपण घटस्फोट घेऊया, असं म्हणायला लागली. त्यातून मी अस्वस्थ रहात गेलो आणि माझ्याकडून चुका झाल्या.

अनघाः तुझी भावना चांगली आहे. पण तू आधीपासून दारू पित होतास यावर माझा अजून विश्वास आहे. फक्त ते माझ्या आत्ता लक्षात आलं एवढंच.

अजयः थोडक्यात आपण खऱ्या कारणांपर्यंत पोचायचो आहोत अजून. आपण खोटंच बोलत आहोत.

रमेशः थांबा आता. मला जरा बोलायचंय. ही सारखं तुचं उदाहरण देते ते मला आवडत नाही.

स्मिताः पण मी ते थांबवलंय गेले काही दिवस.

रमेशः पण ते काही दिवसच. तुझं सारखं दुसऱ्यांचं इमिटेशन करण्याकडे सारखा कल असतो. ते काही मला पटलेलं नाही.

स्मिताः पण तुमची सारखी दडपशाही मला आवडत नाही.

रमेशः तुला सारखं काहीतरी हवं असतं. हे हपापलेपणच वाईट आहे.

स्मिताः कदाचित आपल्याला मूल झालेलं नाही या गोष्टीमुळं तसं होत असेल.

रमेशः पण सारखं दुसऱ्याचं उदाहरण देणं ही विकृतीच आहे.

स्मिताः (थोडीशी चिडून) दारू पिणं हिसुद्धा विकृती आहे. सांगून सांगून थकले मी. सोडलीत तुम्ही

रमेशः थोडक्यात आपण खऱ्या कारणांपर्यंत पोचायचो आहोत अजून. आपण खोटंच बोलत आहोत.

अजयः ही माझ्याशी नीट वागतच नाही. नेहमी नाईलाजाने वागल्यासारखं वागते माझ्याशी. कायम मी तुझ्याशी लग्न केलं हे उपकार असल्याचा अविर्भाव असतो. शिवाय कुठलंही समाधान नाही मला हिच्यापासून. कारण हिचाच इंटरेस्ट नाही. (हळूच डोळ्यांवरची पट्टी काढतो. अनघाकडे पाहू लागतो.)

अनघाः तू समाधानी नाहीस तशी मी पण समाधानी नाहीये.

अजयः (पुन्हा डोळ्यावर पट्टी लावत) आपला नवरा एक साधा मास्तर आहे ही गोष्ट तुला नेहमी डाचत आलीय.

रमेशः (उगाचच डोळ्यांवरची पट्टी काढतो आणि बघतो, पुन्हा लावतो.)

अजयः तुला नवऱ्यावर संपूर्ण हक्क गाजवायचा आहे. त्याला कुठलंही स्वातंत्र देणं तुला जमणार नाही. मला मी एक साधा शाळामास्तर आहे याचा न्यूनगंड होता म्हणूनच तुझी गुलामगिरी मी सहन केली इतकी वर्षे. (स्मिता डोळ्यांवरची पट्टी काढते सगळ्यांकडे पहाते पुन्हा लावते.)

अनघाः स्मिता सारखं तुझं उदाहरण देते ही गोष्ट तुझ्या लक्षात आल्यामुळे तुझा अहंकार वाढला हे सत्य आहे. दुसऱ्याच्या बायकोला आपण आवडतो हे तुझ्या लक्षात आल्यामुळे तू घसरलास.

स्मिताः एक मिनिट. मी काळेंचं उदाहरण देत असले तरी ते मला आवडतात असं मी कधीही म्हटलेलं नाही.

रमेशः ते तू कधीच म्हणणार नाहीस पण आहे तसंच.

स्मिताः तुम्हाला काळेंचा राग वाटतो याला कारण तेच आहे.

रमेशः तुला आणि काळेंना हिरवा रंग आवडतो हे मला आवडलेलं नाही.

अनघाः मलाही ते आवडलेलं नाही.

अजयः तुम्हाला दोघांना हे आवडलेलं नाही हे मला आवडलेलं नाही. आपल्या आवडीनिवडीवर दुसऱ्याचा कंट्रोल असावा ही गुलामगिरीची हद्द आहे.

स्मिताः आपण अजूनही खरं बोलत नाही आहोत.

अजयः (डोळ्यांवरची पट्टी काढत) ते आपण विसरुनच गेलेले आहोत.

अनघाः तू सारखी डोळ्यांवरची पट्टी काढतोयस.

अजयः तुला दिसतंय

अनघाः सगळ्यांनाच दिसतंय पण तसं दाखवायचं नाही किंवा दिसलं तरी न दिसल्यासारखं करायचं.

अजयः हेच तुला जमायला पाहिजे. स्मिता माझ्यावर प्रेम करते असं वाटायला लागल्यामुळेच तू अशी वागायला लागलीस.

रमेशः हे काहीतरी भलतंच व्हायला लागलंय.

अजयः नाही. पाटील आता खेळ सोडलात तर तुम्ही खोटे आलात हे सिद्ध होईल.

रमेशः (चडफडत) च्यायला हे सुद्धा नाईलाजानं खेळावं लागतंय. काळे तुम्ही माझ्याकडे प्रथम आलात त्यावेळी तुम्ही दारू प्यायला होतात.

अजयः काय

रमेशः हो चुकून तुम्ही थम्सअपमध्ये दारू घेतलीत. मी बोलणार होतो पण बोललो नाही. नंतर फक्त तुमच्यासाठी मिक्स करत राहिलो.

अजय : हे चिटिंग आहे. तुम्ही माझ्या घरी येऊन म्हणालात की आपण असं केलं की माझ्या बायकोत सुधारणा होईल.

स्मिताः काय

रमेशः नाही तसं नाहीये ते.

अनघाः पण तसं असलं तरी ते त्यांनी त्यांच्या बायकोसाठी केलं. त्यामुळे तू तुझ्या अहंकाराचं पोषण त्यावर करावसं असं नाही. मला पाटलांनी केलं हे ठीक वाटतंय. त्यांनी त्यांच्या बायकोसाठी काहीतरी केलं तरी. तू काय केलस माझ्यासाठी आता तू खोटा आहेस हे सिद्ध होईल.

स्मिताः तुम्ही मला वेगळंच सांगितलंत. काळेंसारख्या माणसाचे विचार ऐकायाला त्यांना आमंत्रित करूया असं म्हणालात.

अनघाः राश ींिः

रमेशः राश ींिः

अजयः छे पर्शींशीःहे चालूच राहील. (दोघंही चडफडत पट्ट्या पुन्हा लावतात.)

स्मिताःआता मात्र माझा तुमच्यावरचा विश्वास पुरता उडालेला आहे.

रमेशः अगं नाही ऐक माझं.

स्मिताः नाही. राश ींिः

अजयः मी स्मितामुळे शेफारलो हे तुझं म्हणणं खरं नाही. तू शारीरिक संबंधात कमी पडतीस आणि त्याचा तुला न्यूनगंड आहे.

अनघा : आता मात्र तुझ्यावरचा माझा विश्वास उडालेला आहे. (जोरजोरात रडू लागते. काही क्षण शांतता. स्मिता तिला सावरते.)

स्मिताः ते पलीकडचे घाटपांडे बघा इतकी वर्षे किती सुखानं संसार करताय.

अनघाः तुम्हीसुद्धा त्यांच्याकडे बघा आणि शिका नवऱ्यानं कसं वागावं ते....

(अजय, रमेश चकीत)

रमेश,अजयःराश ींि !

पडदा.

लेखक : विद्यासागर विलास अध्यापक
अवार्ड स्वाती अपार्टमेंट शिवाजी पेठ कोल्हापूर
फोन. नं. (०२१३) २६२२२९३.

तरुणाई विशेष

आकाश तुझ्यासाठी वेड होईल ..
खाली वाकेल आणि तू नीळा होशील ..
असं लिही ..
ही अंगांगाची माती फेडून टाक कणाकणाने
पंचमहाभुतं तुझं झाड सोडून गेली,
तरी इतरांना झपाटून उरशील, असं लिही ..
शाई, कागद, शब्द आणि तुही
निमित्तमात्र आहेस
तुझ्यातील चेतना ही भवतालच्या अखंड चैतन्याची
ऋणी आहे
याची सजगता ठेवून लिही ..
तुझं पाहणं इतरांच्या पाहण्याहून वेगळं का असेना
पण आपल्यावरही कोणाचा तरी अदृश्य पहारा आहे
याचे भान ठेवून लिही ..
वयाचं भान पक्कं ठेव पण
वयातीत होण्याची इच्छा बाळग
स्थूलावरच तू बसला आहेस , पण स्थूलालाच चिकटून
राहू नकोस ,
या अस्थिरतेलाही स्थिर करणाऱ्या शक्तीचा सूक्ष्म शोध
घेता यावा या ईर्षेने लिही ..
आकाश तुझ्यासाठी वेडं होईल ..
खाली वाकेल आणि तू नीळा होशील ..
असं लिही ..

– गुरुनाथ सामंत



चौथा स्तंभ तिसऱ्या अवस्थेत

मित्रहो, एस. पी. कॉलेजच्या हिंदी विभागाने आयोजित केलेल्या या परिसंवादात मी मराठीतूनच बोलू शकणार आहे, याबद्दल आपणा सर्वांची क्षमा मागतो... खरं तर पॉलिश्ड इंग्लिश बोलणाऱ्यांपेक्षा सफाईदार हिंदी बोलणाऱ्यांचं आकर्षण मला जास्त वाटत आलं आहे आणि आपलं हिंदीतील वाचन, मराठी तर सोडाच पण इंग्रजीच्याही तुलनेत खूपच कमी आहे याची खंतही वाटत आली आहे. ते आकर्षण आणि ती खंत यांची तीव्रता आज जास्तच जाणवत आहे. त्यामुळे हिंदी भाषेबाबतची माझी स्थिती यानंतर सुधारली तर त्याचं थोडंतरी श्रेय या परिसंवादासाठी मला बोलावणाऱ्या संयोजकांकडे जाईल... असो. आज मला 'समाजपरिवर्तनात प्रिंट मीडियाची (मुद्रित माध्यमांची) भूमिका' या विषयावर बोलायला सांगितलं आहे. या भाषणात, प्रिंट मीडियाच्या इतिहासाची उजळणी किंवा त्यातील बदलांचा मागोवा घेण्याची आवश्यकता वाटत नाही. याचे कारण त्याबाबत तुम्ही बऱ्यापैकी परिचित असाल आणि जर कोणी नसतील तर, वाचन करून त्याबाबत ते खूप काही जाणून घेऊ शकतील. तर या भाषणात प्रिंट मीडिया व समाजपरिवर्तन या संदर्भातील काही गाभाघटकांवर दृष्टिक्षेप टाकणार आहे, त्याबाबत थोडे विवेचन करणार आहे आणि त्यासाठी अगदीच माफक उदाहरणे देणार आहे.

प्रिंट मीडिया या संज्ञेची व्याप्ती बरीच मोठी व ऐसपैस आहे, पण आज आपल्या मनात त्याचा अर्थ दैनिक, वृत्तपत्रे आणि नियतकालिके (म्हणजे साप्ताहिके व मासिके) इतकाच आहे. तर समाजपरिवर्तनात काय भूमिका असते (किंवा असावी) प्रिंट मीडियाची याचं उत्तर अगदीच थोडक्यात सांगायचं असेल तर 'दर्पण' आणि 'दिग्दर्शन' हे दोनच शब्द पुरेसे आहेत. काहींच्या लक्षात आले असेल, मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक असे संबोधले जाते त्या बाळशास्त्री जांभेकरांनी सुरू केलेल्या साप्ताहिक व मासिक वृत्तपत्रांची ही नावे आहेत. गंमत म्हणजे बाळशास्त्री जांभेकर हे नाव उच्चारताक्षणीच आपल्या मनात एक आदरणीय व भारदस्त व्यक्तिमत्त्व उभे राहते. पण मुळात बाळशास्त्री जगले किती, तर फक्त ३४ वर्षे. त्यांनी 'दर्पण' सुरू केले वयाच्या २० व्या वर्षी आणि 'दिग्दर्शन' सुरू केले वयाच्या २८ व्या वर्षी. तर तुमच्यापेक्षा थोडेच जास्त वय असलेल्या बाळशास्त्री जांभेकर या तरुणाने १८३२ मध्ये मराठीतील पहिले वृत्तपत्र सुरू केले, त्याचे नाव ठेवले 'दर्पण'. ('दर्पण' हा हिंदी भाषेतील शब्द असावा. 'मै वही, दर्पन वही...' हे गाणं हिंदीतील आहे.) मात्र आज तरी मराठीत दर्पणपेक्षा आरसा हा शब्द प्रचलित आहे. आरसा काय करतो खरे रंग-रूप दाखवतो. सौंदर्य आणि कुरूपता दाखवतो. त्याहून महत्त्वाचे म्हणजे चेहऱ्यावरचे हावभावही. आरशात यांपैकी काहीही लपवता येत नाही. वृत्तपत्रांचे काम हेच आहे असे बाळशास्त्रींना जाणवले असावे, म्हणून त्यांनी 'दर्पण' हे नाव निवडले असावे. म्हणजे वृत्तपत्रं चालवणं याचा अर्थ वाचकांसमोर आरसा उभा करणं.

समाजात अन्याय आणि शोषण असते, तसेच उदात्तता आणि ध्येयवादही असतो. क्षुद्रता असते, तशीच भव्यताही. म्हणजे समाजाची सद्य:स्थिती किंवा वस्तुस्थिती दाखवणं हे वृत्तपत्रांचं मुख्य काम आहे, हे बाळशास्त्रींनी ओळखलं. पण हे कशासाठी करायचं म्हणजे आरसा कशासाठी दाखवायचा तर बदलांसाठी- माणसांत बदल व्हावेत, समाजात बदल व्हावेत यासाठी. समाजात जे जे अनिष्ट आहे, अयोग्य आहे ते ते बदलावे आणि जे जे उल्लेखनीय व अनुकरणीय आहे ते ते पुढे घेऊन जावे. पण हे काम बरेच व्यामिश्र व गुंतागुंतीचे असते. काही वेळा समाजातील अनेक घटक गोंधळून गेलेले असतात, संभ्रमित झालेले असतात. तिथे समाजाला मार्गदर्शनाची वा दिशादर्शनाची गरज असते. म्हणून प्रिंट मीडियाचे दुसरे मुख्य काम दिग्दर्शन. मित्रहो, 'दर्पण' व 'दिग्दर्शन' या दोन शब्दांचा कितीही विस्तार करता येईल, इतके ते शब्द मूलभूत आहेत आणि दिवसेंदिवस त्यांचे अर्थ अधिक व्यापक व अधिक गहन होत आहेत. थँक्स टू बाळशास्त्री जांभेकर!

भारतात प्रिंट मीडियाचे आगमन ब्रिटिशांची राजवट स्थिरावल्यानंतरचे. त्यामुळे भारतातील इंग्लिश, वृत्तपत्रांचा इतिहास जेमतेम दोनशे वर्षांचा, तर हिंदी, बंगाली, मराठी व इतर वृत्तपत्रांचा इतिहास त्यापेक्षा थोड्या कमी काळाचा... या पावणेदोनशे वर्षांचे तीन प्रमुख कालखंड ढोबळमानाने सांगता येतील. पहिला- स्वातंत्र्यापूर्वीचा जवळपास १२० वर्षांचा. दुसरा- स्वातंत्र्योत्तर ४० वर्षांचा आणि तिसरा १९९१ नंतरच्या २० वर्षांचा. पहिल्या कालखंडात म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळात 'पत्रकारिता' हे ध्येय होते (मिशन). दुसऱ्या म्हणजे स्वातंत्र्योत्तर कालखंडात पत्रकारिता हा पेशा झाला (व्होकेशन) आणि तिसऱ्या म्हणजे आताच्या कालखंडात पत्रकारिता हा व्यवसाय झाला (प्रोफेशन). अर्थात, आज काही लोक म्हणतात की, पत्रकारिता हा आता धंदा (बिझिनेस) झालाय. पण मला तसं वाटत नाही, कारण तो मुख्य प्रवाह नाही आणि धंदा म्हणून वृत्तपत्र चालवणाऱ्यांना प्रतिष्ठा नाही. त्यांना जोपर्यंत समाजाकडून प्रतिष्ठा मिळत नाही तोपर्यंत मी तरी पत्रकारिता हा धंदा झालाय असं म्हणणार नाही. हा मुद्दा जरा काळजीपूर्वक लक्षात घ्यावा अशी मी विनंती करीन. कारण या तीन कालखंडांत अनुक्रमे ध्येय, पेशा, व्यवसाय यांना प्रतिष्ठा राहिली आहे. पहिल्या कालखंडात पत्रकारितेकडे 'पेशा' वा 'व्यवसाय' म्हणून पाहणारे अजिबातच नव्हते असे नाही, पण त्यांना

प्रतिष्ठा नव्हती. दुसऱ्या कालखंडात, पत्रकारिता हे 'ध्येय' वा 'व्यवसाय' म्हणून करणारे नव्हते असे नाही, पण त्यांना प्रतिष्ठा नव्हती. आणि आजच्या काळात 'ध्येय' वा 'पेशा' म्हणून पत्रकारिता करणारे अजिबातच नाहीत असे नाही, पण त्यांना प्रतिष्ठा नाही. अर्थातच, हे मी मुख्य प्रवाहाकडून मिळणाऱ्या प्रतिष्ठेबद्दल बोलतोय आणि 'समाज' ही संज्ञा सर्वसाधारण अर्थाने वापरली

> **खरे तर भारताच्या लोकशाहीत आणखी एक म्हणजे पाचवा स्तंभ मानला पाहिजे. तो म्हणजे जनचळवळी व जनआंदालने. या देशातील अनेक व्यक्ती, संस्था, संघटना यांनी आपापल्या स्तरावर व आपापल्या कार्यक्षेत्रात जे लढे उभारले, आंदोलने केली त्यांचे योगदान लक्षात घेतले तर तो पाचवा स्तंभ म्हणावा लागेल. ते योगदान इतके आहे की, छोट्या-मोठ्या चळवळी व आंदोलने सतत होत राहिली नसती तर वृत्तपत्रांना प्रभावी काम तर करता आले नसतेच, पण त्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच झाला असता.**

जाते तेव्हा त्याचा अर्थ 'मुख्य प्रवाह' असाच असतो. स्वातंत्र्यपूर्व काळातील सर्व प्रमुख दैनिके, साप्ताहिके, मासिके यांची नावे, बोधचिन्हे व घोषवाक्ये पाहिली तरी पटकन त्यातून त्यांचा 'ध्येयवाद' दिसून येतो. एवढेच नाही तर त्या वेळच्या अगदी 'करमणूक' व 'मनोरंजन' या नावांच्या नियतकालिकांतही ध्येयवाद होताच होता. आपला देश पारतंत्र्यात आहे, आपला समाज अज्ञान व रूढी-परंपरा यांच्यांत जखडला गेला आहे, त्यामुळे परकीय सत्तेपासून सुटका झाली पाहिजे आणि सम ाजाचे मागासलेपण हटवले पाहिजे ही जाणीव किंवा ध्येय त्या सर्वांच्या केंद्रस्थानी होते. त्या काळातील बहुतांश प्रिंट मीडिया कमी-अधिक फरकाने त्याच ध्येयाने झपाटलेला होता, मिशनरी वृत्तीने काम करीत होता. स्वातंत्र्यानंतर लोकशाही पद्धतीने राज्यकारभार सुरू झाला. नवी

राज्यघटना आली. स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्प केला गेला. स्वातंत्र्याबरोबर संधी येते आणि जबाबदारीही. (साने गुरुजींनी देशाला स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर सुरू केलेल्या दैनिकाचे नाव 'कर्तव्य' ठेवले होते.) त्यामुळे स्वातंत्र्यानंतर प्रिंट मीडियाची भूमिका पुढच्या टप्प्यावर आली. राजकीय सत्ता स्वकीयांची असल्यामुळे, सत्ताधारी हे शत्रू राहिले नाहीत. ते जनतेचे सेवक बनले. त्यामुळे त्यांचे काम व्यवस्थित होत आहे की नाही यावर वचक ठेवून त्यांना विधायक विरोध करणे आणि जनतेचे प्रबोधन करून राज्यकर्त्यांना अप्रत्यक्ष मदत करणे अशी दुहेरी भूमिका प्रिंट मीडियाच्या वाट्याला आली. एडमंड बर्कने १७८७ मध्ये वृत्तपत्रांसाठी 'फोर्थ इस्टेट' हा शब्दप्रयोग पहिल्यांदा केला, पण ही संकल्पना भारतात स्वातंत्र्यानंतर खऱ्या अर्थाने उदयाला आली. आता ती इतकी रुजली व गृहीत धरली गेली आहे की, जणू काही लोकशाहीत प्रिंट मीडियाला अधिकृतपणे चौथा स्तंभ म्हणून स्थान आहे. मात्र, भारताच्या राज्यघटनेत कुठेही 'चौथा स्तंभ' किंवा 'फोर्थ इस्टेट' असा शब्दप्रयोग नाही. पारंपरिक अर्थाने कोणतेही स्ट्रक्चर स्थिर उभे राहायचे असेल तर चार स्तंभ असावे लागतात. त्या अर्थाने कायदेमंडळ, न्यायसंस्था व प्रशासन या तीन स्तंभांच्या जोडीला प्रिंट मीडिया हा लोकशाहीचा चौथा स्तंभ मानला गेला. अर्थात, राज्यघटनेत असा उल्लेख नसला तरी राज्यघटनेने बहाल केलेली मूलभूत स्वातंत्र्ये (विशेषत: अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य) आणि इतर अनेक तरतुदी या सर्वांचा विचार करता प्रिंट मीडियाला चौथा स्तंभ मानणे अगदीच रास्त आहे. खरे तर भारताच्या लोकशाहीत आणखी एक म्हणजे पाचवा स्तंभ मानला पाहिजे. तो म्हणजे जनचळवळी व जनआंदालने. या देशातील अनेक व्यक्ती, संस्था, संघटना यांनी आपापल्या स्तरावर व आपापल्या कार्यक्षेत्रात जे लढे उभारले, आंदोलने केली त्यांचे योगदान लक्षात घेतले तर तो पाचवा स्तंभ म्हणावा लागेल. ते योगदान इतके आहे की, छोट्या-मोठ्या चळवळी व आंदोलने सतत होत राहिली नसती तर वृत्तपत्रांना प्रभावी काम तर करता आले नसतेच, पण त्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच झाला असता. आणि जेव्हा जेव्हा अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच करण्याचा प्रयत्न झाला तेव्हा तेव्हा, चळवळी वृत्तपत्रांच्या बाजूने उभ्या राहिल्या. आणि उलटही खरे आहे. वृत्तपत्रे नसती तर चळवळी व आंदोलने यांना आवश्यक तितके बळ मिळाले नसते. म्हणजे चौथा व पाचवा हे दोन स्तंभ परस्परांना पूरक काम करीत राहिले, ऊर्वरित तीन स्तंभांवर दबाव ठेवत राहिले, त्यांच्याशी सहकार्य व संघर्ष करीत राहिले... इतकी विविधता, विषमता व व्यामिश्रता असलेल्या देशात स्वातंत्र्योत्तर ६० वर्षांनंतर लोकशाही टिकून का राहिली आणि भारताच्या शेजारी देशांतील समाज बराच एकसंध असूनही तिथे लोकशाहीचा प्रवास अडखळत व ठेचकाळत का होत आहे याचे एकच एक कारण सांगायचे असेल तर भारतात चौथा व पाचवा स्तंभ खूपच प्रभावी राहिले आणि शेजारी देशांत ते दोन स्तंभ नीट उभेच राहू शकले नाहीत. आता राहिला मुद्दा आजच्या काळात समाज परिवर्तनात प्रिंट मीडियाची भूमिका काय असली पाहिजे मुळात आजचा काळ म्हटलं की १९९१ नंतरचा असाच अर्थ प्रत्येक क्षेत्राबाबत घेतला जातो. १९९१ मध्ये भारतात उदारीकरण पर्व अवतरले, आणि त्याचे चांगले व वाईट परिणाम प्रत्येक क्षेत्रात कमी-अधिक फरकाने झाले. उदारीकरण पर्वात बरेच काय काय झाले, पण महत्त्वाचे म्हणजे वेगवान बदल होऊ लागले, स्पर्धा वाढली, संधी वाढली, स्पेशलायझेशनला गती मिळाली आणि त्याचा परिणाम म्हणून प्रोफेशनॅलिझम किंवा व्यावसायिकतेला अतोनात महत्त्व प्राप्त झाले. ते महत्त्व इतके आहे की, व्यावसायिकता नसेल तर तुमचे अस्तित्वच धोक्यात येणार. अर्थातच, याचा सर्वांत जास्त परिणाम माध्यमांवर झाला. कारण माध्यमांना रोजच्या बदलांना सामोरे जायचे असते. नवनवे बदल समजून घ्यायचे असतात, समजावून द्यायचे असतात. त्यामुळे त्यांच्यासमोरचे आव्हान दुहेरी असते. पहिले आर्थिक स्थैर्य मिळवणे आणि दुसरे बदलांचा वेध घेणे. सुरुवातीला अशी भीती निर्माण झाली की दूरचित्रवाहिन्या आल्यावर प्रिंट मीडियाचे काही खरे नाही. पण ती भीती नुसतीच खोटी ठरली नाही तर, इलेक्ट्रॉनिक मीडिया आल्यामुळे प्रिंट मीडियाचा फायदाच झाला. नंतर इंटरनेटचा वेगवानप्रसार झाल्यावर पुन्हा तीच भीती प्रिंट मीडियासमोर दाखवली गेली, आणि आता तीही निराधार ठरत आहे. उलट, इंटरनेटमुळे प्रिंट मीडियाचे बरेच काम सोपे झाले आहे... मात्र एक झाले आहे, माहिती व मनोरंजन यासाठी प्रिंट मीडियाची गरज तुलनेने कमी झाली आहे. पण प्रिंट मीडियात अशी अंगभूत

ताकद आहे जी मानवी मनाला अधिक व्यापक, अधिक अर्थपूर्ण, अधिक सर्जनशील व अधिक विचारक्षम असे काही हवे असेल तर ते देऊ शकते. ही बलस्थाने लक्षात घेऊन यापुढील काळात प्रिंट मीडियाला आपली गुणवत्ता व विश्वासार्हता वाढवता आली पाहिजे आणि इतर माध्यमे देऊ शकत नाहीत ते देण्यासाठी स्वत:ला सक्षम केले पाहिजे. या संदर्भात दोनच उदाहरणे देतो. मागील वर्षभर टीम अण्णाप्रणित आंदोलनाने देश हलवून सोडला आणि आता जनतेचा भ्रमनिरास झाला आहे. सरकारच्या विरोधातील रोष आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांनी केलेले ग्लोरिफिकेशन यामुळे त्या आंदोलनाला अतोनात प्रसिद्धी मिळत असताना, प्रिंट मीडियाकडून त्याचे विश्लेषण, चिकित्सा अधिक ठोसपणे करण्याची गरज होती. पण त्यात प्रिंट मीडिया फारच कमी पडला. मराठीपुरतं सांगायचं तर लोकसत्ता हे एकमेव दैनिक असं होतं, ज्यांनी सुरुवातीपासून शेवटपर्यंत अधिक स्पष्टपणे व नेमकेपणाने त्या आंदोलनातील उथळपणा व फोलपणा मांडला. 'साधना'ही त्याबाबत कमी पडली. आम्ही 'अण्णा मोठे होत जातील, आंदोलन हरत जाईल' या शीर्षकाचा अरुण टिकेकरांचा लेख गेल्या वर्षीच्या सप्टेंबरमध्ये म्हणजे ते आंदोलन सर्वोच्च शिखरावर असताना छापला, ही त्यातल्या त्यात समाधानाची बाब. दुसरे उदाहरण... नक्षलवाद हे देशाच्या अंतर्गत सुरक्षिततेला सर्वांत मोठे आव्हान आहे, असे साक्षात पंतप्रधान डिसेंबर २००६ मध्ये म्हणाले. पण त्याबाबत पुरेशी जनजागृती करण्यात आणि सरकारला योग्य व ठोस पावले उचलायला भाग पाडण्यात प्रिंट मीडिया बराच कमी पडला. मराठीपुरते बोलायचे तर 'साधना'ने नक्षलवादाच्या विरोधात अतिशय स्पष्ट भूमिका सातत्याने मांडली आहे आणि आमच्या शक्तीनुसार ओपिनियन मेकर्स समजल्या जाणाऱ्या वर्गाचे मत घडविण्यास चांगला हातभार लावला आहे. असो. अशी अनेक उदाहरणे देता येतील. सारांश, गेल्या पावणेदोनशे वर्षांत प्रिंट मीडियाचा गाभा ध्येय, पेशा, व्यवसाय असा बदलत गेला आहे. पण हे बदल प्रिंट मीडियाने स्वत: केलेले नाहीत. काळ बदलला, परिस्थिती बदलली, समस्या बदलल्या आणि उत्तरेही! म्हणजे बाह्य बदलांमुळे पत्रकारितेच्या मूल्यव्यवस्थेचा गाभा बदलत गेला आहे आणि आता तो तिसऱ्या अवस्थेत आहे. आजही ध्येय किंवा पेशा म्हणून पत्रकारिता कोणी करत असेल तर ते निश्चितच कौतुकास्पद आहे, पण त्यांची पत्रकारिता यशस्वी आहे का, समाजपरिवर्तनाला हातभार लावते का, हा विचार कठोरपणे केला पाहिजे. परिवर्तनाला हातभार लावत नसेल तर दिव्य वारसा सांगत राहून निष्प्रभ अवस्थेत पत्रकारिता करण्याला विशेष अर्थ नाही. आज प्रिंट मीडियाचा गाभा व्यावसायिकता हा आहे. पण व्यावसायिकता या शब्दाचा पारंपरिक अर्थ बाजूला केला पाहिजे. प्रोफेशनल नसणे हा आजच्या काळात अवगुण आहे, एवढेच नाही तर ते कोणाच्याच फायद्याचे नाही, ना समाजाच्या, ना प्रिंट मीडियाच्या! माझा स्वाभाविक कल ध्येय व पेशा याकडे आहे, पण तरीही वाटतं, आजच्या काळात व्यावसायिक पत्रकारिताच अधिक प्रभावी ठरू शकेल. माझी व्यक्तिगत आवड साप्ताहिक, मासिके, नियतकालिके आहे, पण तरीही वाटतं- दैनिक वृत्तपत्रेच अधिक परिणामकारक ठरू शकतील. कारण नियतकालिके ही 'क्लास'साठी तर वृत्तपत्रे ही 'मास'साठी चालवली जावीत ही या काळाची मागणी आहे... अर्थात, मागणी तसा पुरवठा हे बाजारवादाचे तत्त्व असते तर विश्वासार्ह व दर्जेदार उत्पादन, सुलभ व जलद वितरण आणि तरीही किंमत कमी हे व्यावसायिकतेचे सूत्र असते. याचे भान ठेवणाऱ्या प्रिंट मीडियाला, त्यांच्या 'दर्पण' व 'दिग्दर्शन' या भूमिकेला आणि अर्थातच सामाजिक परिवर्तनाला आताचा काळ पूर्वीपेक्षा जास्त अनुकूल आहे. ('युजीसी'च्या उपक्रमाअंतर्गत, पुणे येथील एस. पी. कॉलेजने 'समाजपरिवर्तनात माध्यमांची भूमिका' या विषयावर एकदिवसीय चर्चासत्र २८ ऑगस्ट रोजी आयोजित केले होते. त्या चर्चासत्रातील तिसऱ्या सत्रात 'समाजपरिवर्तनात प्रिंट मीडियाची भूमिका' या विषयावर केलेले भाषण.)

– **विनोद शिरसाठ**

'जीवनावर प्रेम करा...'

आपल्या मुलाने काश्मीरमध्ये जाऊन काम करण्याचा निर्णय जेव्हा घरी सांगितला तेव्हा काळजावर दगड ठेवून मुलाची इच्छा पूर्ण करण्यासाठी वडिलांनी फंडातील दहा हजार रुपये आपल्या मुलाला दिले, ही आठवण सांगताना चौतीस वर्षीय उमदा कार्यकर्ता अधिक कदमचे डोळे पाणावतात....काश्मीरमधील बॉर्डरलेस वर्ल्ड फ ाऊंडेशनचा संचालक अधिक यांच्याशी संवाद साधला असता अलवारपणे उलघडला हा प्रवास आणि आठवणींचे विविध पदर...

– संभाजी गंडमाळे

अधिक कदम

खरेतर, काश्मीर धुमसत असतानाही तू हे धाडस कसं केलं

अधिक : पुण्यातील मध्यमवर्गीय कुटुंबातील मी एक साधा मुलगा. कॉलेजला असताना वयाच्या एकोणीसाव्या वर्षी घटनेच्या कलम ३७० च्या अभ्यासासाठी काश्मिरात गेलो. काश्मीरला मिळालेल्या विशेष दर्जाचा विचार करताना, कलम ३७० मुळे काश्मिरी लोकांचे सांस्कृतिक स्वातंत्र्य अबाधित राहत असले, तरी त्यांचा आर्थिक विकास होऊ शकत नाही. परिणामी, असंख्य अनाथ मुलींचे भविष्य धोक्यात, असुरक्षित असल्याचे यावेळी अगदी प्रकर्षाने जाणवले. इथेच मनात एक माणुसकीची ठिणगी पेटली आणि सुरू झाला हा सारा प्रवास.

तुमच्या कामाचं स्वरूप कसं आहे

अधिक : धुमसत्या काश्मीरमध्ये फिरून दहशतवादी हल्ल्यांत पोरक्या झालेल्या लहान मुलींचा मी शोध घेतो. त्यांना सांभाळतो. कुपवाडा, बडगाम, अनंतनाग आणि जम्मू या चार जिल्ह्यांच्या ठिकाणी चार हक्काची घरे मी उभी केली आहेत. या घरांत १५७ मुलींचा मी सांभाळ करतो. कुणाचे आई-वडील दहशतवादी हल्ल्यात गेले, तर कुणाचे वडील अतिरेकी बनले. अनेक गावांना 'विडो व्हिलेज' म्हणजे विधवांचे गाव म्हटले जाते. यात विशेषतः मुलीचं जगणं सर्वार्थाने संपून जातं. अशा मुलींसाठी विशेषतः हक्काचं घर मिळावं, यासाठीच हा सारा अट्टहास होता आणि आहे. 'बॉर्डरलेस वर्ल्ड फाउंडेशन' ही संस्था स्थापन करून कुपवाडात २००२ मध्येच सात मुलींचं घर सुरू केलं. आज तिथं साठहून अधिक मुली आहेत. पुढचा पल्ला गाठताना २००६ मध्ये बडगाम व अनंतनाग जिल्ह्यात घरे सुरू केली. या घरांना 'बसेरा-ए-तबस्सुम' म्हणजेच 'खुशियों का घर' असं नाव दिलं. आता जम्मूत पंडित मुलींसाठी चौथं घर सुरू केलं आहे. त्याला 'फाह' नाव दिलंय. १८-२० महिन्याच्या मुलींपासून अठरा वर्षाच्या मुलींपर्यंत सर्व वयोगटातील सुमारे एकशे साठ मुली तिथं राहतात.

मुस्लिमबहुल प्रदेश आणि हिंदू तरुण इथे काम करतो आहे, याचा तुम्हाला कितपत त्रास झाला

अधिक : मुळात काम सुरू करताना मी स्थानिक लोकांशी सतत चर्चा करीत राहायचो. त्यांना विश्वासात घेऊनच पुढचे पाऊल टाकायचो. तरीही तब्बल एकोणीस वेळा दहशतवाद्यांच्या चक्रव्यूहात सापडलो. त्या वेळी त्यांनी मला गोळ्या झाडून मारण्याचा विचारही केला. मात्र, 'तू तर अनाथ-निराधार मुलींचा सांभाळ करतो. तुला मारले तर अल्लाह आम्हाला माफ करणार नाही,' असे उद्‌गार आपण ज्यांची काळीजं दगडाची बनलीयत असं म्हणतो ते दहशतवादीच असे म्हटले तर...! नेमकं माझ्या बाबतीत हेच घडलं...माझा पुन्हा पुन्हा नवा जन्म होत होता आणि जसे दिवस सरत होते, तसे काश्मीरमधील अनाथ-निराधार मुलींच्या पुनर्वसनाचं काम अधिक गती घेत होतं.

आजची परिस्थिती काय आहे

अधिक : इथे कुणाचे आई-वडील दहशतवादी हल्ल्यात गेलेत तर कुणाचे वडील अतिरेकी बनलेत. इथल्या अनेक गावांना 'विडो व्हिलेज' म्हणून म्हणजेच 'विधवांचे गाव' म्हणून ओळखलं जातं. अशा पार्श्वभूमीवर विशेषतः मुलींना जगणं अधिक भयावह ठरतं. म ात्र, 'बसेरा- ए- तबस्सुम' मुळे त्यांना आता आधार मिळालाय. या मुली शिकताहेत. त्यांना शिकून खूप मोठ्ठं व्हायचयं. कुणाला पोलिस,

‘तू तर अनाथ-निराधार मुलींचा सांभाळ करतो. तुला मारले तर अल्लाह आम्हाला माफ करणार नाही,’ असे उद्‌गार आपण ज्यांची काळीजं दगडाची बनलीयत असं म्हणतो ते दहशतवादीच असे म्हटले तर...! नेमकं माझ्या बाबतीत हेच घडलं...माझा पुन्हा पुन्हा नवा जन्म होत होता आणि जसे दिवस सरत होते, तसे काश्मीरमधील अनाथ-निराधार मुलींच्या पुनर्वसनाचं काम अधिक गती घेत होतं.

कुणाला आयएएस तर कुणाला इंजिनिअर, वकील, डॉक्टर, संगणकतज्ज्ञ व्हायचंय. पण, शिकून बाहेर कुठे जाऊन नोकरी किंवा करिअरच्या मागे ही मंडळी अजिबात जाणारच नाहीत. आपल्या शिक्षणाचा उपयोग आपण ज्या भीषण वास्तवातून जातो आहे, त्या भूमीसाठी आणि तिथल्या भूमिपुत्रांसाठीच झाला पाहिजे, असा विचार मी त्यांच्यावर बिंबवलाय. मला तर आता मरणाचीच भीती राहिली नाही. त्यामुळे बंदुकीचीही. कारण माझा आजवरचा जो काही प्रवास आहे, तो ‘स्पिरिच्युअल’ आहे..!

तुझं म्हणून काही तरी एक तत्त्वज्ञान असेलच ना अधिक : शिवज्ञानाने जीवनाची सेवा करा व जीवनावर प्रेम करा. कारण जीवनाचे अस्तित्व प्रेमात आहे. कुठल्याही प्रसंगात तुम्हाला काहीही कमी पडले तरी चालेल; परंतु विश्वास व प्रेम कमी पडू देऊ नका. साऱ्या विश्वावर प्रेम करा.

आजच्या जमान्याचा "से"

'से' नावाचा बँड मराठीत सध्या जोरात गाजतोय .. ' ब्रेक अप के बाद' के त्यांचं गाणे तर प्रत्येक तरुणाईच्या ओठी आहे .. प्रत्येक तरुणाला या से बद्दल जाणून घ्यायचं आहे . म्हणूनच या से मधल्या 'एस'ची म्हणजे समीर सप्तीस्कर ची त्यांच्या गाण्यांप्रमाणेच रोखठोख मुलाखत घेतली आहे ती ऋचा करकरेने ..

से ची काही गाणी

- ब्रेक अप के बाद
- अँटी स्मोकिंग - सिगी
- रोमिओ
- स्कूल
- मॉडर्न भजन
- काले धंदे
- गच्चीवरून

मारून G बूच रे कोणी हा प्लान आखला
कॉमन man च्या wealth चा गेम करून टाकला
आपली चिल्लर, त्यांचे बंदे
अपने आदर्श निकले गंदे
काळे धंदे

आमच्या ग्रुपमध्ये आम्ही 'काळे धंदे' हा शब्द सारखा वापरायचो. तो इतका डोक्यात बसला होता की मग आम्ही तो गाण्यात वापरायचा ठरवलं आणि मग हे गाणं बनलं. समीर सप्तीस्कर सांगत होता.

दोन विज्ञान शाखेचे पदवीधर आणि एक अभियंता यूथ फेस्टिवल च्या निमित्ताने एकत्र आले आणि गंमत म्हणून बनवलेल्या एका गाण्याने त्या तिघांच्या वाटा संगीताच्या दिशेने वळवल्या. समीर सप्तीस्कर, अभिषेक खणकर आणि सचिन पाठक (Yo) यांच्या नावाच्या पहिल्या अक्षरांनी मिळून तयार झालेला SAY band अगदी कमी वेळात तरुणींच्या फेव्हरेट लिस्टवर जाऊन पोहोचला. आणि याचा कारण म्हणजे त्याचं पहिलेच गाणे ब्रेकअप के बाद . हिंदी - मराठी मिश्र असे बोल, ब्रेक अपसारखा तरुणांचा वीक पॉईंट आणि हलकीफुलकी पण भावणारी चाल ही भट्टीच जमून आली. या band च्या आणि गाण्यांच्या जन्म कथेबद्दल जाणून घेण्यासाठी त्यांचा संगीतकार समीर याची घेतलेली ही मुलाखत .

मी : नेहमीचा प्रश्न सुरुवात कशी, कुठे आणि कधी झाली

समीर : दोन वर्षांपूर्वी रुईया कॉलेजमध्ये यूथ फेस्टिव्हलदरम्यान आम्ही तिघे एकत्र आलो. म्हणजे एक एकांकिका करत होतो. त्यासाठी संगीत लागणार होतं .. त्या निमित्ताने एकत्र काम करू लागलो तेव्हा असंच एकदा कंटाळा जाण्यासाठी आम्ही एक गाणं बनवले. अगदी आमच्याच मित्रांची नावं घालून आणि ते सहज रेकॉर्ड केल. मित्रांना खूप आवडलं आणि हळूहळू इतरांनाही आवडू लागलं. मग कुठेतरी जाणवलं की अरे यार, हे तर खरंच चांगल झालंय. हे आमचं पहिलं गाण ..एकत्र ... त्याच्या नंतर काही दिवसांनी मला एक चाल सुचली आणि एक ओळ, ती मी YO ला ऐकवली 'ब्रेकअप के बाद' ... तो म्हणाला अरे पण हे तर हिंदी आहे , मला नाही जमणार हिंदी लिहायला. मी म्हणालो हरकत नाही, मराठीत लिही. बाकीचं गाणं आणि असा करत ते गाणं तयार झालं. थोड्याच दिवसांत मोबाईल टू मोबाईल अस करत ते इतका फेमस झालं की शेवटी आम्ही त्याचा video बनवायचा ठरवला. अनिकेत विश्वासराव आमच्या मित्रपरिवारातला तो व्हिडिओसाठी काम करायला तयार झाला. आता फक्त व्हिडिओच नको तर पूर्ण अल्बमही बनवायचा ठरवला. मग एका आठवड्यात गाणी बनवली (बाप रे!!!) आणि अल्बम शूट केला. video palace या कंपनीने आमच्याकडून पैशाची अपेक्षा न ठेवता आमचा अल्बम बनवून दिला .

मी : जन्मकथा तर इंटरेस्टिंग आहे. पण त्या पहिल्या गाण्याबद्दल सांग नं. ते का नाही घेतलं अल्बममध्ये

समीर : त्याचा विषय होता बेवडे (हो हाच शब्द) मित्र प्यायला बसल्यापासून त्यांना दारू चढेपर्यंतच्या गमतीजमती. पण

त्यात नावं आमच्या मित्रांची होती न.....

मी : बरं. मला सांग, तुमचं गाणं कसं बनतं त्याचा विषय, शब्द, संगीत कसं ठरवता

समीर : खरंतर आम्ही काहीच ठरवत नाही. जसं सुचेल तसं बनवत जातो. यो काही प्रोफेशनल रायटर नाही त्यामुळे मी आधी चाल करतो मग विषयाची साधारण संकल्पना त्याला सांगतो. मग आम्ही तिघे त्यावर चर्चा करतो आणि मग फायनल शब्द लिहितो. पण चाल असो की शब्द, आम्ही तिघे एकत्र बसून बनवतो. विषयांचं म्हणशील तर जो सुचेल तो विषय, पण शक्यतो आजूबाजूला घडणाऱ्या घटनांवरून लिहितो.त्यामुळे आमची गाणी लोक त्यांच्या आयुष्याशी कनेक्ट करू शकतात.

मी : गीतकार नाही असा म्हणालास. मग नक्की तुमची प्रोफेशन्स काय आहेत तुमच्या तिघांबद्दल सांग.

समीर : तिघांपैकी प्रोफेशन म्हणून म्युझिक करणारा मी एकटाच. मी संगीतकार म्हणून काम करतो, XM झकास साठी. अभिषेक sound engineer आहे आणि YO दिग्दर्शक. तो डोंबिवली फास्ट, मुंबई मेरी जान आणि चिल्लर पार्टीचा असिस्टंट डायरेक्टर होता. SAY मध्ये मी संगीतकार, गीतकार आणि अभिषेक आणि मी आलटून पालटून गायक असतो.

मी : तुमचे लाइव शोज होतात का त्यांच्याबद्दल सांग ना.

समीर : नाही. सध्याच परळला एक शो केला आणि गेल्या वर्षी झी मराठी वर केला होता. पण कसं आहे, आमची गाणी बऱ्याचदा मिक्सिंगवाली असतात त्यामुळे आम्ही शक्यतो अल्बम किवा चित्रपटातून ती रिलीज करणं प्रेफर करतो. शिवाय लाइव शो म्हटला की खर्चाचा प्रश्न येतो. बऱ्याचदा ज्या ऑफर येतात त्या फार कमी बजेटच्या असतात. एकदा तर आम्ही सांगितलं की आम्ही तिघे अर्धा तास शो करू. त्याचे इतके इतके चार्जेस पडतील, तर आयोजक म्हणाले, हे जास्त होतायत. तुम्ही असं करा एकालाच पाठवा. आता बोला!

मी : मग अशी जर अवस्था आहे , तर मराठीत बँड कल्चर रुजेल अस वाटतं का ?

समीर : मला नाही वाटत. कारण आपल्याकडे संगीत संगीतकार देतात. बँड चित्रपट संगीत करत नाहीत. शिवाय पैसे व इतर कारणानी लाईव्ह शोजही होत नाहीत. त्यामुळे हे कल्चर ॲज सच रुळेल असं वाटत नाही. हे म्हणताना विरोधाभास असा की आश्चर्य म्हणजे चित्रपटाच्या ऑफर आल्या आहेत काही. काही खास ऑफर्स तर आमच्या गच्ची नावाच्या गाण्यासाठी आहेत. पण आम्ही अजून काही ठरवला नाही. बघू काय होते ते. कदाचित माझे मत चुकूही शकेल.

मी : गच्ची! मी विचारणार होते याबद्दल. या गाण्याला जुन्या प्रसिद्ध 'पंछी बनू उडती फिरू' गाण्याची चाल आहे न?

समीर : हो, आणि हे आम्हालाही माहीत आहे. आम्हाला बऱ्याचदा लोक म्हणतात आम्ही चाल चोरली किंवा आम्हाला माहीत नसेल पण या चालीचं गाणं आहे म्हणून. तसं नाहीये. आम्हाला माहीत आहे ही गोष्ट. आमच्या भागात या चालीचा एक गाण प्रचलित आहे .पण त्याचे शब्द चारचौघांत बोलण्यासारखे नाहीत. म्हणून आम्ही फक्त ती चाल आणि गच्ची हा शब्द घेतला आणि नवीन गाणं लिहिलं.

मी : तुमची प्रत्येक गाणी वेगळी आहेत. जसं ते 'ऑल' गाणं नेहमीच्या षैीरीं ध्ये नाही. मग त्यांना गाणी म्हणायचा का

समीर : ते एका नाटकाच्या promotion साठी केलं होतं. पण ते नाटक आलंच नाही.

मी : modern भजन हा एक वेगळा प्रकार होता. झी मराठीवर ते गाणं सगळ्यांनी पाहिलं. ती कल्पना कोणाची

समीर : मी एक ओळ सुचवली, हरे कृष्ण हरे राम आणि मग अभिषेक म्हणाला की अभंगांच्या ओळी वापरू.

मी : भीती नाही वाटली की लोक विरोध करतील भावना दुखावतील

समीर : नाही. कारण आम्ही दुरुपयोग करत नव्हतो उलट सामाजिक प्रश्न मांडत होतो

मी : कोणी विरोध केला का अशी एखादी घटना

समीर : नाही. आवडला लोकांना.

मी : रोमिओची कल्पना कोणाची की खरच असा एखादा मित्र होता

समीर : नाही नाही. नव्हता. आम्हाला असं गाणं करायचं होतं ज्यात अशी सगळी वाक्यं असतील, जी मुली नेहमी नकार देताना वापरतात.

मी : पहिल्या अल्बममध्ये एक गाणं आहे. रपींळीज्ञळपस नावच. त्याबद्दल सांग. म्हणजे असं सोशल अवेअरनेसचं गाणं कसा काय बनवलं

समीर : खरंतर असं काही बनवायचं नव्हतं. झालं काय की आमच्या ओळखीचे एक गृहस्थ होते. ते सिगारेट ओढायचे आणि त्याबद्दल विचारलं तर म्हणायचे 'cancer को तो मैं अपने लंग पे मारता हूं ' हे ऐकलं आणि म्हटलं अरे ही ओळ तर इंटरेस्टिंग आहे, वापरूया कुठेतरी. आणि अर्थातच सिगारेट वाईट असते हे सांगायचं होतं म्हणून आम्ही गाण्याच्या शेवटी तो मुलगा मारतो अस दाखवलं आणि त्याचा मित्र म्हणतो 'cancer ने तो इस के लंग की मार दी...'

मी : पुन्हा कधी असं सोशल काही करायचं

समीर : काळे धंदे थोडंसं त्याच प्रकारचे आहेत. तशी खूप गाणी नाही करायची. लोकांना कंटाळवाणे करू नये. त्यांना एन्टरटेन्मेन्ट हवी असते. म्हणून माही तशी गाणी बनवतो आणि एखादच असं. जेणेकरून लोक तेही ऐकतील आणि हेही.

मी : आता एक मोठा आणि महत्त्वाचा प्रश्न. थोडासा वैयक्तिक .. band बनवणार हे सांगितल्यावर आई-बाबांची reaction काय होती

समीर : 'काय करणार आहेत ही पोरं कोणास ठाऊक' पण बरोबरच होता, मध्यमवर्गीय कुटुंबात मुलाने शिक्षण घेऊन नोकरी

करावी हीच अपेक्षा असते. त्यात मी तर इंजिनिअर (काय इंजिनिअरिंगनंतर म्युझिक) त्यामुळे आईची इच्छा होती की मी चांगल्या कंपनीमध्ये नोकरी करावी. हे band वगैरे म्हटल्यावर त्यांच्या मनात शंकाच होती पण पहिला अल्बम हिट झाल्यावर जेव्हा लोक येऊन विचारायचे की तो तुमचा मुलगा ना तेव्हा त्यांची खात्री पटली.

मी : तुम्ही तिघे या लरपव चा career option म्हणून विचार करता का

सामी : सध्या तरी नाही. बघू, ते सगळा प्रसिद्धी किती मिळतेय त्या वर अवलंबून आहे.

मी : गाणी moblie to mobile पसरतात, मग पैसा मिळत नाही. त्याचं काय? असं चालतं?

सामी : चालवून घेतो. काय करणार, लोकांना सगळा फुकट हवं. आम्ही प्रत्येकाला जाऊन रिक्वेस्ट करू शकत नाही की प्लीज लव विकत घ्या.

मी : तुमच्या ह्या प्रवासात मीडियाचा रोल काय

समीर : फार काही नाही. सुरुवातीला महाराष्ट्र टाईम्स आणि स्टार माझा ने मदत केली. थोड्या मुलाखती घेतल्या. तितकाच.

मी : आधी तुम्ही साधी कॉलेजला जाणारी मुलं होता आणि आता सेलेब्रिटी. त्याने काही फरक पडला का रोजच्या आयुष्यात

समीर : मुळीच नाही. कारण लोक आम्हाला चेहऱ्याने ओळखत नाहीत

मी : बरं, तुझा वैयक्तिक आवडता गायक संगीतकार band

समीर : hazz zimmer आणि भारतीय संगीतकार रेहमान आणि अमित त्रिवेदी. गायकांमध्ये हरिहरन adele पण. पण मी जास्त करून ऑर्केस्ट्रल गाणी ऐकतो.

मी : म्हणजे तुला शब्दांपेक्षा धून जास्त आवडते. म्युझिक आवडतं.

समीर : हो. शब्द माणूस बनवतो आणि लिहितो, म्युझिक हे देवाने बनवलाय. music is made by god

...आता पुढे काय नवीन गाणी अल्बम

समीर : आमचा नवीन अल्बम येतोय. नोव्हेंबरच्या शेवटी येईल. काम पूर्ण होत आलंय.

मी : वा! काय नाव आहे अल्बमचं आणि कशा प्रकारची गाणी आहेत

समीर : अल्बमचं नाव आहे 'पाऊस छत्री आणि ती' अर्थात एक गाणं पावसाच आहे. काळेधंदे पण असेल त्यात. आणि एक कव्वाली आहे, सामान नावाची.

मी : सामान म्हणजे नक्की काय आहे त्यात

समीर : मुंबईच्या भाषेत सामान म्हणजे अत्यंत सुंदर मुलगी. जी कॉलेजच्या वर्षात कोणालाही पटत नाही, पण प्रत्येकाच्या मनात धुमाकूळ घालते ती. तिच्याबद्दल आहे ते गाणं .

मी : चला, म्हणजे समस्त मुलांकडे या अल्बम ची वाट पाहण्यासाठी एक भक्कम कारण आहे!

समीर : मुलींकडे पण आहे. या अल्बममध्ये आम्ही एक female oriented गाण केला आहे. आम्हाला एक feedback आला होता की माही females च्या भावनांबद्दल काही लिहित नाही. (काय करणार आम्ही तिघेही female नाही ना) म्हणून या वेळी म्हटलं त्यांच्या साठी काहीतरी लिहू. ते गाण म्हणजे ड्रीम डेट.

मी : अरे वा! म्हणजे हा दुसरा अल्बम पण पहिल्यासारखा इंटरेस्टिंग असणार आहे.

समीर : आम्ही तसा प्रयत्न केलाय हे नक्की. या वेळी खरंच अवघड होतं. कारण आता लोकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. बघू काय होतंय. सगळं भविष्य तुमच्या हातात.

मी : आम्हाला नक्की आवडेल. आणि या अल्बमसाठी शुभेच्छा !!!

जावे ''टेकफेस्ट'' च्या गावा

आयआयटी मुंबईचे टेकफेस्ट म्हणजे सगळ्यांच्याच कुतुहलाचा आणि चर्चेचा विषय ...गेल्या १६ वर्षाचा टेकफेस्टच्या प्रवासाची ही तुलना पण , नक्की कसं चालतं टेकफेस्टचं काम हे मात्र फारच थोड्या जणांना माहीत आहे .. त्याचीच माहिती देणारा हा रिपोर्ट .. स्वानुभव आणि टेकफेस्टचे को-ऑर्डिनेटर अनिश संखे आणि सुपर्ण घारपुरे यांच्या मुलाखतीतून क्षितिज देसाईने साकारलेला ...

अनिश संखे

सुपर्ण घारपुरे

विद्यार्थी लेक्चरला बसतच नाहीत हो, प्रॅक्टिकललाही दांडी मारत असतात. आपल्याकडल्या कुठल्याही कॉलेजमध्ये प्रोफेसरांच्या तोंडी असणारी कायमची तक्रार आणि मग मुलांनी बंक करू नये म्हणून राबवण्यात येणारे उपाय. ७५ टक्के हजेरी, डिफॉल्टर लिस्ट वगैरे वगैरे. सगळीकडे चित्र असताना कोणी सांगितलं, की असं एक ठिकाण आहे जिथे विद्यार्थी स्वत: हून आवडीने लेक्चरला जातात, तर प्रॅक्टिकल पाहण्यासाठी तासन् तास उभे राहतात ! नाही विश्वास बसत या मग टेकफेस्टला आणि खात्री करून घ्या.

आय.आय.टी.बी. अर्थात 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बॉम्बे'तर्फे भरणारा 'टेकफेस्ट' हा विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा खूप मोठा सोहळा. मोठा म्हणजे किती, तर 'एशियाज लार्जेस्ट सायन्स' कानाकोपऱ्यांतून इथे माणासं येतात. विद्यार्थी, शिक्षक अभियंते, शास्त्रज्ञ, उद्योजक अशी पुष्कळ माणसं. नवीन तंत्रज्ञानाची माहिती करून घ्यायला, आपलं संशोधन जगापुढे मांडायला आणि मुख्य म्हणजे तंत्रज्ञानाची मजा अनुभवायला दरवर्षी टेकफेस्टला मोठ्या संख्येने लोक भेट देत असतात. मागच्या वर्षी, म्हणजे 'टेकफेस्ट २०१२' ला भेट देणाऱ्यांची संख्या होती तब्बल ९२,००० च्याही वर !

एवढा मोठा इव्हेंट यशस्वीपणे पार पाडायचा म्हणजे अवघड काम खरं. आणि ही अवघड जबाबदारी पार पाडतात आयआयटीचेच विद्यार्थी. एमबीए किंवा इव्हेंट मॅनेजमेंट नाही तर इंजिनिअरिंगचे विद्यार्थी याचं व्यवस्थापन करतात.

'सगळी मुलं बी.टेकची असतात' सुपर्ण सांगतो. सुपर्ण घारपुरे आयआयटी बीचाच विद्यार्थी. गेल्या वर्षीच्या टेकफेस्टमध्ये त्याने वेब मॅनेजर म्हणून काम केलं आहे. एकूण मिळून एकवीस ते बावीस मॅनेजर असतात. त्यांचा एक ओव्हरऑल को-ऑर्डिनेटर असतो. ही झाली कोअर टीम. टेकफेस्टमध्ये काय काय असेल याची आखणी कोअर टीम करते. त्याची अंम लबजावणी करायला त्यांच्या मदतीला फर्स्ट आणि सेकंड इयरची सुमारे आठशे मुलं असतात. एखाद्या लेक्चरचा विषय निवडण्यापासून ते स्पॉन्सर शोधण्यापर्यंत सगळी काम विद्यार्थीच करतात.

आपल्यासमोर हा इव्हेंट तीन दिवसांचा दिसत असला तरी त्यामागे बरीच मोठी मेहनत असते. जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात हा टेकफेस्ट पार पडतो. त्यानंतर पुढच्या टेकफेस्टची तयारी सुरू होते फेब्रुवारीतच. या वर्षीचे मॅनेजर पुढच्या वर्षीच्या मॅनेजर्सची निवड करतात. त्यासाठी मुलाखत प्रक्रिया असते. विद्यार्थ्यांच्या क्षमता, अनुभव या मुलाखतीत तपासले जातात आणि थर्ड इयरमधल्या एकवीस ते बावीस जणांच्या मेंबरची निवड केली जाते. हे सर्वजण मॅनेजर म्हणून काम करतात. टेकफेस्टमध्ये मार्केटिंग, हॉस्पिटॅलिटी, लेक्चर्स असे विविध डिपार्टमेंट असतात. त्या प्रत्येक डिपार्टमेंटसाठी एक किंवा दोन मॅनेजर या बावीस जणांच्या टीममधून नेमले जातात. त्यांची नेमणूक करताना त्या क्षेत्रासंबंधी आवड आणि अनुभव विचारात घेतला जातो. म्हणजे एखाद्या विद्यार्थ्यांचा वृत्तपत्राशी चांगला संपर्क असेल तर त्याची नेमणूक मीडिया डिपार्टमेंटमध्ये होते. ती व्यक्ती शिकत असलेल्या ब्रँचचा त्यांच्या टेकफेस्टमधल्या डिपार्टमेंटशी संबंध असतोच असं नाही. सुपर्णचचं उदाहरण घेऊया. तो शिकत आहे केमिकल शाखेत, पण त्याने जबाबदारी सांभाळली होती वेब मॅनेजरची. व्हॉलेंटियर म्हणून काम करणारे आठशे विद्यार्थीदेखील डिपार्टमेंटप्रमाणे विभागले जातात. त्यांचा एक ओव्हरऑल को-ऑर्डिनेटर ठरवला जातो. यावर्षीचा, म्हणजे टेकफेस्ट २०१३ चा को-ऑर्डिनेटर आहे अनिश संखे. अनिश 'मेटॅलर्जी ॲण्ड मटेरियल्स सायन्स'च्या शेवटच्या वर्षात शिकत आहे. तो देखील गेल्या वर्षी मॅनेजर होता. मागील वर्षीच्या मॅनेजर्समधून एकाची निवड ओव्हरऑल को-ऑर्डिनेटर म्हणून केली जाते.

ही निवडप्रकिया साधारण मार्चच्या शेवटी संपते. तेव्हापासून हे मॅनेजर कामाला लागतात. वेब मॅनेजरचं काम असतं टेकफेस्टची वेबसाईट बनवणं, ती कायम अद्ययावत ठेवणं. शिवाय टेकफेस्टसंबंधी इंटरनेटच्या ज्या गोष्टी असतील, उदाहरणार्थ ऑनलाईन फॉर्म बनवणं, सोशन नेटवर्कमध्ये हजेरी लावणं, ती सगळी कामं वेब डिपार्टमेंटच्या अखत्यारित येतात. मार्केटिंग डिपार्टमेंटची जबाबदारी म हत्त्वाची असते. कारण स्पॉन्सरशिप मिळवण्याचं काम त्याचं. महत्त्वाची एवढ्याचसाठी की, हा विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा एशियातला

सर्वात मोठा सोहळा पार पाडण्यासाठी जो खर्च येतो तो केवळ स्पॉन्सर्सकडूनच मिळवावा लागतो. टेकफेस्टसाठी आयआयटीकडून फंडाची तरतूद नसते. त्यामुळे मार्केटिंग मॅनेजरना व्यावसायिक पद्धतीने काम करावं लागतं. यासाठी सहा-सात महिने आधीपासून कंपन्यांशी बोलावं लागतं. अनिश म्हणतो, 'कोणत्याही कंपन्या स्पॉन्सरशिपसाठी लगेच तयार होत नाहीत. बराच काळ त्यांच्या संपर्कात राहावं लागतं. काही कंपन्या, ज्यांना नवीन प्रॉडक्ट बाजारात आणायचं असेल तर त्या स्पॉन्सरशिपसाठी तुलनेने लवकर तयार होता. त्यांना तरुणांसमोर प्रॉडक्टची ओळख द्यायला टेकफेस्टसारखं प्रभावी व्यासपीठ मिळतं.'

टेकफेस्टचं बजेटही स्पॉन्सरशिपवर अवलंबून असतं. मागच्या वर्षीच्या बजेटनुसार यावर्षीचं साधारण बजेट बनवलं जातं. पण अंतिम बजेट मिळालेल्या एकूण स्पॉन्सरशिपवरूनच ठरतं. स्पॉन्सरशिपसाठी विविध पर्याय कंपन्यासमोर ठेवले जातात. टायटल स्पॉन्सर, असोसिएट स्पॉन्सर, स्टॉल वगैरे. गेल्यावर्षी 'बिग कोला' या शीतपयाच्या कंपनीने टायटल स्पॉन्सरशिप स्वीकारली होती. यावेळच्या
टेकफेस्टची टायटल स्पॉन्सर आहे 'वेजिलंट नेट सोल्यूशन्स' ही कंपनी.

क्रिएटिव्हज् डिपार्टमेंटचं काम असतं की टेकफेस्टसाठीची सगळी डिझाईन्स बनवणं. म्हणजे पोस्टर्स, बॅनर, त्यावरची रंगसंगती निश्चित करणं आणि त्यात कायम सातत्य ठेवणं ही जबाबदारी क्रिएटिव्हज् डिपार्टमेंटची असते.
टेकफेस्टमध्ये लेक्चरसाठी आमंत्रित केलेले मान्यवर, स्पर्धा, वर्कशॉप यात सहभागी झालेले विद्यार्थी, प्रदर्शनात भाग घेतलेल्या देश-विदेशातल्या व्यक्ती यांना अटेंड करायचं काम दिलेलं असतं हॉस्पिटॅलिटी डिपार्टमेंटकडे. या डिपार्टमेंटवाल्यांना अचानक बदललेलं वेळापत्रकही हाताळावं लागतं. 'गेल्याच्या गेल्या वर्षीची गोष्ट आहे.' अनिशने आठवण सांगितली. एक पाहुणे लेक्चरसाठी यु.के.हून येणार होते. पण त्यांची तब्येत अचानक बिघडली आणि त्यांना विमान गाठता आलं नाही. त्यांच्या होणाऱ्या लेक्चरची माहिती तर आधीपासून लोकांकडे गेली होती, मग त्यांचंच लेक्चर रद्द झाल्याची ताबडतोब फ्लॅश पब्लिसिटी करावी लागली.
याबरोबर इतर डिपार्टमेंटची काम इव्हेंटनुसार असतात. म्हणजे लेक्चर्स, प्रदर्शनं, स्पर्धा, टेक्नोहोलिक्स, ओझोन इत्यादी. या प्रत्येक इव्हेंटसाठी एक डिपार्टमेंट असतं.

लेक्चर्स आणि प्रदर्शन हे टेकफेस्टचं खास वैशिष्ट्य. अगदी पहिल्या वर्षापासून याचा समावेश टेकफेस्टमध्ये आहे. इथे लेक्चर द्यायला संबंधित क्षेत्रातले मान्यवरच नव्हे, तर त्या क्षेत्राचे प्रत्यक्ष जनकही येतात. ही यादीच पहा की, नोबेल पारितोषिक विजेते डॉ. जॉन नॅश, डॉ. वेंकटरमण, रामकृष्णन, एमपीथ्रीचे सहनिर्माते डॉ. ब्रेडनबर्ग, विकीपीडियाचा निर्माता जिमी वेल्स, गूगल अर्थचे निर्माते मायकल जोन्स, भारताचे माजी राष्ट्रपती 'मिसाईल मॅन' डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यासारख्या मान्यवरांचे व्याख्यान ऐकण्याची संधी कोण सोडणार आहे

नुकतंच टेकफेस्ट २०१३ चाच एक भाग म्हणून गेस्ट लेक्चर्स झाले. एमआयटी मिडिया लॅबचे प्रोफेसर रमेश रासकर यांच 'फ्युचर ऑफ इमेजिंग' या विषयावर १५ ऑक्टोबर २०१२ ला लेकचर झालं. रमेश रासकर म्हणजे तेच ज्यांनी 'प्रोजेक्ट आय-नेत्र' तर्फे डोळ्यांची तपासणी करणारं जगातलं सगळ्यात स्वस्त उपकरणाची निर्मिती केली आहे. २ नोव्हेंबर ला 'ईए स्पोर्टस्'चा जनक ट्रिप हॉकीन्सचंही लेक्चर झालं. 'व्हॉटस् नेक्स्ट विथ गेम' असा त्यांचा विषय होता.

इथे भरणारं प्रदर्शन मोठ्या मैदानात वातानुकूलित मंडपात असतं. जगभरातले वैज्ञानिक, संशोधक आणि विद्यार्थी इथे आपलं संशोधन किंवा प्रकल्प मांडतात. विश्वास बसणार नाही पण ही प्रदर्शनं पाहण्यासाठी लोक मंडपाबाहेर उन्हात तासन् तास रांगेत उभे असतात. भविष्यकालीन तंत्रज्ञानाची चुणूक या प्रदर्शनामधून दिसते. तसंच इतिहासाविषयी संशोधनही पाहायला मिळतं. गेल्या वर्षी 'लिओनार्डो दा विन्सी' ने रचलेलया मशीन्सची चाचणी एका स्टॉलवर पहायला मिळाली त्यासाठी त्यांनी दा विन्सीने कित्येक वर्षांपूर्वी काढलेल्या मशीनची आकृत्यावरून नवीन मशीन बनवली होती. याचबरोबर ह्युमनॉईड रोबो हाही प्रदर्शनामधला प्रसिध्द विषय होता. निरंजन घाटेंच्या चाहत्यांना इथले रोबो पाहून आपण त्यांच्या आवडत्या भारत यंत्रमानव निर्माण समूहमध्ये आलोय असचं वाटेल.

टेकफेस्टमध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या स्पर्धा हा सगळ्या कॉलेजविद्यार्थ्यांचा आवडता भाग. दृष्टिकोन समोर ठेवून यात खेळ आखलेले असतात. नवीन नवीन इनोव्हेटिव्ह आणि क्रिएटिव्ह उपकरणं वापरायला मिळाल्याने स्पर्धकही खूश असतात. मला पण यातल्या एका धमाल खेळाचा अनुभव घेता आला. तो होता 'व्हच्युस्फिअर'.

सर्कसमध्ये मोटारसायकलवाले ज्या घनगोळ्यात थराराक खेळ करतात तसा धातूचा घनगोळा होता, पण आकाराने लहान. एक माणूस मावू शकेल एवढा. त्यात जाऊन व्हिडिओ गेम खेळायचा होता. डोक्यावर एक हेल्मेट घालायचं आणि हातात पिस्तूल. त्या हेल्मेटमध्ये स्पीकर आणि स्क्रीन बसवलेले होते. असं वाटायचं जणू आपण त्या गेममध्ये शिरलो आहोत. त्यातले एलियन आजूबाजूला वावरत आहे असं वाटायचं. त्यांनी आपल्यावर हल्ला करण्याआधी आपण त्याचा खातमा करायचा. हो, हे असं गेममध्ये शिरणं भरपूर वेळा विज्ञानकथामध्ये वाचायला मिळतं, इथे ते खुरखुरे अस्तित्वात आलं होतं.

ओझोनमधला एक लोकप्रिय खेळ म्हणजे जंकयार्ड वॉर्स.

'रोबोवॉर' याही एक लोकप्रिय स्पर्धा. भरपूर कॉलेज दरवर्षी यात सहभागी होत असतात. स्वत: रोबो बनवायचा आणि दुसऱ्या स्पर्धक रोबोसोबत त्याचा संघर्ष अशी याची साधारण आखणी असते. रोबोटिक्सचे विषय तसेही तरुणाईचे आवडते असतात, त्यात अशी धमाल स्पर्धा म्हटली की पर्वणीच. याच वर्षी रिलीज झालेल्या 'रिअल स्टील' चित्रपटावरून मला सर्वप्रथम आठवण आली या रोबोवॉरचीच.

'टेक्नोहोलिक्स' हा टेकफेस्टमधला सर्वाधिक गर्दी खेचणारा इव्हेंट. 'व्हेअर टेक्नॉलॉजी मीटस् एंटरमेंण्ट' ब्रीदवाक्याचा इथे प्रत्यय येतो. टेक्नोहोलिक्सचे कार्यक्रम मोठ्या स्टेजवर, संध्याकाळच्या सत्रात होतात. संध्याकाळच्या सत्रातले इंटरेस्टिंग कार्यक्रम तेच असतात. मागच्या वर्षी जर्मनीच्या कलाकारांनी सादर केलेला 'लाईटफॅक्टर' हा नेत्रदीपक कार्यक्रम प्रसिद्ध झाला होता. तसंच पॉप बिउ या 'बबल परफॉर्मन्स'ची देखील चर्चा झाली होती.

दरवर्षी हाती घेण्यात येणारी सोशल कॉज हेही टेकफेस्टचं ठळक वैशिष्ट्य मानता येईल. मागच्या वर्षी भारत आणि पाकिस्तानमधल्या विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक जाणिवा रुंदावण्यासाठी 'उम्मीद - ए - मिलाप' हे डायरी कॅम्पेन हाती घेतलं होतं. 'या वर्षी आम्ही दोन कॅम्पेन राबवत आहोत' अनिश सांगतो. पहिलं कॅम्पेन आहे 'गिव्ह अ कॉईन'. गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या खर्चाकरिता हा उपक्रम आम्ही पार पाडला. सगळेच जण काही अशा मुलांना दत्तक घेऊ शकत नाहीत, पण त्यांच्यासाठी काहीतरी करायची इच्छा मात्र सगळयांच्या मनात असते. याचाच विचार करून हे कॅम्पेन आम्ही हाती घेतलं. सुमारे ४२ कॉलेजांमधून या उपक्रमाला प्रतिसाद मिळाला. या कॉलेजमध्ये कॉईनबॉक्स लावले गेले, आणि त्यात प्रत्येकाने केवळ एक रुपया टाकण्याचं आवाहन केलं. जमा झालेल्या रकमेचा उपयोग करून 'प्रथम कौन्सिल फॉर व्हल्नेरेबल चिल्ड्रन' ही संस्था मुलांना दत्तक घेऊन त्यांच्या शिक्षणाची तरतूद करेल. म्हणजे तुमच्या वतीने ही संस्था दत्तक घेईल.'

'दुसरं कॅम्पेन आम्ही राबवतोय ते कॉलेज विद्यार्थ्यामध्ये पर्यावरण जागृती निर्माण करण्यासाठी.' 'टेकफेस्ट ग्रीन कॅम्पस चॅलेंज' असं याचं नाव आहे. यात साधारण शंभर कॉलेज सहभागी झालेले आहेत. ही एक स्पर्धा आहे. यात पर्यावरण संवर्धनासाठी वेगवेगळे अनेक टास्क दिलेले आहेत. हे टास्क ११ कार्यक्षेत्रात विभागले आहेत. उदा. ऊर्जा, पाणी, अन्न वगैरे. प्रत्येक टास्कला काही गुण नेमून दिले आहेत. तो टास्क तुमच्या कॉलेजने पूर्ण केला की तेवढे गुण तुम्हाला. ज्या कॉलेजचे सर्वाधिक गुण जमतील त्या कॉलेजला अर्थातच विजेता म्हणून घोषित केलं जाईल. इंटर कॉलेज स्पर्धेचं स्वरूप दिल्यानं याचा प्रभाव जास्त पडतो. सहभागी स्पर्धकांचा उत्साह वाढतो. आपल्या कॉलेजसाठी म्हणून ते झटून काम करतात. तेवढा परिणाम नेहमीच्या पॅसिव्ह कॅम्पेनमध्ये दिसून येत नाही.'

ग्रीन कॅम्पस चॅलेंज चांगलचं रंगतंय. दिवसेंदिवस प्रत्येक कॉलेजच्या गुणामध्ये भर पडत चालली आहे आणि वेबसाईट वरचे स्कोअरबोर्ड सारखे अपडेट होतायत.

'आधी एवढी तयारी करूनही इव्हेंटचे दिवसही धावपळीत जातात. सगळयात जास्त तणाव याच दिवशी असतो. मॅनेजर्सचे फोन तर चोवीस तास वाजत असतात. मात्र एक एक इव्हेंट पार पडतो तसं एवढ्या मेहनतीचं सार्थक झाल्याचं समाधानही मिळतं.' अनिश सांगतो.

टेकफेस्टची सुरुवात झाली १९९८ साली. भारतीय विद्यार्थ्यांना विज्ञान आणि तंत्रज्ञानातलं नवं संशोधन, प्रयोग मांडायला व्यासपीठ मिळावं या संकल्पनेनं याची सुरुवात झाली. स्पर्धा, लेक्चर्स, वर्कशॉप्स आणि प्रदर्शन असं त्याचं स्वरूप होतं. या इव्हेंटसाठी त्यांनी ब्रीदवाक्य ठरवलं - 'टेक्नॉलॉजी इज फन'. पहिल्याच वर्षी विद्यार्थी, उद्योजक आणि इतरांनी मोठ्या संख्येने टेकफेस्टला भेट दिली. लोकांकडून मिळणारा सकारात्मक प्रतिसाद तेव्हापासून आजतागायत कायम आहे. इथे भेट देणाऱ्या आणि सहभागी होणाऱ्यांच्या संख्येत तर दरवर्षी भरच पडत चालली आहे.

एवढा यशस्वी प्रतिसाद मिळण्यामागचं श्रेय इथे भेट देणाऱ्या विद्यार्थ्यांनाही जातं. वारीला जावं तसं दरवर्षी नेमाने विद्यार्थी टेकफेस्टला येतात. टेकफेस्टच्या तारखा जाहीर झाल्या की मित्रासोबत चॅट आणि फोनाफोनी होते. तीन दिवसातला एखादा दिवस ठरवला जातो. त्या दिवशी सकाळ सकाळी मग हा मित्रांचा घोळका आयआयटी मेन गेटच्या बाहेर रांगते शिरतो. बाहेरच्या राज्यातून आणि अर्थात बाहेरच्या देशातून येणारे विद्यार्थी तर तीनही दिवस भेट देतातच, पण जवळपास राहणारी काही उत्साही मंडळीही तीनही दिवस टेकफेस्टला येतात. इथे भेट देणाऱ्यामध्ये फक्त विज्ञान आणि अभियांत्रिकीचे विद्यार्थी असतात असं नाही. इतर शाखेचे विद्यार्थीही इथे येतात. इथे सर्वाधिक दिसणारी गर्दी असते ती शालेय विद्यार्थ्यांची.

गर्दीचा एवढा ओघ कायम राहण्याचं कारण वर्कशॉप्स, लेक्चर्स वगैरे आहेच, पण त्याच बरोबर आयआयटी विषयी असलेलं आकर्षण हाही विद्यार्थ्यांचा गर्दीमागचा एक घटक आहे. आयआयटीमुळे अर्थातच बरीच मुलं आकर्षित होतात० सुपर्ण मान्य करतो. अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांमध्ये आयआयटी विषयी भरपूर आकर्षण असतं. अभियांत्रिकीला प्रवेश घेऊ इच्छिणारे अकरावी-बारावीचे आणि शालेय विद्यार्थी जेईई या प्रवेश परीक्षेची तयारी करत असतात. देशभरच्या आयआयटीत मिळून जागा आहेत १०,०००. मागच्या वर्षी या जागासाठी पाच लाखाहून जास्त विद्यार्थ्यांनी ही प्रवेश परीक्षा दिली होती. यावरून आयआयटीविष्यी असलेल्या आकर्षणाची कल्पना येईल. बाकीच्यांचचं जाऊ द्या. पण स्वत: आयआयटीवाल्यांना फर्स्ट इयरपासूनच टेकफेस्टची भुरळ पडते.

'मी स्वत: फर्स्ट इयरलाच या इव्हेंटकडे आकर्षित झालो. त्यावर्षी व्हॉलंटियर म्हणून सगळं काम जवळून पाहता आलं. थर्ड इयलर फूड ॲण्ड बेव्हरेजेस मॅनेजर होतो आणि आता या वर्षी ओव्हरऑल को-ऑर्डिनेटर म्हणून काम पहातोय. या अनुभवातून शिकण्यासारखं बरच काही आहे.' अनिश नमूद करतो. 'व्यवस्थापनाच्या बऱ्याच गोष्टी यातून शिकयला मिळतात. टाईम मॅनेजमेंट समजतं. संभाषणकला विकसित होते. पण सगळयात महत्त्वाचं म्हणजे यात आपले आंत्रप्रिनरशिप स्किल्स वाढतात. पुढेमागे एखादी कंपनी काढली तर त्याचं काम कसं चालवायचं याची कल्पना येते. मोठं ऑर्गनायझेशन कसं चालत असेल हे समजतं. मगाशी तो लेक्चर कॅन्सल झाल्याचा प्रसंग सांगितला, तसं अचानक येणाऱ्या बदलांना कसं सामोरं जायचं ते समजतं.'

'आंत्रप्रिनरशिपमध्ये महत्त्वाचं असतं की तुम्ही उपलब्ध रिसोर्स कसे वापरता. 'टेकफेस्ट'मध्ये आम्हाला व्हॉलेंटियर्सच्या रूपाने मनुष्यबळ भरपूर उपलब्ध असतं. त्या सगळया तरुणांच्या एनर्जीचा कन्स्ट्रक्टीव्ह वापर करणं महत्त्वाचं असतं टेकफेस्ट मध्ये हेच शिकायला मिळतं. टेकफेस्टच्या कमिटीच्या रचनेतून हे समजतं.'

अनिशच्या बोलण्यावरून् जाणवतं, टेकफेस्टमध्ये काम करणाऱ्या विद्यार्थ्यांना भरपूर काही शिकण्याची ही एक सुवर्णसंधीच आहे. टेकफेस्टच्या अमाप लोकप्रियतेमुळे याचं नाव एक सामान्यनाम किंवा 'जेनेरीक टर्म' बनत चालली आहे. एखाद्या कॉलेजमध्ये टेक्नॉलॉजी इव्हेंट असला तर मुलं 'आमच्या कॉलेजचं टेकफेस्ट आहे' असं सहज म्हणून जातात. एखादी चांगली ॲक्टिव्हिटी ब्रँड कशी बनून जाते याचे हे उत्तम उदाहरण .. थ्री चिअर्स फॉर ब्रँड टेकफेस्ट

दॅट्स द वे वी मेट

गेल्या तीन वर्षांत अनेक तरुण लेखकांची इंग्रजी पुस्तके येत आहेत. फ्लिपकार्टवरती नजर टाकली तरी अशी पुस्तके दिसतील. दुर्जय दत्ता , सचिन गर्ग, निकिता सिंग अशा अनेक लेखकांच्या या कादंबऱ्यांनी लाखो प्रतींचा खपाचा आकडाही ओलांडला... नक्की काय आहे हे सगळ हा नवा ट्रेंड काय वाटतं या नव्या तरुण लेखकांना त्यांची मत काय आहेत हे सगळं जाणून घेण्यासाठी आम्ही संपर्क साधला ते याच फिल्डम धलं एक मराठमोळं नाव, सुदीप नगरकरला .. 'फ्यू थिंग्ज लेफ्ट अनसेड' हे त्याच लाखो प्रती विकले गेलेले पहिले ब्लॉकबस्टर पुस्तक .. दॅट्स द वे वी मेट हे त्याचे दुसरे पुस्तकही सध्या गाजत आहे. आमच्या प्रश्नाना मुद्देसुद उत्तरे देणारी नोट त्याने पाठवली, ती वाचकांसाठी जशीच्या तशी ..

एक लेखक म्हणून प्रवास कसा झाला?

उत्तर : दत्ता मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये इलेक्ट्रानिक्स शाखेतून मी इंजिनिअरिंग पूर्ण केलं. तोपर्यंत जरी मला लेखनात रस नसला तरी पर्सनल डायरी लिहिण्याची आणि आसपास थोडेफार ब्लॉग लिहिण्याची आवड होती. माझ्या आवडत्या मुलीसोबत मी गोड नात्यात गुंतलो होतो आणि आयुष्य सुरळीत चालू होतं. पण तेव्हा अचानक मी तिला गमावलं आणि इंजिनिअरिंगचं एक वर्षही गमावलं. नकारात्मक विचार मला छळू लागले आणि त्या वेळेस पर्सनल डायरी मला दिवसभर उद्युक्त ठेवू लागली. जेव्हा माझ्या मित्राने मला ही डायरी प्रकाशित करण्याविषयी सुचवलं, तेव्हा मला वाटलं की हे माझ्यासाठी अशक्य आहे. नंतर मी त्यावर गंभीरपणे विचार केला आणि ठरवलं की हे करून पाहूच. मी पात्रांची नावं बदलली आणि काही विशिष्ट प्रसंगात फेरफार करून कथेला व्यवस्थित आकार दिला. मला हे पुस्तकं तिच्यापर्यंत पोहोचवायचं होतं. हस्तलिखित संहिता (मॅन्युस्क्रिप्ट) पूर्ण झाल्यानंतरही मला लेखक व्हावंसं वाटत नव्हतं. जेव्हा मी 'फ्यू थिंग्ज लेफ्ट अनसेड' लिहून काढलं, तेव्हा मी ते फक्त माझ्या सोलमेट साठी लिहिलं होतं. आम्ही एकमेकांशी बोलत नाही याचा अर्थ असा नाही की मी तिचा विचार करत नाही. सर्वात दु:खद भाग हा होता की ढळणाऱ्या प्रत्येक दिवशी मी तिचा खूप म्हणजे खूपच विचार करत होतो. मी मेल्यानंतर/माझ्या मृत्यूनंतर मला त्या आठवणी कायम जिवंत ठेवायच्या होत्या. अशाप्रकारे माझं पहिलं पुस्तक अस्तित्वात आलं, तेव्हा मला की प्रेम आणि रिलेशनशिप/नात्यासंबंधीच्या न सांगितलेल्या बऱ्याच गोष्टी आहेत. तिच्यापर्यंत मला कसंही करून पोहोचायचं होतं, हे जवळपास अशक्य आहे हे माहीत असूनही. मला अजूनही वाटतं की हे पुस्तक तिच्यापर्यंत पोहोचावं.

माझ्या पहिल्या पुस्तकात माझ्या आयुष्य अपूर्ण होतं. पुस्तक प्रकाशित झाल्यानंतरही मी बळबळंच हसलो. मी तरीही डिप्रेशनमध्ये होतो आणि मी नक्कीच म्हणेन की यावेळेस दररोज माझ्या पालकांनी आणि भोवतालच्या आश्वासक वाचकांनी संवाद साधताना मला उत्साही आणि उद्युक्त ठेवलं. 'फ्यू थिंग्स लेफ्ट अनसेड' च्या २.५ लाखांहून अधिक प्रती एका वर्षात संपल्या आणि माझ्या इनबॉक्समधील चाहत्यांच्या सगळया पत्रांनी गिल्ला करून माझ्यावर दुसरं पुस्तक लिहिण्याची सक्ती केली.
अशाप्रकारे 'दॅटस् द वे मी मेट' अस्तित्वात आलं. हे मी हाती घेणार होतोच, पण एवढ्या लवकर नाही. जून २०११ मध्ये मला माहीतही नव्हतं की जून २०१२ मध्ये 'दॅटस द वे वी मेट' प्रकाशित होईल. मी रडलो, मी स्वत:ला माझ्या खोलीत बंद करून घेतलं आणि एखाद्या मुलाने करू नये अशा सगळ्या गोष्टी केल्या.

मी मान्य करतो की नातेसंबंधात मी कधीच परिपूर्ण नव्हतो, पण काही नाती नियंत्रणापलीकडली असतात. 'दॅटस् द वे मी मेट' नातेसंबंधातली दूसरी बाजू रेखाटतं, ज्यात तुम्ही तुमच्या नातेसंबंधात राजे नसता. सगळं काही सुरळीत आणि व्यवस्थित चालू असताना आयुष्य तुमच्यासमोर अशी परिस्थिती निर्माण करतं की तुम्हाला योग्य मार्ग निवडावा लागतो. तुम्हाला असा निर्णय घ्यावा लागतो की ज्यामुळे तुम्ही दुखावले जाल, पण तुम्ही असहाय असता.

खरंतर तुमच्या चार वर्षाच्या रिलेशनशिपपलिकडचा विचार करण्याची सक्ती तुमच्यावर असते. तुम्हाला त्या दोघा व्यक्तीबद्दल विचार करण्याची गरज असते, ज्या गेल्या वीस वर्षांपासून तुमच्यासोबत आहेत आणि तुमच्यावर सारखंच प्रेम करताहेत. तुमचे आई-वडील... 'दॅटस् द वे मी मेट' हा माझा स्वानुभव असूनही, त्याग म्हणजे काय हे ज्यांना निश्चितपणे माहीत आहे अशी तरुणांशी/तरुणाईशी नातं सांगेल.

कधी कधी मला असं वाटतं की काही विशिष्ट माणसांनी माझे विचार वाचावेत, जेणेकरून त्यांना कळेल की मी नक्की/काय



करायला घाबरतोय. 'दॅटस् द वे मी मेट' लिहिताना मी बऱ्याच वेळेस विचारांत हरवून जात असे आणि माझ्या जुन्या दिवसांबद्दल पुनर्विचार करत असे. तुम्ही भूतकाळ बदलू शकत नाही. पण रिलेशनशिप/नातेसंबंधातल्या आनंदी क्षणांना आठवून आनंदी तर राहू शकता. मी तेच केलं. आज आम्ही एकमेकांवर प्रेम करणं थांबवलंय अजिबात नाही. ती माझ्या आयुष्यातली एक खास सोल आहे आणि कायम तशीच राहील. मी तिच्यावर पूर्णार्थाने प्रेम करतो आणि मान्य करतो की आता आम्ही आमच्या जीवनात वेगवेगळ्या मार्गाने प्रवास करतोय, पण माझं तिच्यावरचं प्रेम कायम राहील आणि आमचा भूतकाळ मी स्वप्नात पुन्हा जगू शकेन.

आमचे रस्ते जरी भिन्न असले तरी आमचे मार्ग एकमेकांना भिडू शकतील आणि कदाचित भविष्यात कधीतरी आमचे रस्ते एकत्र येतील आणि आम्ही पुन्हा एकदा एकाच मार्गाने प्रवास करू.

तोपर्यंत प्रियतमे. तू सदैव माझ्या हृदयात आहेस.

प्रेम म्हणजे वेदना, प्रेम म्हणजे निर्मळता, प्रेम म्हणजे त्याग !

आज 'दॅटस् द वे मी मेट'देखील नॅशनल बेस्ट सेलर असून त्याला 'फ्यू थिंग्ज लेफ्ट अनसेड' पेक्षाही जास्त सकारात्मक प्रतिसाद मिळाला.

इंग्रजी लेखनविश्वातली आव्हानं कोणती आहेत?

उत्तर : अगदी पहिल्या प्रथम प्रश्न निर्माण होतो, तो म्हणजे 'दॅटस् द वे मी मेट' सारख्या समकालीन कादंबरीसाठी ६०,००० शब्दांची संहिता लिहीणं. जेव्हा आपण विचार करतो किंवा लिहायला सुरुवात करतो तेव्हा असं वाटतं की तेवढे शब्द किंवा अडीचशे पानांची कादंबरी सहज लिहून होईल. तथापि, विचारप्रक्रियेनंतर आपण जेव्हा प्रत्यक्षात लिहायला सुरुवात करतो, तेव्हा वाटतं. की हे सोडून द्यावं. काही क्षणी असही वाटू शकतं की हे आपल्या हातचं काम नाही. तथापि तिथेच /तेव्हाच आपली स्वयंप्रेरणा पूर्ण झाल्याने आपला खरा संघर्ष सुरू होतो.

एकदा का तुमचं लेखन पूर्ण झालं की पुढची पायरी असते प्रकाशक कसा गाठायचं मी बरेच परिश्रम केलेत पण आता पुढे काय करू असे विचार तुमच्या मनात पिंगा घालतील. त्यातले बरेचसे तुम्हाला सांगतील की इंटरनेटवर प्रकाशकाचं नाव शोधा आणि त्याच्याचसोबत बोलणी करा. हे अशंत: खरं आहे, पण खरंतर तुम्ही ज्या शैलीची संहिता लिहिली आहे ती स्वीकारणारा प्रकाशक कोणता याच तपशीलवार संशोधन करणं गरजेचं असतं. या पायरीपर्यंत पोहचल्यानंतर, प्रस्ताव कसा मांडायचा याचा अभ्यास तुम्हाला करावा लागेल. ही कला मात्र लेखनापेक्षाही कठीण आहे. मी तर म्हणेन की याच्यापेक्षा नोकरीसाठी 'सिव्ही' बनवणं बरचं सोपं आहे. मॅनेजर 'सिव्ही'निदान वाचतात तरी. मात्र तुम्ही चांगला प्रस्ताव बनवलेला नसेल तर लेखनाची महत्त्वाकांक्षा गमावू शकता. प्रस्ताव तयार करण्याचे निरनिराळे मार्ग इंटरनेटवर उपलब्ध आहेत. ते तुम्ही निर्धोकपणे आजमावू शकता.

तसे लिटरेचर एजंटही पुष्कळ असतात. पण त्यांची निवड करताना सावध राहावं लागतं. ते तुमच्याकडून बरीच रक्कम उकळून गंडा घालू शकतात.

एकदा का हे सर्व झालं की तुम्हाला एकच काम असतं ते वाट पाहणं, उत्तर येईपर्यंत हे वाट पाहणं चालूच असतं. मला जवळपास तीन महिन्यांनी उत्तर मिळालं होता. कदाचित दुसऱ्याच दिवशी तुम्हाला उत्तर मिळेल किंवा वर्षभर उत्तर मिळणारही नाही. हे केवळ तुमच्या नशिबावर आणि लेखनाच्या/लिहिलेल्या गुणवत्तेवर अवलंबून असतं. एमबीएचे विद्यार्थी करू शकतात कारण त्यांच्याकडे सादरीकरणाचं कौशल्य असतं. अखेरीस तुम्हाला उत्तर मिळतं आणि येतो सर्वात महत्त्वाचा टप्पा. तुमच्या पुस्तकाचा प्रसार. पुस्तकाचा प्रसार करणं ही एक कला आहे. तुमच्या उद्दिष्टीत वाचकापर्यंत पोहोचवण्यासाठी तुमची योजना कशी आखता हे यात येतं. जर हा टप्पा टाळलात तर तुम्ही अपयशी लेखकांच्या गर्दीत हरवून जाल. एखाद्या नातेसंबंधात जशा समस्या असतात तशाच समस्या वाचकांना कादंबरीबद्दल असतात. एक लेखक म्हणून त्या आधीच समजून घेणं हेच त्याचं निरसन करणे होय. एखादा मित्र आपल्यावर नाराज असताना आपण दुसरीकडे पाहणं हे जितकं विवेकशून्य आहे त्याइतकंच विवेकशून्यपणाचं लक्षण म्हणजे, आपल्या कथेत काहीतरी कमतरता आहे हया वस्तुस्थितीला सामोरे जायला टाळणं, त्यापासूर दूर पळणं. (Turning the other way, thinking you can avoid facting the fact that something does not work is as unwise a thing to do with your story, as it is to look the other way when a friend is upset with you.) तुम्ही तुमच्या कादंबरीबद्दल नक्की काय योजना आखलीये यावर निर्णय घेणं आणि त्यासाठी वेळ देणं गरजेचं आहे. तुमची कादंबरी देशभरात दखलपात्र कशी होईल अशा बऱ्याच गोष्टी आणि योजना तुम्हाला यशस्वी लेखक बनवू शकतात. लेखकाबाबत असं नसतं.

मराठी आणि इंग्रजी लेखनातले फरक नक्की काय वाटतो?

उत्तर : पुष्कळ फरक आहेत. वास्तविक पाहता लेखनामधल्या फरकापेक्षा, लेखकांमध्येही बरेच फरक आहेत. मराठी लेखक बरेच भिडस्त आहेत आणि स्वत:चा मोठ्या प्रमाणावर प्रसार/जाहिरात करत नाहीत. कदाचित त्यांना फक्त स्वत:च्या आवडीपोटी

लिहायचं असेल. पण प्रसार केल्याने फक्त वाचकसंख्या वाढते असं नाही तर त्याबरोबर मराठी लेखनाविषयी जागृती निर्माण होते. आपण पाहत आहोत की दिवसेंदिवस युवा वर्ग मराठी वाचनाकडून इंग्रजी वाचनाकडे इंग्रजी वाचनाकडे वळत चाललाय. आता मला स्पष्टीकरणं देत बसू नका की मराठी वाचक अजूनही आहे. पुण्यात आणि ग्रामीण भागात जा, आपल्याला मराठी वाचकच दिसतो. ते गेलं खड्ड्यात. तुम्ही मायानगरी मुंबई गमावताय. मुंबईत फक्त जागृती निर्माण केल्याने तुम्ही निदान ५०,००० वाचक मिळवू शकता. तथापि मराठी लेखक जास्त करून जाहीरपणे आणि फेसबुक, ट्विटरवरसारख्या सोशल नेटवर्कवर दिसत नाही. प्रकाशकही व्यासपीठ देताना दिसत नाही. माझं पहिलं पुस्तक लिहून झाल्यावर मी पुण्या-मुंबईतल्या एक-दोघा प्रकाशकाकडे गेलो होतो, पण मला कसलीही पार्श्वभूमी किंवा शिफारशी नाहीत असं सांगत त्यांनी मला लाथाडलं. आज मी त्यांची कीव करतो. त्यांनी मोठाच नफा गमावला. मला मनापासून वाटतं की 'लता मंगेशकरांनी स्वतःच्या नावाचा प्रसार करून त्याचा ब्रॅन्ड बनवला असता, तर त्याचं नाव मायकल जॅक्सनपेक्षाही जास्त प्रसिद्ध झालं असतं.' एक सांगायचं म्हणजे, हे म्हटलं नाहीये. ओबामांनी त्यांच्या भाषणात हे सांगितलंय.

आता परत लेखनाकडे वळू. आपण अजूनही बदल मान्य करत नाही. आपल्याला अजूनही पारंपरिक लेखनच हवंय. अमेरिकेत ट्रॅश फिक्शन ही एक वेगळी शैली/जॉनर आहे. 'फ्यू थिंग्ज लेफ्ट अनसेड' हे माझं पुस्तक - ज्याचा मराठी अनुवाद नोव्हेंबरमध्ये प्रकाशित होतोय. युवा पिढीबद्दलच आहे आणि त्यात उत्कट प्रणयाचाही समावेश आहे. मराठीत आपण अजूनही ते मान्य करत नाही. हे आश्चर्यजनक आहे कारण ज्या देशात समागमावरची मंदिरं बनली त्या देशात आपण राहतोय. कागदावर आल्यावर मात्र आपण त्याविषयी वेगळा विचार करता. आपण युवा वाचक गमावण्याचं हे प्रमुख कारण आहे. पुस्तकांनी युवावर्गाशीदेखील नातं सांगायला हवं. पुस्तकांनी माणसात वाचक घडवायला हवा. मराठी लेखकांनी एकत्र येऊन या गोष्टीविषयी विचार करायला हवा, जेणेकरून त्यांना एक मोठं व्यासपीठ मिळेल. आपण बऱ्याचशा नव्या प्रतिभा वाया घालवतोय.

इंग्रजी लेखनातला अलीकडला कल काय आहे.

उत्तर : काही काल्पनिक तर काही खासगी अनुभवातल्या नव्या कथा, बरेच नवीन लेखक उदयाला येत आहेत, ही चांगली गोष्ट आहे. लेखकसंख्या जशी वाढेल तशी वाचकसंख्याही वाढेल. भारताच्या वाचकवर्गात क्रमाक्रमाने वाढ होताना आपण पाहतोय. 'ट्रॅश फिक्शन'मधला आधुनिक कल पाश्चात्त्य संस्कृतीला नवा नाही. असं असूनही भारतीय वाचकांनी तो फार उशिरा स्वीकारला. म्हणून पुस्तकांच्या किमतीला शंभर सव्वाशे रुपयापर्यंत खाली उतरलेल्या आपण पाहतो, ज्यामुळे अनियमित वाचकांच्या संख्येत वाढ झाली आहे. प्रेमावर येणारी बरीच पुस्तके आपण पाहतो आणि म्हणतो की प्रेमकथांचा बाजार संपलाय . आपण हे विसरायला नको की भारत हा असा देश आहे ज्याला प्रेम आणि प्रेमकथा आवडतात. यश चोप्रांनी अखेरच्या क्षणापर्यंत प्रेमकथा बनवल्या. मग केवळ वर्षात प्रेमकथांचा बाजार कसा काय संपू शकतो हा तुम्ही ती कशी लोकांपुढे आणता यावर बरेच अवलंबून आहे. प्रत्येक कथेला आणि कादंबरीला स्वःची अशी चव असते आणि वाचकांना ती चाखण्यासाठी मिळाली तर त्यांना ते नक्की आवडेल. साहित्याशी संबंधित लोकांनाही कुठंतरी जाणवू लागलंय की वाचकांची चव बदलत आहे. हे कसोटी क्रिकेटप्रमाणे आहे. कसोटी क्रिकेट आपले सत्त्व गमावणार नाही. कारण ते खरंखुरं क्रिकेट आहे. तरीही नव्या ट्रेंडमुळे क्रिकेटला प्रेक्षकवर्ग लाभला हे कोणीही नाकारू शकत नाही. बदल स्वीकारण हे गरजेचे असते. पण त्यासाठी तुमच्या लिखाणात बदल करायची अवश्यकता नाही. कारण प्रत्येक लेखनप्रकाराला स्वतःचे वाचक असतात व राहतील.

आजच्या तरूण पिढीबाबत काय वाटतं?

उत्तर : आजची तरुण पिढी वेगवान आहे, टेक्नोसॅव्ही आहे आणि ते परिस्थिती वा परिणामांची फिकीर करत नाहीत. त्यांना स्वतःचे आयुष्य हवे तसे जगायचे आहे. त्यांना विश्वास नसेल तर एखादा नियम वा श्रद्धा बाळगायची सक्ती तुम्ही त्यांच्यावर करू शकत नाही. ज्या गतीने ही पिढी पुढे जात आहे, ती गती पालकांनी समजून घ्यायची गरज आहे आणि तरुणांचाही बॅलन्स बिघडत चालला आहे. आम्ही रविवारी सकाळी कृष्णाचे दर्शन घेत मोठे झालो. आजकाल शनिवारच्या लेट नाईट पार्ट्यांतच लोक इतके गुंग असतात की त्यांचा रविवार दुपारीच चालू होतो. हे चुकीचे आहे याची जाणीव त्यांना कदाचित आता होणार नाही. पण पाच वर्षांनी नक्कीच होईल. पब, पार्ट्या, टाईमपासची प्रेमप्रकरणे सगळे मला मान्य आहे .. फक्त एका लिमिटमध्ये .. ते लिमिट लवकरात लवकर ठरवायला हवं .. प्रत्येकाने ..

भाषांतर – क्षितिज देसाई

''मातीशी पाय घट्ट बांधलेला''

नागराज मंजुळे, ''पिस्तुल्या'मुळे प्रकाशझोतात आलेला पण मातीशी इमान राखलेला कलावंत .. डॉ . प्रिया आमोद यांनी त्याच्याशी संवाद साधला, आणि त्यांच्या संवादातून दिसणारा नागराज थोडक्यात त्यांनी 'नमस्कार'च्या वाचकांपुढे मांडलाय..

'जे लोक प्रेक्षकांना काय आवडेल याचा विचार करून कलाकृती तयार करतात ते लवकरच संपतात. कलेच्या मर्यादा विसरून, स्वत:शी प्रामाणिक राहून तयार केलेली कलाकृती चिरंतन टिकते' नागराज मंजुळे सांगत होता. अठ्ठावन्नाव्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारात, त्याच्या पहिल्याच लघुपटाला, 'पिस्तुल्या'ला उत्कृष्ट लघुपटाचे रजत कमळ मिळाले आहे. सोलापूर जिल्ह्यातील, करमाळा तालुक्यातील जेऊर गावचा नागराज. वडार समाजात शिक्षणाचं प्रमाण अत्यंत कमी, तरीही त्याला शिक्षणाची आतून ओढ वाटायची. गावातल्या टुरिंग टॉकीजमधला चित्रपट पाहायला आवडायचं. व्हिडिओवरही एक रुपया देऊन चित्रपट पाहायला मिळायचे. शाळा बुडवून तो चित्रपट पाहायला जायचा. अमिताभचे चित्रपट आवडायचे. चित्रपटाचं वेड तिथूनचं सुरू झालं. खरंतर नागराजला गोष्ट ऐकायला आवडायचं. मोठी आत्या, आई गोष्टी सांगायच्या, त्या ऐकताना तो त्या गोष्टीच्या जगात गेलेला असायचा. गावातच त्याने पदवी घेतली आणि पुणे विद्यापीठात शिकायला आला. मराठी विषयात एम.ए. करताना केशवसुत, मर्ढेकर, अरुण कोल्हटकर, नामदेव ढसाळ नव्याने भेटत गेले. अधिक जवळचे वाटत गेले. एम.फिल करत चित्रपटाचं वेड डोक्यात घट्ट बसलेलं होतं. अभिव्यक्त होण्यासाठी चित्रपटाचं माध्यम खुणावत होतं. आणि 'पिस्तुल्या' तयार झाली. पंधराच मिनिटांचा हा लघुपट मिनिटा मिनिटाला पकड घेत राहतो. शिक्षणासाठी वंचित समाजातील मुलाने केलेली धडपड पाहून आपण आतून हलतो. ज्या वडार समाजाचं नागराज प्रतिनिधित्व करतो तिथे रूढी, अंधश्रद्धांचा पगडा आहे. दुष्टचक्रात अडकलेला तो समाज आहे. शिक्षण नाही म्हणून सगळे प्रश्न तयार होतात हे मनापासून जाणवल्यामुळेच नागराजने 'पिस्तुल्या' तयार केली. त्याला राष्ट्रीय पातळीवर पुरस्कार मिळालाच इतरही वीसेक पुरस्कार मिळाले. रोममध्ये त्याचा चित्रपट दाखवला, तिथेही लोकांना चित्रपट आवडला, तसे मेल्स आले.

सध्या नागराज 'फँड्री' नावाचा ग्रामीण जीवनातील टीनएज प्रेमकथा साकारतो आहे. पुढच्या वर्षी हा चित्रपट प्रदर्शित होईल, यापेक्षा अधिक तो काही बोलू इच्छित नाही. अर्थात प्रदर्शित झाल्यावर नागराजचा चित्रपटाच अधिक बोलेलं.

नागराज आज मुंबईसारख्या महानगरात राहतो. जेऊर ते मुंबई व्हाया पुणे असा त्याचा प्रवास झाला आहे. तो कुठे जास्त कम्फ र्टेबल आहे , गावात की शहरात असं विचारल्यावर म्हणाला, 'गाव आवडतच, पण शहर जास्त चांगलं असं वाटतं. गावातले फायदे तोटे, शहराचे फायदे तोटे आपापल्या जागी आहेत. गावात राहून जगाचा विस्तार आपल्या डोक्याएवढा आहे, असं वाटतं. जाती-व्यवस्था, रूढी-परंपरा याचं जोखड मानेवर असतं. शहरात सामाजिक दबाव नसतो. आपली कूपमंडुकता आपण शहरात पारखून घेऊ शकतो. म. गांधीजींनी 'खेड्याकडे चला' ची हाक दिली, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'खेडं सोडा' चा मंत्र दिला. जे गांधीजींना म्हणायचं होतं, तेच डॉ. आंबेडकरांनाही म्हणायचं होतं. गांधीजींच्या मते खेड्याला प्रगतीचा हात द्या, असं म्हणायचं होतं, तर खेड्यातील जातीय व्यवस्था मोडण्यासाठी शहराकडे चला, असं डॉ. आंबेडकराना म्हणायचं होतं. मला दोघांचा सूर एकच वाटतो.'

'बऱ्याचवेळा कलाकाराला, प्रतिभावंताला त्याच्या काळात दाद मिळतेच असं नाही. मर्ढेकरांच्या, ढसाळांच्या कवितांना एकेकाळी कविताच म्हटलं गेलं नाही. वाचकांचा टीआरपी पाहून लिहिलं जात नाही. आपापल्या वृत्तीनुसार माणूस लिहितो.. आपण नाही का, घरी मुलाला आवडतं तेही खायला देतो, त्याचं पोषण होईल असं त्याचं नावडतं ही खायला घालतोच ना..' नागराज एकदम सोप्पं करून सांगतो.

पहिल्याच लघुपटाला राष्ट्रीय पुरस्कार, दडपण येत नाही का जबाबदारी वाढली आहे का असं विचारल्यावर तो म्हणाला, 'असं कुठलं ही ओझं मी घेत नाही. मी माझं काम प्रामाणिकपणे करतो. लोकांना माझी कलाकृती आवडलीच पाहिजे, असा माझा अट्टहास नाही. चांगल्या कामाचा मी ॲडव्हान्स घेत नाही. मी माझं शंभर टक्के देतो. आपल्याच कामाकडे आपली नजर असावी.' नागराज असा पारदर्शी, निखळ आहे. त्याचा हाच पारदर्शीपणा त्याच्या कलाकृतीतून आपल्यापर्यंत पोहचत असतो.